विकास व कल्याण

**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार**
**कल्याणकारी मंडळ,मुंबई.**

एम.एम.टी.सी. हाऊस, पाचवा मजला, प्लॉट नं. सी २२,
ब्लॉक - ई , वांद्रे- कुर्ला संकुल,
वांद्रे (पूर्व),मुंबई ४०० ०५१ .

# मा. अध्यक्ष तथा मा. मंत्री, (कामगार) यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या ६० व्या बैठकीचे इतिवृत्तांत

*******

**बैठक स्थळ :- मा. मंत्री, (कामगार) तथा मा.अध्यक्ष महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ यांचे दालन क्र.८४, जॉली मेकर ०१ प्रिमायसेस को. ऑप. सोसायटी लि., आठवा मजला, नरीमन भवन प्लॉट क्र.९५,९६ व ९७, कफ परेड, कुलाबा, मुंबई- ४०० ००२.**

**दिनांक. :- ०२.०७.२०२४ (मंगळवार)**

**वेळ :- सकाळी ११.००**

---

**प्रस्तावना :-**

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची ५९ वी बैठक दिनांक १२.१२.२०२२ रोजी आयोजित करण्यात आली होती. मा. महालेखापाल कार्यालयाकडून करण्यात आलेल्या लेखापरिक्षणामध्ये, दिनांक ३०.०६.२०२१ रोजी मंडळाचा कार्यकाल संपला असून, मंडळ अस्तित्वात नसताना सदर बैठकीच्या आयोजनाबाबत आक्षेप नोंदविण्यात आला होता.

२. याबाबत विधी व न्याय विभागाचे अभिप्राय घेण्याबाबत मा. महालेखापाल कार्यालयाने निर्देशित केले होते. मंडळामध्ये कामगार प्रतिनिधी व मालक प्रतिनिधी नसले तरी शासकीय प्रतिनिधी असून,मंडळ कायदेशीररित्या अस्तित्वात असल्याने, कामगार विभागामार्फत विधी व न्याय विभागाचे अभिप्राय मिळणेकामी मंडळाने विनंती केली होती.

३. सदर विनंतीस अनुसरून, विधी व न्याय विभागामार्फत दिनांक २६.०२.२०२४ रोजीच्या पत्रान्वये अभिप्राय प्राप्त झालेले असून, मंडळ कायदेशीररित्या अस्तित्वात असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

४. दरम्यानच्या कालावधीत विधी व न्याय विभागाचे अभिप्राय अपेक्षीत असल्याने बैठक आयोजित करण्यात आली नव्हती. तसेच त्यानंतरच्या कालावधीत मा.लोकसभेची व मा.विधानपरिषदेची आदर्श आचारसंहिता असल्याने बैठकीचे आयोजन करता आलेले नव्हते.

५. सद्यस्थितीत विधी व न्याय विभागाचे अभिप्राय व आचारसंहिता कालावधी संपूष्टात आल्याने बैठकीचे आयोजन करण्यात येत आहे त्याबाबतची विषयसूची खालीलप्रमाणे आहे:-

# महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

## बैठकीची विषयसूची



| अ.क्र. | बैठकीचा विषय | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १ | महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाअंतर्गत नोंदीत सक्रीय (जिवीत) बांधकाम कामगारांकरीता गृहपयोगी वस्तु संचाचा पुरवठा करणेबाबत. | ९ ते १० |
| २ | महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाअंतर्गत कडील दिनांक १९.०५.२०२३ नंतर नव्याने नोंदणी/नुतणीकरण झालेल्या तथापि अद्याप संच वाटप न झालेल्या ३,९१,८५३ नोंदीत सक्रीय (जिवीत) बांधकाम कामगारांना अत्यावश्यक संच व सुरक्षा संच वितरीत करणेबाबत. | ११ |
| ३ | महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाअंतर्गत बांधकाम कामगारांची नोंदणी, नुतणीकरण व लाभ वाटपाच्या मदतीसाठी तालुका स्तरावर कामगार सुविधा केंद्र स्थापन करणेबाबत. | १२ ते १३ |
| ४ | महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाअंतर्गत नोंदीत सक्रीय (जिवीत) बांधकाम कामगारांकरीता आरोग्य तपासणी चाचण्या सुधारीत करणे तसेच, "तपासणी ते उपचार आरोग्य योजना" राबविणेबाबत. | १४ ते १६ |
| ५ | महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगाराचे व सेवाशर्तीचे विनियमन) (सुधारणा) नियम २०१३ अधिक्रमित करून, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगाराचे व सेवाशर्तीचे विनियमन) (सुधारणा) नियम २०२३ करणेबाबत. | १७ |
| ६. | महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाअंतर्गत मुख्यालय व अधिनस्त जिल्हा कार्यालयाच्या अभिलेख कक्षाचे स्कॅनिंग ॲन्ड डिजिटायझेशन करून घेणे व कॉम्पेक्टर स्टोरेज उपलब्ध करून देणेबाबत. | १८ ते २० |
| ७ | महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाअंतर्गत नोंदीत बांधकाम कामगारांसाठी नाक्याच्या ठिकाणी शेड उभारणेबाबत. | २१ ते २२ |
| ८ | महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ मुख्यालयाची सद्यस्थितीतील भाडे तत्वावरील जागेची मुदत माहे जुन २०२४ अखेर संपुष्टात येणार असल्याने मंडळासाठी एम. एम. टी. सी. हाऊस येथील तळमजला, पाचवा मजला येथील जागेस मुदतवाढ देण्यास व चौथा मजला नव्याने भाडयाने घेणेबाबत. | २३ ते २५ |

| अ.क्र. | बैठकीचा विषय | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| ९ | महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाअंतर्गत जिल्हा कामगार सुविधा केंद्र स्थापन करणेकरीता मंडळामार्फत नियुक्त मे.टेक्नोक्राफ्ट असोसिएटस यांना मुदतवाढ देणेबाबत. | २६ ते २८ |
| १० | महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळामार्फत नोंदीत सक्रीय (जिवीत) बांधकाम कामगारांना देण्यात येणाऱ्या विविध सुविधांचे सनित्रंण करण्यासाठी संगणक प्रणाली (Dashboard) विकसीत करणेबाबत. | २९ ते ३० |
| ११ | महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाअंतर्गतच्या पूर्व शिक्षण प्रशिक्षण (RPL) या प्रशिक्षण कार्यक्रमाकरीता माहिती व तंत्रज्ञान आधारीत विविध कामकाजाकरीता माहिती तंत्रज्ञान संचालनालयाच्या सूचीबद्ध संस्थामधून एका संस्थेची निवड करणेबाबत. | ३१ ते ३२ |
| १२ | महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळातर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजनांची प्रचार-प्रसिध्द करणेबाबत २०२२-२०२३ व २०२३-२०२४ चा आराखडा राबविणेबाबत व २०२४-२०२५ चा आराखडा निश्चित करणेबाबत. | ३३ ते ३९ |
| १३ | महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या विविध योजनांच्या प्रचार -प्रसिध्दीसाठी सर्वसमावेशक माहिती पुस्तिका तयार करण्याबाबत. | ४० ते ४१ |
| १४ | महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्यणकारी मंडळाकडे जमा होणाऱ्या उपकरासंबंधी संगणक प्रणाली विकसीत करणेबाबत. | ४२ ते ४३ |
| १५ | महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाचे सन २०२१-२२ चे सुधारित अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकास व सन २०२२-२३ च्या मूळ अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकास मान्यता देणेबाबत. | ४४ ते ४६ |
| १६ | महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाचे सन २०२२-२३ चे सुधारित अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकास व सन २०२३-२४ च्या मूळ अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकास मान्यता देणेबाबत. | ४७ ते ४९ |
| १७ | महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाचे सन २०२१-२२ या आर्थिक वर्षाच्या वार्षिक जमा खर्चाच्या लेख्यास (Annual Account) मंडळाची मान्यता देणेबाबत. | ५० ते ५१ |
| १८ | महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या सन २०२२-२३ या आर्थिक वर्षाच्या लेखाविषयक कामकाजासाठी | ५२ ते ५३ |

| अ.क्र. | बैठकीचा विषय | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| | आणि सन २०२३-२४ या आर्थिक वर्षाच्या वस्तू व सेवाकर व आयकर विषयक कामकाजासाठी सनदी लेखापाल यांची नियुक्ती करणेबाबत. | |
| १९ | महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाचे सन २०२३-२४ चे सुधारित अर्थसंकल्पास व सन २०२४-२५ च्या अर्थसंकल्पास मान्यता देणेबाबत. | ५४ ते ५७ |
| २० | स्थानिक स्वराज्य संस्थांनी मंडळाचा बांधकाम उपकर वसूल करुन मंडळाकडे भरणा केल्यापोटी मागील ३ वर्षात विनामागणी (Unclaimed) उपकर वसूली शुल्क मंडळाचे जमेस घेणे आणि चालू दायित्वातून कमी करणेस मान्यता देणेबाबत. | ५८ ते ५९ |
| २१ | महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजनांच्या अंमलबजावणीबाबत.<br>अ. नोंदित जिवीत (सक्रिय) बांधकाम कामगाराच्या पहिल्या दोन पाल्याकरीता स्पर्धा परिक्षांच्या अभ्यासाकरीता अर्थसहाय्य निश्चित करणेबाबत विचार विनिमय करणे.<br>ब. नोंदणी / नुतनीकरणासाठी बांधकाम कामगारांना अर्ज केल्यावर नोंदणी / नुतनीकरण अर्ज मंजूर होण्यापूर्वीच्या किंवा अर्जातील त्रुटीची पुर्तता करण्यापूर्वीच्या कालावधीत संबंधित कामगाराचा मृत्यु झाल्यास मंडळामार्फत करावयाच्या कार्यवाहीबाबत विचार विनिमय करणे.<br>क. क्षेत्रीय कार्यालयाकडे ऑफलाईन पध्दतीने प्राप्त मृत्यु लाभाच्या प्रलंबित अर्जावर करावयाच्या कार्यवाहीबाबत विचार विनिमय करणे. | ६० ते ६३ |
| २२ | महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडे प्राप्त उपकर परतावा प्रकरणांना मान्यता देणेबाबत. | ६४ ते ६५ |
| २३ | महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ मुख्यालय व क्षेत्रिय कार्यालयांना मंडळ कामकाजाकरीता वाहन एक वर्षाच्या कालावधीसाठी भाडे तत्वावर घेण्यास मान्यता देणेबाबत. | ६६ ते ६७ |
| २४ | महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडील नोंदीत सक्रीय (जिवीत) बांधकाम कामगारांना मध्यान्ह भोजन योजनेअंतर्गत विविध निर्णय घेणेबाबत. | ६८ ते ६९ |
| २५ | महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाचे मा. | ७० |

| अ.क्र. | बैठकीचा विषय | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| | अध्यक्ष, मा. सदस्य व मा.सदस्य सचिव यांना विमान प्रवास अनुज्ञेय करणेबाबत. | |
| २६ | महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ मुख्यालय व क्षेत्रिय स्तरावर मंडळ कामकाजासाठी सुधारीत आकृतीबंधास मान्यता देणेबाबत. | ७१ ते ७४ |
| २७ | महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ मुख्यालयातील कामकाजाकरीता नियुक्त करण्यात आलेल्या सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्या मुदतवाढीस मान्यता देणेबाबत. | ७५ ते ७६ |
| २८ | दिनांक ३१.१०.२०२३ रोजीच्या शासन निर्णयाव्दारे दिनांक ०६.०९.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये नियुक्त सूचीबद्ध संस्थांकडून मनुष्यबळ नियुक्ती करणेबाबतचा शासन निर्णय रद्द करण्यात आल्याने मंडळ व क्षेत्रिय कार्यालयातील कामकाजासाठी मनुष्यबळ नियुक्तीकरीता संस्था निश्चीत करणेबाबत. | ७७ ते ७८ |
| २९ | महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाअंतर्गत नोंदीत सक्रीय (जिवीत) बांधकाम कामगारांना लाभाचे अर्ज (DBT) सादर करण्यासाठी प्रत्यक्ष जिल्हा सुविधा केंद्रावर उपस्थित राहून अर्ज सादर करण्याबाबत नवीन कार्यपध्दतीचा निश्चित करणेबाबत. | ७९ ते ८० |
| ३० | महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाअंतर्गतच्या बांधकाम कामगारांची नोंदणी, नुतणीकरण व लाभ वाटपाबाबतची माहिती मंडळाच्या पटलावर ठेवणेबाबत. | ८१ ते ८२ |
| ३१ | दिनांक ०१.११.२०२० ते दिनांक ३१.०१.२०२२ या कालावधीत मा. महालेखापाल कार्यालयाकडून झालेल्या निरीक्षण लेखापरिक्षणात (Inspection Audit) उपस्थित परिच्छेदांना दिलेल्या अनुपालनास मान्यता देणेबाबत तसेच, सन २०१७-१८ ते सन २०२१-२२ या कालावधीतील कार्यक्षमता लेखापरिक्षण (Performance Audit) मध्ये उपस्थित परिच्छेदांना दिलेल्या अनुपालनास मान्यता देणेबाबत. | ८३ ते ८६ |
| ३२ | महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडील अतिरीक्त निधी राष्ट्रीयकृत बँकेत गुंतवणुक करण्यात आलेल्या कार्यवाहीस मंजुरी देणेबाबत. | ८७ ते ८९ |
| ३३ | महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडील उपकर जमा व योजनानिहाय खर्चास मंजुरी देणेबाबत. | ९० ते ९१ |
| ३४ | महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ | ९२ ते ९४ |

| अ.क्र. | बैठकीचा विषय | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| | यांचेकडून आर्थिक वर्ष २०२१-२२, २०२२-२३ व २०२३-२४ करीता कामगार कल्याण मंडळ, प्रभादेवी यांनी निधी व सभासद वर्गणी मिळणेबाबत विचारविनिमय करणे. | |
| ३५ | महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडील नोंदीत सक्रीय (जिवीत) बांधकाम कामगारांसाठी BOMT (Build Operate Manage Transfer) या तत्वावर आरोग्य तपासणी केंद्र व हॉस्पीटल उभारणी करणेबाबत. | ९५ ते ९९ |
| ३६ | मा. अध्यक्ष यांच्या मान्यतेने आयत्या वेळेचे विषय | १०० ते १०१ |

## महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या दिनांक ०२.०७.२०२४ रोजी संपन्न झालेल्या ६० व्या बैठकीचे इतिवृत्त.

मा. ना. श्री. सुरेश (भाऊ) दगडू खाडे, मंत्री (कामगार) तथा मा.अध्यक्ष, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची ६० वी बैठक मंगळवार दिनांक ०२.०७.२०२४ रोजी सकाळी ११.०० वा. यांचे मा. मंत्री (कामगार) तथा अध्यक्ष यांचे दालन नरीमन भवन, कफ परेड, कुलाबा, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस खालील सन्माननीय सदस्य बैठकीस उपस्थित होते.

| अ.क्र. | सदस्याचे नाव | पद |
|---|---|---|
| १. | मा. ना. श्री. सुरेश (भाऊ) खाडे | मा. मंत्री (कामगार) तथा मा.अध्यक्ष, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई |
| २. | मा. श्रीम. विनिता वेद सिंगल, प्रधान सचिव, कामगार | शासकीय प्रतिनिधी |
| ३. | मा. डॉ. एच. पी. तुम्मोड, कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य | शासकीय प्रतिनिधी |
| ४. | मा. श्री. दिपक पोकळे, उप सचिव काम-७ | शासकीय प्रतिनिधी |
| ५. | मा. श्री. विवेक शंकर कुंभार | सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई |

बैठकीच्या सुरुवातीस मंडळ सचिव यांनी मा. मंत्री (कामगार) तथा मा. अध्यक्ष, मा. प्रधान सचिव, कामगार विभाग मा. कामगार आयुक्त, मंडळ सदस्य या उपस्थितांचे स्वागत केले व बैठकीत करावयाच्या विषयांशी संबंधित कागदपत्रांचा संचाच्या प्रती सर्व उपस्थित सदस्यांना वाटप करण्यात आली.

तद्नंतर विषयसुचीनुसार चर्चेस सुरुवात करण्यात आली.

**विषय क्र.०१ :- महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाअंतर्गत नोंदीत सक्रीय (जिवीत) बांधकाम कामगारांकरीता गृहपयोगी वस्तु संचाचा पुरवठा करणेबाबत.**

याबाबत मंडळ सचिव यांनी सादर केले की, मंडळाच्या दिनांक ०३.०६.२०१९ रोजीच्या बैठकीत नोंदीत बांधकाम कामगारांना गृहपयोगी भाडयांचा संच व कपडयाचा संच वितरीत करणेबाबतचा प्रस्ताव मंडळाच्या बैठकीत पारित करण्यात आला होता.तथापि, खादी ग्रामोद्योग विभागाच्या दिनांक १७.१०.२०१९ रोजीच्या पत्रानुसार कपडयांचा संच वगळून केवळ गृहपयोगी वस्तू संच वितरीत करणेबाबत निर्णय मंडळाच्या दिनांक १३.०७.२०२० रोजीच्या ५५ व्या बैठकीत घेण्यात आला होता व त्यानुषंगाने निविदा प्रक्रिया राबविण्यात आली होती.

०२. केंद्र शासनामार्फत अधिनियमाच्या कलम ६० अंतर्गत वस्तु स्वरूपात सहाय्य वितरीत न करणेबाबत आदेश पारीत करण्यात आला होता त्यामुळे निविदा प्रक्रिया स्थगित करण्यात आली होती. दरम्यानच्या कालावधीत मा. मंत्री (कामगार) तथा मा.अध्यक्ष यांना नोंदीत बांधकाम कामगारांना वितरीत करावयाच्या गृहोपयोगी वस्तू संचाबाबत प्रस्ताव सादर करण्यात आला होता. त्यास मा मा. मंत्री (कामगार) तथा मा.अध्यक्ष यांनी मान्यता प्रदान केली होती. सदर मान्यतेच्या अनुषंगाने प्रस्ताव शासनास निर्णयार्थ दिनांक २४.११.२०२३ अन्वये सादर करण्यात आला होता. तसेच उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभागाच्या दिनांक ३०.११.२०२३ रोजीच्या अधिसूचने अन्वये महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगाराचे व सेवाशर्तीचे विनियमन) (सुधारणा) नियम २०२३ अधिसूचित करण्यात आले असून, त्यामध्ये गृहपयोगी वस्तू संच पुरवठा करणेबाबतचे कार्य नमूद असल्याने सदर प्रस्तावास शासनाने खालीलप्रमाणे दिनांक ०१.१२.२०२३ अन्वये मान्यता प्रदान केली आहे."मंडळाने नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांकरीता गृहपयोगी वस्तू संचाचा पुरवठा करण्याबाबत राबविलेल्या निविदा प्रक्रियेत गट क्र. ०१ (नागपूर व औरंगाबाद) व गट क्र.०२ (मुंबई, नाशिक, पुणे व अमरावती) करीता मे. मफतलाल इंडस्ट्रीज लिमिटेड, मुंबई यांनी सादर केलेले दर रू.८८२०/- (वस्तू व सेवा कर वगळून) हे सर्वात न्यूनत्तम (L१) दर असल्याने खरेदी समितीने मान्यता दिल्याप्रमाणे मे. मफतलाल इंडस्ट्रीज लिमिटेड, मुंबई यांना सदर कामाकरीता सादर केलेल्या दरास शासन मान्यता प्रदान करण्यात आली आहे. तसेच मंडळामार्फत राबविलेली निविदा प्रक्रिया आणि संबंधित निविदा (Bid) यांची वैधता कालावधीत तपासण्याच्या आणि निविदेतील दरात कोणत्याही प्रकारची वाढ होणार नाही या बाबींची खातरजमा करून पुढील योग्य ती कार्यवाही मंडळ स्तरावरून करण्यात यावी." अशी शासन मान्यता प्रदान करण्यात आली आहे. उपरोक्त मान्यतेनुसार संबंधित संस्थेसोबत करारनामा करून त्यांना विहित कार्यपध्दतीचा अवलंब करून दिनांक २९.०१.२०२४रोजी पुरवठा आदेश देण्यात आलेला आहे.

ठराव क्र.६०(१)/२०२४ :-

१. सुधारित नियम अधिसूचित झाल्याने, खरेदी समितीच्या बैठकीतील निर्णयानुसार गट क्र.०१ व गट क्र.०२ करीता मे. मफतलाल इंडस्ट्रीज लिमिटेड, मुंबई यांनी सादर केलेल्या न्यूनत्तम दर स्विकृतीस शासन मान्यतेने केलेल्या कार्यवाहीस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

२. मे. मफतलाल इंडस्ट्रीज लिमिटेड, मुंबई यांच्यासोबत करारनामा करणे व नियुक्त संस्थेस पुरवठा आदेश देण्याबाबत करण्यात आलेल्या कार्यवाहीस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

**विषय क्र.०२ :- महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाअंतर्गत कडील दिनांक १९.०५.२०२३ नंतर नव्याने नोंदणी/नुतणीकरण झालेल्या तथापि अद्याप संच वाटप न झालेल्या ३,९१,८५३ नोंदीत सक्रीय (जिवीत) बांधकाम कामगारांना अत्यावश्यक संच व सुरक्षा संच वितरीत करणेबाबत.**

याबाबत मंडळ सचिव यांनी सादर केले की, मंडळामार्फत नोंदीत सक्रीय (जिवीत) बांधकाम कामगारांना अत्यावश्यक संच व सुरक्षा संचाचे वाटप करण्यात येत होते. लगतच्या मुदतवाढ व लक्ष्यांकवाढ निर्णयाबाबतच्या दिनांक १९.०५.२०२३ रोजीच्या कार्यारंभ आदेशाच्या अनुषंगाने, ९,१४,५७७ लक्ष संच वाटप दिनांक ३१.०३.२०२४ पर्यंत पुर्ण करण्याचे लक्ष्यांक देण्यात आले होते.तथापि, सदरचे लक्ष्यांक जवळपास पुर्ण झाले असून, ३,९१,८५३ लक्ष संचाची नवीन मागणी निर्माण झाली होती. तसेच दिनांक ३०.११.२०२३ रोजी नव्याने अधिसूचित झालेल्या नियमामध्ये सुरक्षा संच व अत्यावश्यक संचाचा अंतर्भाव आहे. तथापि, मा.लोकसभेच्या आचारसंहिता कालावधीत नवीन निविदा प्रक्रिया करून संच वाटप करणे शक्य नसल्याने व पुरवठादार कार्यरत दरामध्ये पुरवठा करण्यास पुरवठा करण्यास तयार असल्याने एकूण ३,९१,८५३ लक्ष सुरक्षा व अत्यावश्यक संच वाटपाकरीता लक्ष्यांकवाढ व मुदतवाढ देण्याबाबतचा प्रस्ताव मा.मंत्री (कामगार) तथा मा.अध्यक्ष यांना सादर करण्यात आला होता.

२. मा.मंत्री (कामगार) तथा मा.अध्यक्ष यांच्या मान्यतेअंती प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला होता. त्यास शासनाने दिनांक ०१.०३.२०२४ रोजीच्या पत्रान्वये नोंदीत सक्रीय (जिवीत) बांधकाम कामगारांना ३,९१,८५३ संच (अत्यावश्यक संच व सुरक्षा संच प्रत्येकी) वाटपाचे अंतिम नवीन लक्ष्यांक पुर्ण करण्यास दिनांक ३१.०८.२०२४ अखेर अंतिम मुदतवाढ देण्यास शासन मान्यता प्रदान करण्यात आली आहे. तसेच दरम्यानच्या कालावधीत सुरक्षा संच व अत्यावश्यक संच वाटपाच्या कामाकरीता नवीन ई-निविदा प्रक्रिया राबविण्यास शासन मान्यता प्रदान करण्यात आली आहे. त्यास अनुसरून संबंधित संस्थासोबत करारनामा करून त्यांना विहित कार्यपध्दतीचा अवलंब करून दिनांक १५.०३.२०२४ रोजी पुरवठा आदेश देण्यात आलेले आहे.

**ठराव क्र. ६० (२)/२०२४ :-**

**दिनांक १९.०५.२०२३ नंतर नव्याने नोंदणी/नुतणीकरण झालेल्या तथापि, अद्याप संच वाटप न झालेल्या ३,९१,८५३ बांधकाम कामगारांना सुरक्षा व अत्यावश्यक संच वाटपाबाबत शासन मान्यतेने केलेल्या कार्यवाहीस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

**विषय क्र.०३ :- महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाअंतर्गत बांधकाम कामगारांची नोंदणी, नुतणीकरण व लाभ वाटपाच्या मदतीसाठी तालुका स्तरावर कामगार सुविधा केंद्र स्थापन करणेबाबत.**

याबाबत मंडळ सचिव यांनी सादर केले की, मंडळामार्फत बांधकाम कामगारांची नोंदणी, नुतनीकरण व लाभ वाटप सद्यस्थितीत ऑनलाईन पध्दतीने केले जात आहे. सदर कार्यवाहीकरीता मंडळ स्तरावर एकात्मिक संगणकीय प्रणाली विकसित करण्यात आली आहे त्याकरीता www.mahabocw.in हे संकेतस्थळ विकसित करण्यात आले आहे. बांधकाम कामगारांची नोंदणी, नुतनीकरण व लाभ वाटप सुलभरित्या होण्याकरीता जिल्हा स्तरावर जिल्हा सुविधा केंद्राची स्थापन करण्यात आली आहे. महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) नियम, २०२३ अंतर्गत नियमांमध्ये सुधारणा करण्यात आली असून बांधकाम कामगारांची नोंदणी, नुतनीकरण व लाभ वाटपाकरीता तालुका सुविधा केंद्र स्थापन करणे ही बाब नमूद आहे.

२. दैनंदिन बांधकाम कामगारांची संख्या वाढत असल्यामुळे तालुकास्तरावरील बांधकाम कामगारांची नोंदणी, नुतनीकरण व लाभ वाटपास गती देण्याकरीता तालुकास्तरावर सुविधा केंद्र स्थापन करणे प्रस्तावित आहे. तरी प्रस्तावितप्रमाणे बांधकाम कामगारांची नोंदणी, नुतनीकरण व लाभ सुलभरित्या होणेकरीता तालुका स्तरावर कामगार सुविधा केंद्र स्थापनेची (सेतू) कार्यवाही ई- निविदा पध्दतीने करणे व ई- निविदा पध्दतीने नियुक्त संस्थेमार्फत पुढील कार्यवाही करणेबाबतचा प्रस्ताव मा. अध्यक्ष तथा मंत्री (कामगार) यांना सादर करण्यात आला होता. त्यास मा. अध्यक्ष तथा मंत्री (कामगार) यांनी मान्यता प्रदान केली आहे. वरीलप्रमाणे मान्यतेनुसार दिनांक ०१.१२.२०२३ अन्वये शासनास प्रस्ताव सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावास उद्योग,उर्जा, कामगार व खनिकर्म विभाग यांच्या दिनांक १४.१२.२०२३ रोजीच्या पत्रान्वये मंडळातील बांधकाम कामगारांची नोंदणी, नुतनीकरण व लाभ वाटपाच्या मदतीसाठी तालुका स्तरावर कामगार सुविधा केंद्र स्थापन करणेच्या कामासाठी ई- निविदा पध्दतीने कार्यवाही करण्यास शासन मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. तद्नंतर खरेदी समितीमार्फत ई-निविदा प्रारूप अंतिम करून प्रसिध्द करण्यात आले.महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळातील बांधकाम कामगारांची नोंदणी, नुतनीकरण व लाभ वाटपाच्या मदतीसाठी तालुका स्तरावर कामगार सुविधा केंद्र स्थापन करणे या कामाच्या ई-निविदेअंतर्गत मे. आरसीएस इन्फोटेक प्रा.लि. या न्यूनत्तम निविदाकारांनी सादर केलेले दर रू. ३२१,६२,१५,७३४/- (कर वगळून) या अंतिम दरास मा. मंत्री (कामगार) मा. अध्यक्ष महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ मुंबई यांनी मान्यता प्रदान केली असून, शासन मान्यतेस्तव प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. सदर प्रस्तावास

शासनाने दिनांक १४.०३.२०२४रोजीच्या पत्रान्वये मान्यता प्रदान केली आहे. सदर मान्यतेच्या अनुषंगाने मे. आरसीएस इन्फोटेक प्रा.लि. या संस्थेसोबत करारनामा करून दिनांक १५.०३.२०२४ रोजी पुरवठा आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.

**ठराव क्र. ६० (३)/२०२४ :-**

**बांधकाम कामगारांची नोंदणी, नुतणीकरण व लाभ वाटप सुलभरीत्या होण्याकरीता तालुकास्तरावर कामगार सुविधा केंद्र स्थापनेबाबत शासन मान्यतेने केलेल्या कार्यवाहीस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

**विषय क्र.०४:- महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाअंतर्गत नोंदीत सक्रीय (जिवीत) बांधकाम कामगारांकरीता आरोग्य तपासणी चाचण्या सुधारीत करणे तसेच, "तपासणी ते उपचार आरोग्य योजना" राबविणेबाबत.**

याबाबत मंडळ सचिव यांनी सादर केले की, मंडळाकडील आरोग्य तपासणी योजनेअंतर्गत मंडळातील नोंदीत (सक्रिय) जिवीत बांधकाम कामगारांची व त्यांच्या अवलंबित कुटुंबामधील यथास्थिती पती /पत्नी आणि त्यांची १० वर्षावरील दोन अविवाहित अपत्ये यांची मे. एच. एच. एल. लाईफकेअर लिमिटेड या सेवापुरवठादार संस्थेमार्फत २३ आरोग्य तपासणी चाचण्या प्रतिव्यक्ती रू.३९०० दराने करण्याबाबत शासन मान्यता प्राप्त झालेली आहे. शासन मान्यतेनुसार मंडळ आणि मे. एच. एच. एल. लाईफकेअर लिमिटेड यांच्यामध्ये दिनांक २९.०६.२०२२ ते दिनांक २७.०६.२०२७ या पाच वर्षाच्या कालावधीकरीता करारनामा करण्यात आला आहे. त्यानुसार मंडळाच्या दिनांक ०१.०३.२०२३ व दिनांक ०२.०५.२०२३ अन्वये सेवा पुरवठादार संस्थेस कार्यारंभ आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.

२. मंडळाकडील नोंदीत (सक्रिय) जीवित बांधकाम कामगार व त्यांचेवर अवलंबित कुटुंबामधील यथास्थिती पती/पत्नी आणि त्यांची १० वर्षावरील २ अविवाहीत अपत्ये यांचेकरीता "तपासणी ते उपचार" (Test to Treat) आरोग्य योजना राबविणेबाबतचा प्रस्ताव मा.मंत्री (कामगार) तथा मा.अध्यक्ष यांना सादर करण्यात आला होता मा.मंत्री (कामगार) तथा मा.अध्यक्ष यांच्या मान्यतेअंती दिनांक १८.०५.२०२३ रोजीच्या पत्रान्वये शासनास प्रस्ताव सादर करण्यात आला होता.शासनाच्या दिनांक ३१.०५.२०२३ रोजीच्या पत्रान्वये मंडळाकडील नोंदीत सक्रीय (जिवीत) बांधकाम कामगारांकरीता तपासणी ते उपचार (Test to Treat) योजना राबविण्यास शासन मान्यता प्रदान करण्यात आली होती तसेच सदर योजना राबविण्याकरीता मे. एच. एच. एल. लाईफकेअर लिमिटेड (भारत सरकार उद्योग) यांच्या नियुक्तीस मान्यता प्रदान करण्यात आली होती.सदर शासन मान्यतेस अनुसरून सदर योजनेसंबंधित खालील बाबीच्या अनुषंगाने मंडळाने शासनास मान्यता घेण्यात यावी असे कळविण्यात आले होते.

अ) तपासणी ते उपचार (Test to Treat) या योजनेची एकंदरीत रूपरेषा

ब) सदर योजनेचे सविस्तर निकष (अटी व शर्ती)

क) सदर योजना राबविण्याकरीता मे. एच. एच. एल. लाईफकेअर लिमिटेड (भारत सरकार उद्योग) यांच्यासोबत करावयाचे कराराचे प्रारूप

३. उपरोक्त मुद्याबाबतची माहिती मंडळाच्या दिनांक ११.०७.२०२३ रोजीच्या पत्रान्वये शासनास सादर करण्यात आली होती.मंडळाकडील नोंदीत (सक्रिय) जिवीत बांधकाम कामगारांची व त्यांच्या अवलंबित कुटुंबियासाठी "तपासणी ते उपचार" आरोग्य योजना मे.

एच. एच. एल. लाईफकेअर लिमिटेड या सेवापुरवठादार संस्थेमार्फत राबविण्यास शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या दिनांक ०७.०८.२०२३ अन्वये मान्यता प्रदान करण्यात आली आहे.दरम्यान मंडळाच्या दिनांक ०८.०१.२०२४ रोजीच्या पत्रान्वये "नोंदीत, सक्रीय (जिवीत) बांधकाम कामगारास सार्वजनिक आरोग्य विभागाची "महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना" अथवा कामगार विभागाची "तपासणी ते उपचार" आरोग्य योजना यापैकी एक योजना निवडण्याच्या पर्यायाबाबतचा सुधारीत प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला होता. प्रस्तावित केल्याप्रमाणे उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग शासन शुध्दीपत्रक दिनांक ०९.०१.२०२४ अन्वये शासन मान्यता प्राप्त झाली आहे.मंडळाच्या दिनांक १२.०१.२०२४ रोजीच्या पत्रान्वये तपासणी ते उपचार आरोग्य योजनेचा कालावधी दिनांक ०९.०१.२०२४ रोजीचा शासन निर्णय निर्गमित झाल्यापासून पाच वर्ष करणे, नोंदीत बांधकाम कामगाराच्या १० वर्षाखालील अपत्यास अपघात व आजारावरील खर्चाची प्रतिपुर्ती करण्यास विशेष बाब म्हणून मान्यता, सदर योजनेची कमाल मर्यादा नोंदीत सक्रीय (जिवीत) बांधकाम कामगार तसेच त्याच्या कुटुंबामधील पती अथवा पत्नी व प्रथम दोन अपत्ये यापैकी प्रत्येक घटकास प्रति वर्षात रू.७.०० लक्ष इतकी निश्चीत करणेबाबत मार्गदर्शनार्थ प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला होता त्यास उद्योग, उर्जा व कामगार विभागाच्या दिनांक ०७.०२.२०२४ रोजीच्या पत्रान्वये मान्यता प्रदान केली आहे.मंडळाच्या दिनांक ०१.०२.२०२४ रोजीच्या पत्रान्वये सदर योजतनेअंतर्गत करावयाच्या चाचण्या, रूग्णालय भरतीबाबतच्या बाबी, औषोधोपचाराच्या बाबी, निश्चीत करण्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला होता. त्यास उद्योग, उर्जा व कामगार विभागाच्या दिनांक २१.०२.२०२४ रोजीच्या पत्रान्वये मान्यता प्रदान करण्यात करण्यात आलेली आहे."तपासणी ते उपचार" आरोग्य योजना अंमलबजावणीस वेळोवेळी प्राप्त शासन मान्यते अन्वये मंडळ व मे. एच. एच. एल. लाईफकेअर लिमिटेड (भारत सरकार उद्योग) यांच्यामध्ये सदर प्रकरणी दिनांक २१.०२.२०२४ रोजी करारनामा करण्यात आला असून मे. एच. एच. एल. लाईफकेअर लिमिटेड (भारत सरकार उद्योग) यांना दिनांक दिनांक २१.०२.२०२४ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आले आहे.

**ठराव क्र.६० (४)/२०२४ :-**

**१. नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगार व त्यांच्या कुटुंबियांकरीता आरोग्य तपासणीच्या चाचण्या सुधारीत करून रू.३९००/- मध्ये एकूण २३ चाचण्या करण्याबाबत शासन मान्येतेने केलेल्या कार्यवाहीस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**

**२. नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगार व त्यांच्या कुटुंबियांकरीता " तपासणी ते उपचार (Test to Treat) योजना" सुरू करण्याबाबत शासन मान्येतेने केलेल्या कार्यवाहीस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**

३. नोंदीत सक्रीय (जिवीत) बांधकाम कामगारास सार्वजनिक आरोग्य विभागाची महात्मा जोतिबा फुले जन आरोग्य योजना अथवा कामगार विभागाची तपासणी ते उपचार आरोग्य योजना या दोन योजनापैकी एक योजना निवडण्याचा विकल्प घेण्याबाबतची सुविधा देण्याबाबत शासन मान्यतेने केलेल्या कार्यवाहीस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

४. "तपासणी ते उपचार" आरोग्य योजनेचा कालावधी दिनांक ०९.०१.२०२४ रोजीचा शासन निर्णय निर्गमित झाल्यापासून पाच वर्ष करणे, नोंदीत बांधकाम कामगाराच्या १० वर्षाखालील अपत्यास अपघात व आजारावील खर्चाची प्रतिपुर्ती करण्यास विशेष बाब म्हणून मान्यता, सदर योजनेची कमाल मर्यादा नोंदीत सक्रीय (जिवीत) बांधकाम कामगार तसेच त्याच्या कुटुंबामधील पती अथवा पत्नी व प्रथम दोन अपत्ये यापैकी प्रत्येक घटकास प्रति वर्षात रू.७.०० लक्ष इतकी निश्चीत करणेबाबत शासन मान्येतेने केलेल्या कार्यवाहीस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

५. तपासणी ते उपचार" आरोग्य योजनेअंतर्गत करावयाच्या चाचण्या, रूग्णालय भरतीबाबतच्या बाबी, औषोधोपचाराच्या बाबी, निश्चीत करण्याबाबत प्रस्ताव शासनास सादर केलेल्या कार्यवाहीस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

**विषय क्र.०५:- महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगाराचे व सेवाशर्तीचे विनियमन) (सुधारणा) नियम २०१३ अधिक्रमित करून, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगाराचे व सेवाशर्तीचे विनियमन) (सुधारणा) नियम २०२३ करणेबाबत**

मंडळ सचिव यांनी सादर केले की, इमारत व इतर बांधकाम व्यवसायामध्ये हिताचे रक्षण करण्याच्या दृष्टीने केंद्र शासनाने इमारत व इतर बांधकाम कामगार अधिनियम (रोजगार नियमन व सेवाशर्ती) लागू केला असून त्याअंतर्गत महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) नियम, २००७ अस्तीत्वात आले आहे दिनांक ११.१०.२०१३ रोजीच्या अधिसुचनेव्दारे महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) (सुधारणा) नियम २०१३ प्रकाशीत करण्यात आले असून त्याव्दारे सद्यस्थितीत बांधकाम कामगारांकरीता राबविण्यात येणाऱ्या लाभाबाबतच्या योजना तयार करण्यात आल्या आहेत. त्यामुळे सदरची अधिसुचना अधिक्रमित करून नविन सुधारणा प्रकाशित करणे प्रस्तावित आहे.

२. केंद्र शासनाच्या इमारत व इतर बांधकाम कामगार अधिनियम (रोजगार नियमन व सेवाशर्ती), १९९६ मधील कलम (६२) व (४०) नुसार नियम करण्याचे अधिकार राज्य शासनास आहे तज्ञ समितीच्या शिफारशीनुसार महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) (सुधारणा) नियम २०१३ अधिक्रमित करून महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) (सुधारणा) नियम २०२३ अधिसूचित करणेबाबतचा प्रस्ताव दिनांक २२.०६.२०२३ रोजी शासनास सादर करण्यात आला होता. त्यानुषंगाने दिनांक ३०.११.२०२३ रोजीच्या अधिसुचनेअन्वये महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) (सुधारणा) नियम २०२३ प्रकाशीत करण्यात आले आहे.

**ठराव क्र. ६० (५)/२०२४ :-**

**तज्ञ समितीच्या महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगाराचे व सेवाशर्तीचे विनियमन) (सुधारणा) नियम २०१३ अधिक्रमित करून, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगाराचे व सेवाशर्तीचे विनियमन) (सुधारणा) नियम २०२३ करणेबाबत शासन मान्येतेने केलेल्या कार्यवाहीस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

**विषय क्र.०६ :- महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाअंतर्गत मुख्यालय व अधिनस्त जिल्हा कार्यालयाच्या अभिलेख कक्षाचे स्कॅनिंग ॲन्ड डिजिटायझेशन करून घेणे व कॉम्पेक्टर स्टोरेज उपलब्ध करून देणेबाबत.**

मंडळ सचिव यांनी सादर केले की, राज्यातील कामगार विभागाच्या कार्यालयातील अभिलेख सुस्थितीत स्कॅनिंग करून डिजिटल कॉपेक्टरमध्ये जतन करून ठेवण्याबाबतच्या प्रस्तावास मा.मंत्री (कामगार) तथा मा.अध्यक्ष यांनी प्रदान केलेल्या मान्यतेस अनुसरून उद्योग, उर्जा व कामगार विभाग यांच्या दिनांक २८.१२.२०२२ रोजीच्या पत्रान्वये मंडळ मुख्यालय व अधिनस्त जिल्हा कार्यालयाच्या अभिलेख कक्षाचे कॉम्पॅक्टर स्टोरेज व स्कॅनिंग ॲण्ड डिजिटायझेशन याकरीता ई- निविदा प्रसिध्द करणे या विषयी इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या बैठकीत पारित झालेल्या ठरावानुसार व विहीत कार्यपध्दती/ नियमानुसार कार्यवाही करणेबाबत शासन मान्यता प्रदान केली आहे.

२. सदर मान्यतेच्या अनुषंगाने स्थानापन्न संचालक शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय पुणे यांना तांत्रिक मान्यता व माहिती मिळणेबाबत मंडळाच्या दिनांक १८.११.२०२२ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले होते. त्याअनुषंगाने स्थानापन्न संचालक शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय पुणे यांनी त्यांच्या दिनांक १९.११.२०२२ रोजीच्या पत्रान्वये तांत्रिक मान्यता देण्यात आली आहे.स्थानापन्न संचालक शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय पुणे यांच्या दिनांक १९.११.२०२२ रोजीच्या पत्रात कळविलेल्या निकषाच्या अनुषंगाने जिल्हा सुविधा केंद्रात अभिलेख कक्ष अद्यावतीकरणास जिल्हा सुविधा केंद्राच्या उपलब्ध जागेत कॉपेक्टर स्टोरेज व स्कॅनिंग ॲण्ड डिजिटायझेशन करण्याबाबत कार्यालय निहाय उपलब्ध अभिलेख कक्षाची जागा व अभिलेख व्याप्ती लक्षात घेऊन कॉम्पेक्टरची संख्या निश्चित करून मंडळ कार्यालयामार्फत पत्रव्यवहार करण्यात आला आहे.शासन निर्णय उद्योग, उर्जा व कामगार विभाग दिनांक २४.०८.२०१७ मधील सूचना क्र.०१ नुसार केंद्र शासनाने विकसित केलेल्या गव्हर्मेंट ई- मार्केटप्लेस (GeM) पोर्टलची कार्यपध्दती राज्य शासनास वस्तू व सेवा खरेदी करण्यासाठी स्विकृत करण्यास मान्यता देण्यात आली आहे आणि शासन निर्णय दिनांक ०१.१२.२०१६ मधील परिच्छेद क्र.३.२.२ व ३.२.३ मध्ये सुधारणा करून GeM पोर्टलवर खरेदीसाठी उपलब्ध असलेल्या वस्तू व सेवांचे दोन किंवा त्यापेक्षा जास्त पुरवठादार असतील तर सदर वस्तू व सेवांची GeM पोर्टलवर खरेदी करण्यास राज्य शासन, राज्य शासनाचे सार्वजनिक उपक्रम, स्थानिक स्वराज्य संस्था, विधानसभेच्या कायदयाखाली स्थापित कोणतीही संस्था किंवा मंडळ किंवा महामंडळ इत्यादी कार्यालयांना बंधनकारक करण्यात आले आहे. त्यानुसार प्रस्तावित Mobile Compactor Storage Syestem and Document Management System (मोबाईल कॉपेक्टर स्टोरेज व अभिलेख स्कॅनिंग ॲण्ड डिजिटायझेशन करून घेणे) या कामाचे GeM पोर्टलवरील पुरवठादाराकडून वस्तू व

सेवांची गुणवत्ता, विनिर्देश आणि इत्यादी आवश्यक बाबी तपासून स्पर्धात्मक ऑनलाईन निविदेद्वारे (Online Bidding) खरेदी करणे प्रस्तावित होते.प्राप्त तीन निविदाकारांपैकी मे. ब्रेथवेट अॅन्ड कंपनी लि. व मे. सेन्ट्रल गर्व्हमेंट एम्प्लाईज कन्जुमर को.ऑ. सोसायटी (केंद्रीय भांडार) हे दोन निविदाकार केंद्रिय सार्वजनिक क्षेत्रामधील उपक्रमाअंतर्गत येत असून, पुर्व अनुभवाव्यतिरीक्त अन्य सर्व तांत्रिक बाबींची पुर्तता करत होते तथापि मे.सेफ अॅन्ड सिकयुरिटी सिस्टीम ही खाजगी संस्था असून, १५ तांत्रिक बाबीपैकी केवळ दोन बाबींची पुर्तता करत असल्याने त्याना अपात्र करण्यात आले तसेच मे. सेन्ट्रल गर्व्हमेंट एम्प्लाईज कन्जुमर को.ऑ. सोसायटी (केंद्रीय भांडार) या निविदाकाराने मागणी केलेले MSME उद्योगांना पूर्व अनुभवाच्या अटीतून सूट देणे हे राज्य शासनाच्या कार्यकक्षेत असल्याने त्याबाबत आदेशार्थ प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला होता. त्यास उद्योग, उर्जा व कामगार विभागाच्या दिनांक १८.०५.२०२३ रोजीच्या पत्रान्वये शासन मान्यता प्रदान केली आहे.मंडळ मुख्यालय व अधिनस्त जिल्हा कार्यालयाच्या अभिलेख कक्षाचे अद्यावतीकरणांतर्गत प्रस्तावित मोबाईल कॉम्पेक्टर स्टारेज व अभिलेख स्कॅनिंग अॅण्ड डिजिटायझेशन करून घेणेकरीता प्राप्त दरांच्या अंतिमिकरणासाठीचा प्रस्ताव शासन दिनांक ३१.०५.२०२३ रोजी शासन मान्यतेस सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावास शासनाने दिनांक १५.०६.२०२३ अन्वये मे. सेंट्रल गर्व्हमेंट एम्पलॉईज (केंद्रीय भांडार) यांनी सादर केलेले रू.१६.९५ लक्ष प्रति नग (एकूण ३१४.४२२५ कोटी) या न्यूनत्तम दराची निविदा स्विकृत करण्यात शासन मान्यता प्राप्त झाली आहे. सदर शासन मान्यतेच्या अनुषंगाने नियुक्त संस्थेसोबत केलेला करारनामा करून दिनांक ०४.०७.२०२३ अन्वये कार्यारंभ आदेश देण्यात आले आहेत.जिल्हा कार्यालयाच्या अभिलेख कक्षाचे अद्यावतीकरणांतर्गत प्रस्तावित मोबाईल कॉम्पेक्टर स्टारेज व अभिलेख स्कॅनिंग अॅण्ड डिजिटायझेशन करून घेणेकरीता अमरावती, अकोला, यवतमाळ, वाशिम व बुलडाणा करीता भारत संचार निगम लिमिटेड, अमरावती यांचे भाडेदर सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दरापेक्षा कमी असल्याने सदर जागा कॉम्पॅक्टर करीता भाडेतत्वावर घेण्यास मा. मंत्री (कामगार) मा. अध्यक्ष यांनी मान्यता प्रदान केली आहे.जिल्हा कार्यालयाच्या अभिलेख कक्षाचे अद्यावतीकरणांतर्गत प्रस्तावित मोबाईल कॉम्पेक्टर स्टारेज व अभिलेख स्कॅनिंग अॅण्ड डिजिटायझेशन करून घेणेकरीता नागपूर, भंडारा, चंद्रपूर व वर्धा करीता महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ यांनी सादर केलेल्या भाडेदराप्रमाणे सदर जागा कॉम्पॅक्टर करीता भाडेत्वावर घेण्यास मा. मंत्री (कामगार) मा. अध्यक्ष यांनी मान्यता प्रदान केली आहे.

ठराव क्र. ६० (६)/२०२४ :-

१. मंडळ मुख्यालय व क्षेत्रीय कार्यालयातील अभिलेख सुस्थितीत ठेवण्यासाठी जिल्हानिहाय मागणीप्रमाणे कॉम्पेक्टर स्टोरेज स्कॅनिंग अॅन्ड डिजिटायझेशन करण्याकरीता, ई-निविदा सुचना प्रसिध्द करून न्यूनतम निविदाकार मे. सेन्ट्रल गर्व्हमेंट एम्प्लाईज कन्जुमर को.ऑ. सोसायटी (केंद्रीय भांडार) यांचेसोबत करारनामा करणे व कार्यारंभ आदेश देण्याबाबत शासन मान्येतेने केलेल्या कार्यवाहीस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

२. अमरावती, अकोला, यवतमाळ, वाशिम व बुलडाणा करीता भारत संचार निगम लिमिटेड, अमरावती यांचे भाडेदर सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दरापेक्षा कमी असल्याने सदर जागा कॉम्पॅक्टर करीता भाडेतत्वावर घेण्याबाबत केलेल्या कार्यवाहीस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

३. नागपूर, भंडारा, चंद्रपूर व वर्धा करीता महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ यांनी सादर केलेल्या भाडेदराप्रमाणे सदर जागा कॉम्पॅक्टर करीता भाडेतत्वावर घेण्याबाबत केलेल्या कार्यवाहीस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

**विषय क्र.०७ :- महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाअंतर्गत नोंदीत बांधकाम कामगारांसाठी नाक्याच्या ठिकाणी शेड उभारणेबाबत**

मंडळ सचिव यांनी सादर केले की, मंडळाच्या दिनांक १२.१२.२०२२ रोजीच्या बैठकीत राज्यातील महानगरपालिका/ नगरपालिका क्षेत्रात बांधकाम कामगारांकरीता नाक्याच्या ठिकाणी शेड उभारणेबाबत प्रस्ताव सादर करण्यात आला होता. त्यास अनुसरून राज्यातील महानगरपालिका/ नगरपालिका क्षेत्रात बांधकाम कामगारांकरीता नाक्याच्या ठिकाणी तात्पुरत्या स्वरूपात शेड उभारणे या योजनेस मंडळाने तत्वत: मान्यता प्रदान केली असून, महानगरपालिका/ नगरपालिका/ नगरपंचायत यांच्याकडून जागेचा तपशील प्राप्त होताच पुढील कार्यवाही करण्याबाबतचा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला.

२. नाक्याच्या ठिकाणी नाका शेड उभारणेकरीता ई- निविदा पध्दतीने कार्यवाही करणे व ई- निविदा पध्दतीने नियुक्त संस्थेमार्फत पुढील कार्यवाही करणेबाबत टिप्पणी मा. अध्यक्ष तथा मंत्री (कामगार) यांना सादर करण्यात आली होती. त्यास मा. अध्यक्ष तथा मंत्री (कामगार) यांनी मान्यता प्रदान केली आहे. वरीलप्रमाणे मान्यतेनुसार दिनांक ०१.१२.२०२३ अन्वये शासनास प्रस्ताव सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावास उद्योग,उर्जा, कामगार व खनिकर्म विभाग यांच्या दिनांक १४.१२.२०२३ रोजीच्या पत्रान्वये नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांसाठी नाक्याच्या ठिकाणी शेड उभारण्याच्या कामासाठी खालील मुद्दयांच्या अधीन राहून ई- निविदा पध्दतीने कार्यवाही करण्यास शासन मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

(अ) मंडळांतर्गत नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांसाठी कामगार नाका शेड उभारण्यासाठी जागा आणि ठिकाणाची उपलब्धता

(ब) बांधकाम कामगारांसाठी उभारण्यात येणाऱ्या कामगार नाका शेडचे आकारमान, संपूर्ण आराखडा व त्यासाठी लागणारा अंदाजित खर्च (प्रती नाका)

(क) बांधकाम कामगारांसाठी उभारण्यात येणाऱ्या कामगार नाका शेडमध्ये उभारण्यात येणाऱ्या सोयी सुविधा

(ड) कामगार नाका शेड उभारल्यानंतर त्याची देखरेख, देखभाल दुरूस्ती याबाबत लागणारा खर्च आणि त्यासाठी मंडळावर येणारा आर्थिक भार

वरीलप्रमाणे शासन मान्यतेच्या अनुषंगाने मंडळातील बांधकाम कामगारांकरीता नाक्याच्या ठिकाणी शेड उभारणे या कामाच्या ई- निविदेवर चर्चा करण्याकरीता मा. कामगार आयुक्त मा. अध्यक्ष, खरेदी समिती यांच्या अध्यक्षतेखालील खरेदी समितीची बैठक दिनांक २७.१२.२०२३ बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीत नाका शेड उभारणी हे बांधकाम स्वरूपाचे काम असून तांत्रिक मान्यता व निविदेची अंदाजित किंमत व न्यूनत्तम दर धारकाच्या दरांची तुलना करण्यासाठी प्रती नाका शेड उभारणीचे दर आवश्यक असल्याने

निविदा प्रारूपामधील (RFP) कामाची व्याप्तीनुसार (Scope of Work) प्रती नाका शेड उभारणीचे (Per Labour Shed) बाबनिहाय अंदाजपत्रक मंडळ व शासन मान्यतेने यापूर्वी तयार करण्यात आलेले नाका शेड च्या ई- निविदेतील नमूद अटी व शर्ती नुसार प्रति नाका शेड रू.७.८८ लक्ष (वस्तू व सेवाकर वगळून) (अंदाजपत्रकाचा तपशील संलग्न) संपूर्ण महाराष्ट्रात महानगरपालिका/ नगरपालिका/ कटक मंडळे इत्यादी सुमारे १००० नाका शेड उभारणीकरीता नवीन निविदा अर्जाचा मसुदा तयार करण्यात आला आहे. सदर ई- निविदा अर्जाचा मुसदा मंडळाच्या दिनांक ०२.०२.२०२४ रोजीच्या पत्रान्वये शासन मान्यतेस्तव सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावास शासनाने दिनांक ०७.०२.२०२४ रोजीच्या पत्रान्वये मान्यता प्रदान केली आहे.

**ठराव क्र.६० (६)/२०२४ :-**

**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळांतर्गत नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांसाठी नाक्याच्या ठिकाणी शेड उभारण्याची कार्यवाही ई- निविदा पध्दतीने शासनास प्रस्ताव सादर करण्याबाबत केलेल्या कार्यवाहीस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

**विषय क्र.०८ :- महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ मुख्यालयाची सद्यस्थितीतील भाडे तत्वावरील जागेची मुदत माहे जुन २०२४ अखेर संपुष्टात येणार असल्याने मंडळासाठी एम. एम. टी. सी. हाऊस येथील तळमजला, पाचवा मजला येथील जागेस मुदतवाढ देण्यास व चौथा मजला नव्याने भाडयाने घेणेबाबत.**

मंडळ सचिव यांनी सादर केले की, मंडळाच्या दिनांक २९.११.२०२३ रोजीच्या पत्र व वेळोवेळी प्रत्यक्ष भेटी व दूरध्वनीवरून मंडळ मुख्यालयाकरीता एमएमटीसी हाऊस येथील ०५ व्या मजल्यावरील करारनाम्याची मुदत दिनांक ३०.०६.२०२४ पर्यंत वैध असल्याने मंडळ स्तरावरून ०४ था मजला, ०५वा मजला व तळमजल्यावरील काही भाग भाडेतत्वावर मिळणेकरीता एमएमटीसी प्रशासनाकडे विनंती करण्यात आली होती.मंडळ मुख्यालयामार्फत कराराव्दारे मे.एमएमटीसी हाऊस, (केंद्र शासनाचा उपक्रम) येथील पाचवा मजला ४४४८ स्क्वेअर फूट व तळमजला १३७८ स्क्वेअर फूट जागा मंडळाने दिनांक १६.१०.२०१९ ते दिनांक ३०.०६.२०२४ या पाच वर्षाच्या कालावधीकरीता भाडेतत्वावर घेतली आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| **अ.क्र.** | **जागा तपशील** | **जागेचे क्षेत्रफळ चौ.फूट** | **प्रति चौ.फूट दर (०१.०४.२०२२ ते दिनांक ३०.०६.२०२४ अखेर)** | **प्रत्यक्ष मासिक भाडे खर्च दरमहा (वस्तू सेवा करांसहीत)** |
|---|---|---|---|---|
| १ | ०५ वा मजला एमएमटीसी हाऊस, वांद्रे कुर्ला कॉम्पलेक्स वांद्रे पूर्व | ४४४८ | रू.३२३.७३/- + १८% GST =३८२.०० | १६,९९,१४२/- |
| २ | तळमजला मजला एमएमटीसी हाऊस, वांद्रे कुर्ला कॉम्पलेक्स वांद्रे पूर्व | १३८८.३६ | रू.३२३.७३/- + १८% GST =३८२.०० | ५,२६,५३५/- |
| | **एकूण** | **५८३६.३६** | | **२२,२५,६७७/-** |

२. मंडळ मुख्यालयामार्फत बांधकाम कामगारांची नोंदणी, नुतनीकरण, योजनांची अंमलबजावणी करणे तसेच जिल्हा व विभागीय कार्यालयावर संनियत्रण करण्यासाठी पूर्णवेळ अधिकारी, कंत्राटी कर्मचारी सेवानिवृत्त अधिकारी यांच्या बैठक व्यवस्थेसाठी व अभिलेख कक्षासाठी सदरील ०५ व्या मजल्यावरील जागा अपुरी पडत असल्याने ०४ थ्या मजल्यावरील जागा भाडयाने घेण्याबाबत मा.मंत्री (कामगार) तथा मा.अध्यक्ष महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १२.१२.२०२२ रोजी संपन्न बैठकीत मान्यता प्रदान केली होती.

३.	मंडळाच्या दिनांक २९.११.२०२३ रोजीच्या पत्रान्वये मंडळ मुख्यालयाकरीता एमएमटीसी हाऊस येथील ०५ व्या मजल्यावरील करारनाम्याची मुदत दिनांक ३०.०६.२०२४ पर्यंत वैध असल्याने मंडळ स्तरावरून ०४ था मजला, ०५वा मजला व तळमजल्यावरील काही भाग भाडेतत्वावर घेणेकरीता विनंती करण्यात आली होती. सदर विनंतीच्या अनुषंगाने मे.एमएमटीसी हाऊस, केंद्र शासनाचा उपक्रम यांनी त्यांच्या दिनांक ०१.०३.२०२४ रोजीच्या पत्रान्वये खालीलप्रमाणे मान्यता प्रदान केली आहे.

- पाचव्या मजल्यावरील करारनाम्यास ०३ वर्षाची मुदतवाढ देण्यात येत आहे. (दिनांक ०१.०७.२०२४ ते दिनांक ३०.०६.२०२७)
- एकूण भाडेतत्वावरील जागा १०,२७४ स्क्वेअर फूट (०४ था मजला ४४४८ स्क्वेअर फूट, पाचवा मजला ४४४८ स्क्वेअर फूट व तळमजला १३७८ स्क्वेअर फूट) उपलब्ध आहे.
- वरील प्रमाणे नमूद जागेचा दर प्रति स्क्वेअर फूट रू.२८७/-, प्रति माह असे नमूद आहे.
- ४ थ्या मजल्यावरील फर्निचरींग कामकाजाकरीता ४५ दिवसांचा Moratorium कालावधी देण्यात येत आहे.
- इतर अटी व शर्ती मध्ये यापूर्वी करण्यात आलेल्या लिव्ह अँड लायसन्स नुसार कोणताही बदल केला जाणार नाही असे नमूद आहे.

दरम्यानच्या कालावधीत प्रादेशिक कार्यकारी अधिकारी, कोकण विभाग, कामगार उप आयुक्त, मुंबई शहर, मुंबई उपनगर (पुर्व) व मुंबई उपनगर (पश्चिम) या कार्यालयांच्या कामगार सुविधा केंद्राकरीता एकत्रितरीत्या जागेची आवश्यकता असल्याचे समजते त्यामुळे मंडळ मुख्यालयाकरीता तळमजला व पाचवा मजला तसेच उपरोक्त कार्यालयाकरीता चौथा मजला उपलब्ध होणे प्रस्तावित आहे. तळमजला, चौथा व पाचवा मजला भाडेतत्वावर घेतल्यास त्याबाबतचा खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | तपशील | जागेचे क्षेत्रफळ | प्रत्यक्ष मासिक खर्च दरमहा (वस्तू सेवा करांसहीत) |
|---|---|---|---|
| १ | ०५ वा मजला एमएमटीसी हाऊस, वांद्रे कुर्ला कॉम्पलेक्स वांद्रे पूर्व | ४४४८ स्क्वेअर फूट | १५,०६,३६०/- |
| २ | ०४ था मजला एमएमटीसी हाऊस, वांद्रे कुर्ला कॉम्पलेक्स वांद्रे पूर्व | ४४४८ स्क्वेअर फूट | १५,०६,३६०/- |
| ३ | तळमजला मजला एमएमटीसी हाऊस, वांद्रे कुर्ला कॉम्पलेक्स वांद्रे पूर्व | १३८८.३६ स्क्वेअर फूट | ४,७०,१८२ |
| ४ | विद्युतशुल्क | १०२८४.३६ | ३,००,००० |
| ५ | इलेक्ट्रीक मेंटेनन्स | १०२८४.३६ | २७,४९४ |
| | **एकूण** | **१०२८४.३६** | **३८,१०,३९६** |

ठराव क्र.६० (८)/२०२४ :-

मंडळ मुख्यालयाची सद्यस्थितीतील भाडे तत्वावरील जागेची मुदत माहे जून २०२४ अखेर संपुष्टात येणार असल्याने, मंडळासाठी एम.एम.टी.सी. हाऊस येथील तळमजला व पाचवा मजला येथील जागेस मे, २०२७ अखेर मुदतवाढ देणे तसेच मंडळ मुख्यालय व आवश्यकतेनुसार बृहन्मुंबई क्षेत्रातील जिल्हा कामगार सुविधा केंद्र व प्रादेशिक कार्यालयाकरीता चौथा मजला नव्याने भाडयाने घेणेबाबत एम. एम. टी. सी. हाऊस (केंद्र शासनाचा उपक्रम) यांनी देऊ केलेल्या दराने मे, २०२७ अखेर भाडयाने घेण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

**विषय क्र.०९ :- महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाअंतर्गत जिल्हा कामगार सुविधा केंद्र स्थापन करणेकरीता मंडळामार्फत नियुक्त मे.टेक्नोक्राफ्ट असोसिएटस यांना मुदतवाढ देणेबाबत.**

मंडळ सचिव यांनी सादर केले की, मंडळांतर्गत मुख्यालय, ०६ विभागीय कार्यालये व ३५ जिल्हा कामगार सुविधा केंद्र स्थापन करणेकरीता ई-निविदा दिनांक १४.०१.२०१९ अंतर्गत निवड करण्यात आलेल्या एजन्सी मे. टेक्नोक्राफट असोसिएट, माहिम (पश्चिम), मुंबई संस्थेसोबत मंडळाने दिनांक २७.०५.२०१९ रोजी रीतसर करारनामा केला आहे. सदर करारनाम्यातील अट क्र. ७.१२ नुसार कराराचा कालावधी दिनांक २७.०५.२०१९ ते २६.०५.२०२२ असा ३ वर्ष असून पुढील २ वर्ष मंडळ व एजन्सी यांच्या परस्पर संमतीने पुढील वाढीव कालावधीसाठी करारनाम्यास मुदतवाढ करण्याची तरतूद आहे.माहे मे २०२२ या ३ वर्ष कालावधीत मंडळ व एजन्सी यांचे परस्पर समन्वयाने राज्यात मंडळ मुख्यालयासह एकुण ३३ ठिकाणी विभागीय/जिल्हा कामगार सुविधा केंद्र (WFC) स्थापनेची/उभारणेची कार्यवाही पूर्ण झालेली आहे. उर्वरित ठिकाणी जिल्हा कामगार सुविधा केंद्र उभारणीचे कामकाज प्रलंबित आहे. मे. टेक्नोक्राफट असोसिएट यांनी करारनाम्यावेळी सर्व जिल्हा कामगार सुविधा केंद्र (WFC) उभारणीचे मुल्यावर आधारीत परिगणित केलेली बँक गॅरंटी ही जमा केली आहे.तसेच मंडळाचे विस्तारीत कार्यालय नरीमन भवन कुलाबा, मुंबई या भाडेतत्वावर घेतलेल्या जागेमध्ये (WFC) स्थापनेअंतर्गत मंजूर फर्निचर व नुतणीकरण काम करून घेणे प्रस्तावित आहे. त्यानुसार मुळ करारनाम्यातील प्रलंबित ०९ जिल्हा कामगार सुविधा केंद्र (WFC) व वाढीव काम नरिमन भवन येथील विस्तारीत कार्यालयाकडील काम असे एकुण १० कामे प्रस्तावित आहे, सदर कामाचे अंदाजित मुल्य ४.९० कोटी इतके अपेक्षित आहे, त्याबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे :-

| Sr. No. | Particular | Amount in Rs. |
|---|---|---|
| १ | Total Project Cost without Taxes | २१,०५,८६,३४६ |
| २ | Per Location Cost considering ४३ Locations | ४८,९७,३५७ |
| ३ | Total Number of Locations to be covered as per agreement | ४३ |
| ४ | Total Number of Locations where WFC Construction is completed | ३४ |
| ५ | Number of WFC to be covered under Extended duration of agreement | ९ |
| ६ | Furniture and Interior work (as per items | १ |

| Sr. No. | Particular | Amount in Rs. |
|---|---|---|
| | mentioned in LOI ) in extension office at Nariman Bhavan, Mumbai | |
| ७ | Total Number of WFC to be covered under Extended duration of agreement | १० |
| ८ | Total Project Value of New WFC under Extended duration of agreement | ४,८९,७३,५६९ |

२. मा. लोकप्रतिनिधीची मागणी व मंडळाकडील जिल्हा कामगार सुविधा केंद्र (WFC) उभारणेची प्रशासकीय निकड पाहता उर्वरीत जिल्हा कामगार सुविधा केंद्र (WFC) उभारणी कामकाजासाठी करारनाम्यातील अट क्र.७.४ नुसार एजन्सीचे कामकाज समाधानकारक असलेस मंडळ व एजन्सी यांच्या परस्पर संमतीने पुढील वाढीव कालावधीसाठी करारनाम्यास मुदतवाढ करण्याची तरतूद आहे. त्यानुसार मे. टेक्नोक्राफट असोसिएट, मुंबई या एजन्सीने मागील ३ वर्ष केलेले काम समाधानकारक असून उर्वरीत जिल्हा कामगार सुविधा केंद्र (WFC) उभारणीच्या प्रलंबित कामकाजासाठी मे. टेक्नोक्राफट असोसिएट, मुंबई यांना माहे मे २०२२ पासून पुढील २ वर्ष कालावधीकरीता मुदतवाढ देणे प्रस्तावित आहे.उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या दिनांक ०१.१२.२०१६ रोजीच्या शासन निर्णयानुसार पुर्वी दिलेल्या आदेशाच्या संदर्भात पुर्नप्रत्ययी आदेश सुरवातीचा आदेश दिल्यानंतर सहा महिन्याच्या कालावधीच्या पुर्वी देता येईल अशी तरतूद नमूद आहे.यास्तव संबंधित एजन्सीची सदर मुदतवाढीस लेखी संमती असलेस वाढीव कालावधीचा करारनामा प्रारूप व मंडळाचे विस्तारीत कार्यालय नरीमन भवन कुलाबा, मुंबई येथील WFC च्या धर्तीवर प्रस्तावित फर्निचरींग व रिनोव्हेशन कामकाजाचे अंदाजित करारनामा मुल्य रू.४.९० कोटीच्या ५% मर्यादेत पूर्णांकांत रू. २५ लक्ष सुरक्षा अनामत रक्कम सदर एजन्सीकडून राष्ट्रीयकृत बँकेची बँक गॅरटी स्वरूपात मंडळाकडे जमा करणेस मा. मंत्री (कामगार) मा. अध्यक्ष यांनी मान्यता प्रदान केली आहे.वरीलप्रमाणे दिलेल्या मान्यतेच्या अनुषंगाने मंडळाच्या दिनांक ०६.०२.२०२४रोजीच्या पत्रान्वये रू.२५.०० लक्ष रक्कमेची राष्ट्रीयीकृत बँकेची बँक गॅरटी जमा करणेबाबत कळविले आहे. त्यानुसार मे. टेक्नोक्राफट असोसिएट, मुंबई यांनी रक्कम रू.२५.०० लक्ष रक्कमेची मे. स्टेट बँक ऑफ इंडिया बँकेची गॅरटी मंडळ मुख्यालयात सादर केली आहे. मा. अध्यक्ष तथा मंत्री (कामगार) यांच्या मान्यतेने वाढीव कालावधीसाठी मुदतवाढ व करारनामा करण्यास मंजूरी आहे.

ठराव क्र.६० (९)/२०२४ :-

मुंबई (नरीमन भवन), मुंबई उपनगर (पश्चिम), ठाणे, चंद्रपूर, अकोला, नाशिक, जळगांव, पुणे, सातारा, इचलकरंजी पैकी अकोला जिल्हयात सुविधा केंद्र स्थापनेची कार्यवाही करण्यात आली असून उर्वरित ठिकाणी सुविधा केंद्र स्थापनेची कार्यवाही करणे शिल्लक असल्याने मे. टेक्नोक्राफ्ट असोसिएटस यांना मुदतवाढीस व करारनामा याबाबत केलेल्या कार्यवाहीस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

**विषय क्र. १०:- महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळामार्फत नोंदीत सक्रीय (जिवीत) बांधकाम कामगारांना देण्यात येणाऱ्या विविध सुविधांचे सनित्रंण करण्यासाठी संगणक प्रणाली (Dashboard) विकसीत करणेबाबत.**

मंडळ सचिव यांनी सादर केले की, मंडळाकडील बांधकाम कामगार नोंदणी, नुतनीकरण आणि लाभ वाटप दावे, बांधकाम उपकर बँक खात्यावर संकलन, क्षेत्रिय कार्यालयाकडून माहिती संकलन, खर्च सनियंत्रण, बांधकाम उपकर अधिनियमांतर्गत संबंधित कार्यालयीन यंत्रणा/ आस्थापना यांच्या नोंदणीचे व्यवस्थापन इत्यादी करीता विकसित करण्यात आलेल्या विविध संगणक प्रणाली/ कार्यपध्दतीमध्ये माहिती संकलन, माहितीची छाननी, तपासणीकरीता मंडळ कर्मचाऱ्यांचा होत असलेला कालपव्यय, तसेच, सदर संगणक प्रणाली/ कार्यपध्दती मध्ये संबंधित यंत्रणाची नोंदणी आणि बांधकाम कामगारांची नोंदणी यामध्ये सहसंबंध दर्शविणारी तसेच मंडळाच्या विविध संगणक प्रणाली/ कार्यपध्दती मध्ये सहसंबंध दर्शविणारी कोणतीही यंत्रणा सध्या अस्तित्वात नसल्याने व माहिती संकलनासाठी होत असलेला विलंब, मानवी कार्यान्वयाच्या मर्यादा तसेच विश्लेषण आणि मंडळाच्या विविध कल्याणकारी योजनांशी संबंधित विस्तृत माहिती संकलनातील मर्यादा, Real Time Data न मिळणे, अपुरा डाटा इत्यादी मर्यादा व त्रुटी दूर करण्यासाठी Single Dashboard प्रणाली विकसित करणे आवश्यक होते.

२. मा. मंत्री (कामगार) तथा मा.अध्यक्ष यांच्या दिनांक १५.०३.२०२३ च्या मान्यतेने शासन निर्णय उद्योग, उर्जा व कामगार विभाग दिनांक १.१२.२०१६ मधील नियम क्र.४.४.२.(४) नुसार Selecting Agency for Implementation, Operation, Hosting, Maintenance and support of Data warehousing, Data Analytics and visual Analytics platform at MBOCWW Board या ई- निविदा सूचनेची जाहिरात एका राष्ट्रीय व एका राज्यस्तरीय वर्तमानपत्रात दिनांक २०.०३.२०२३ रोजी माहिती व जनसंपर्क संचालनालयामार्फत प्रसिध्दीस देण्यात आली होती व सदर निविदेच्या वेळापत्रकानुसार दिनांक २१.०३.२०२३ रोजी www. Mahatender.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली होती. मा. अध्यक्ष, खरेदी समिती यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २७.०२.२०२३ रोजी पार पडलेल्या खरेदी समितीच्या बैठकीमध्ये सदर ई- निविदा अर्जाचे प्रारूप अंतिम करून ई-निविदा प्रसिध्द करण्यात आली.ई-निविदा प्रक्रियेअंती खालील ०३ निविदाकारांना खरेदी समितीने सर्वानुमते तांत्रिकदृष्टया पात्र ठरविले आहे.

| | |
|---|---|
| i. | Diagonal Consulting LLP Consortium Member, Neplar Solution Pvt. Ltd. |
| ii. | Exponetia.ai Pvt. Ltd. |
| iii. | Mahapatra Universal Ltd. Consortium Member Instalogic Solution Pvt. Ltd. |

शासन निर्णय उद्योग, उर्जा व कामगार विभाग दिनांक ०१.१२.२०१६ मधील ४.५.२ नुसार M/s. Mahapatra Universal Ltd. Consortium Member Instalogic Solution Pvt. Ltd. या निविदाकारांनी सादर केलेले दर रू. १५,००,४०,४६९/- (पंधरा कोटी चाळीस हजार चारशे एकोणसत्तर फक्त) हे सर्वात न्यूनत्तम (L१) दर असल्याने व उपरोक्त नमूद शासन निर्णयातील नियम ३.१.२.१ व ४.४.३.१ नुसार सदर दर निविदेचे अंदाजित मूल्य रू. १५ कोटीच्या (-) २० टक्के ते (+) १० टक्के या वेतनश्रेणीमध्ये (Price Band) असल्याने सदरचे दर मान्य करून सदर निविदेसाठी M/s. Mahapatra Universal Ltd. Consortium Member Instalogic Solution Pvt. Ltd. यांनी सादर केलेला दर अंतिम करण्याबाबत मा.मंत्री (कामगार) मा. अध्यक्ष यांच्या मान्यतेने प्रस्ताव शासन मान्यतेस्तव सादर करण्यात आलेला आहे. त्यास दिनांक १४.०३.२०२४ रोजीच्या पत्रान्वये मान्यता प्रदान करण्यात आली आहे. सदर मान्यतेच्या अनुषंगाने M/s. Mahapatra Universal Ltd. Consortium Member Instalogic Solution Pvt. Ltd. या संस्थेसोबत करारनामा करून दिनांक १५.०३.२०२४ रोजी पुरवठा आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.

**ठराव क्र.६० (१०)/२०२४ :-**

**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळामार्फत नोंदीत सक्रीय (जिवीत) बांधकाम कामगारांना देण्यात येणाऱ्या विविध सुविधांचे सनित्रंण करण्यासाठी संगणक प्रणाली (Dashboard) विकसीत करणेबाबत ई-निविदा प्रक्रिया राबवून न्यूनतम निविदाकार मे. महापात्रा युनिवर्सल लि. Consortium Member Instalogic Solution Pvt.Ltd. यांचेसेबत करारनामा करणे व पुरवठा आदेश देण्याबाबत शासन मान्यतेने केलेल्या कार्यवाहीस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

**विषय क्र. ११:- महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाअंतर्गतच्या पूर्व शिक्षण प्रशिक्षण (RPL) या प्रशिक्षण कार्यक्रमाकरीता माहिती व तंत्रज्ञान आधारीत विविध कामकाजाकरीता माहिती तंत्रज्ञान संचालनालयाच्या सूचीबद्ध संस्थामधून एका संस्थेची निवड करणेबाबत.**

मंडळ सचिव यांनी सादर केले की, मंडळाकडील आयटीविषयक कामकाजाबाबत समन्वयाकरीता ०२ व मंडळाच्या मुख्यालयाकरीता ०२ अशा ०४ सल्लागारांची नेमणूक करण्याचा मंडळाच्या ५६ व्या बैठकीत पारीत करण्यात आलेल्या ठरावाच्या अनुषंगाने सन २०२०-२१ मध्ये शासनाच्या माहिती व तंत्रज्ञान (सा.प्र.वि.) विभागाकडील पॅनलवरील सल्लागार संस्था मे. ग्रॅन्ट थॉर्न्टन (Grant Thornton) या संस्थेची नियुक्ती करण्यात आली होती. सदर नियुक्तीचा कालावधी दिनांक २७.११.२०२३ पर्यंत होता.

२. उद्योग,ऊर्जा व कामगार विभागाच्या दिनांक १४.०३.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये बाह्ययंत्रणेकडून कामे करुन घेण्यासाठी ०९ सेवापुरवठादारांच्या पॅनलला मनुष्यबळाच्या वर्गवारीनुसार मनुष्यबळ पुरवठा करण्यासाठी शासन मान्यता देण्यात आलेली आहे. तसेच उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या दिनांक ०५.०७.२०२३ रोजीच्या पत्रान्वये कामगार विभागाच्या अधिनस्त असलेल्या प्रस्तावनेत नमूद विविध कार्यालयासाठी बाहय यंत्रणेव्दारे मनुष्यबळ घेण्यासाठी मे.एस-२ इन्फोटेक इंटरनॅशनल लि. या संस्थेच्या नियुक्तीस दिनांक १४.०३.२०२३ व दिनांक ०९.०५.२०२३ येथील शासन निर्णयान्वये विहित केलेल्या अटीच्या अधीन राहून मान्यता देण्यात आली होती. त्यामुळे मंडळाच्या आयटीविषयक कामकाजासाठी नेमण्यात आलेल्या वरील ०४ सल्लागारांच्या सेवा स्वतंत्ररित्या चालू राहतील अथवा कामगार विभागाच्या बाहय यंत्रणेमार्फत मनुष्यबळ पुरवठा करण्यासंदर्भातील उपरोक्त दिनांक १४.०३.२०२३ च्या शासन निर्णयातील तरतूदीनूसार नव्याने नियुक्त्या कराव्या लागतील याबाबत शासनास मार्गदर्शनार्थ प्रस्ताव सादर करण्यात आला होता. त्याअनुषंगाने माहिती तंत्रज्ञान संचालनालय, दिनांक ०५.१०.२०२३ अन्वये शासन निर्णयातील तरतूदी विचारात घेऊन, मंडळाअंतर्गत माहिती तंत्रज्ञान सल्लागार नियुक्त करण्यासाठी उचित कार्यवाही करण्यात यावी असे निर्देश दिलेले आहे.मंडळाकडील IT Based कामकाजासाठी कामकाज व्याप्ती (Scope of Work) नुसार MBOCW Project Management Unit साठी Principal Consultant ०२ व Senior Consultant ०२ व Recognition of Prior Learning (RPL) Program साठी Senior Consultant ०१ व Associate Consultant ०२ अशी एकुण ०७ मनुष्यबळाच्या सेवा आवश्यक आहेत त्यांचे खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे :-

| अ.क्र. | मनुष्यबळ प्रकार | प्रस्तावित आवश्यक संख्या | मासिक वेतन प्रति मुनष्यबळ (रू.) | एका वर्षाचे कालावधीसाठीचा खर्च (रू.) |
|---|---|---|---|---|
| १ | Principal Consultant | ०२ | ४,५४,००० | १,०८,९६,००० |
| २ | Senior Consultant | ०३ | ३,८५,००० | १,३८,६०,००० |
| ३ | Associate Consultant | ०२ | २,८५,००० | ६८,४०,००० |
| | **एकुण** | ०७ | **११,२४,०००** | **३,१५,९६,०००** |
| | | | | **(३.१६ कोटी)** |

३. मंडळाकडील माहिती व तंत्रज्ञान आधारीत विविध कामकाजासाठी संदर्भिय शासन निर्णयातील वैध कालावधीपैकी सन २०२३ ते २०२४ या एका वर्षाच्या कालावधीसाठी आणि तद्नंतर मंडळाचे आवश्यकतेनुसार पुढील वाढीव कालावधीसाठी M/s. Primus Partners Pvt. Ltd. या संस्थेची निवड करणेस व त्यासंबंधीचा खर्च सन २०२३-२४ च्या उपलब्ध प्रशासकीय खर्च निधीतुन करणेस मा. मंत्री (कामगार) तथा मा. अध्यक्ष, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई यांनी मान्यता प्रदान केली आहे. सदर मान्यतेच्या अनुषंगाने संबंधित संस्थेच्या निवडीच्या मंजुरीच्या प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला होता त्यास दिनांक ०१.१२.२०२३ रोजीच्या शासन पत्रान्वये मान्यता प्रदान करण्यात आली आहे. सदर मान्यतेच्या M/s. Primus Partners Pvt. Ltd. या संस्थेसोबत करारनामा करून दिनांक १२.०१.२०२४ रोजी पुरवठा आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.

**ठराव क्र.६० (११)/२०२४ :-**

**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाअंतर्गतच्या पूर्व शिक्षण प्रशिक्षण (RPL) या प्रशिक्षण कार्यक्रमाकरीता माहिती व तंत्रज्ञान आधारीत विविध कामकाजाकरीता माहिती तंत्रज्ञान संचालनालयाच्या सूचीबद्ध संस्थामधून मे. Primus Partners Pvt. Ltd. यांच्याशी करावयाचा करारनामा व त्यांना द्यावयाच्या कार्यारंभ आदेशाबाबत शासन मान्यतेने केलेल्या कार्यवाहीस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

**विषय क्र.१२ :- महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळातर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजनांची प्रचार-प्रसिध्द करणेबाबत २०२२-२०२३ व २०२३-२०२४ चा आराखडा राबविणेबाबत व २०२४-२०२५ चा आराखडा निश्चित करणेबाबत.**

मंडळ सचिव यांनी सादर केले की, दिनांक १२.१२.२०२२ रोजी संपन्न बैठकीत बांधकाम कामगारांची नोंदणी, नुतणीकरण व विविध कल्याणकारी योजनांचा प्रचार, प्रसिध्दी व जनजागृतीच्या सन २०२२-२०२३ करीता रू.१०० कोटीच्या खर्चास मंडळाने तत्वत: मान्यता प्रदान केली. मंडळाच्या सन २०२३-२४ करीता रक्कम रू.१०० कोटीचा आराखडा तयार करण्यास मान्यता प्रदान केली असा ठराव सर्वानुमते पारीत करण्यात आला. यानुषंगाने मंडळाच्या दिनांक २१.१२.२०२२ रोजीच्या पत्रान्वये सन २०२२-२३ करीता रू.१०० कोटीच्या मर्यादेत सुधारीत प्रचार प्रसिध्दी आराखडा शासन मान्यतेस सादर करण्यात आला.

२. उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या दिनांक ०८.०२.२०२३ अन्वये उपरोक्त प्रस्तावित सन २०२२-२३ करीता सुधारीत अंदाजपत्रकातील तरतुदीनुसार रू.१०० कोटीच्या प्रचार प्रसिध्दी व जनजागृतीच्या आराखडयास खालीलप्रमाणे मान्यता देण्यात आलेली आहे.

| अ.क्र. | मंडळाकडील बांधकाम कामगारांची नोंदणी, नुतनीकरण व विविध कल्याणकारी योजनांचा प्रसार, प्रसिध्दी व जनजागृतीची माध्यमे | सन २०२२-२३ करीता सुधारीत तरतूद |
|---|---|---|
| १ | MSRTC Panels | १०.०० |
| २ | Hoardings- All types | १५.०० |
| ३ | Bus Queue Shelters (in Mumbai) | ३.०० |
| ४ | MSRTC announcements at Bus Stands | ५.०० |
| ५ | Documentary Production | ४.०० |
| ६ | Radio Spot & jingle Production | १.०० |
| ७ | Mobile LED Van for Promotion | १०.०० |
| ८ | Print Media | १.०० |
| ९ | TV Media | १.०० |
| १० | Electronic Sign Board | ९.०० |
| ११ | Social Media | १५.०० |
| १२ | Radio | १.०० |
| १३ | TV Creative Production | ६.०० |
| १४ | BEST/TMC/NMMC/other Muncipal Corporation Panells | ३.०० |

| अ.क्र. | मंडळाकडील बांधकाम कामगारांची नोंदणी, नुतनीकरण व विविध कल्याणकारी योजनांचा प्रसार, प्रसिध्दिी व जनजागृतीची माध्यमे | सन २०२२-२३ करीता सुधारीत तरतूद |
|---|---|---|
| १५. | Campaigns (Registration and Schemes) कलापथक, पथनाट्य, चित्ररथ | १०.०० |
| १६ | Mobile Kiosks | ६.०० |
| | एकूण | १००.०० |

३. मंडळाकडील सन २०२२-२३ करीता मंजूर करण्यात आलेल्या रू.१०० कोटी आराखडयापैकी माहिती व जनसंपर्क महासंचालनालय यांचेकडील माध्यम आराखडा नियोजन व अंमलबजावणी समिती यांच्या दिनांक २०.०२.२०२३ रोजीच्या बैठकीमध्ये प्रस्तावित रू.१०० कोटीच्या आराखडयातील DAVP चे दर उपलब्ध असलेल्या बाबीकरीता (Mobile LED Van करीता DAVP दर उपलब्ध नसल्याने सदर बाब वगळून) रू.८९,५३,४२,०००/- इतक्या रक्कमेच्या प्रचार प्रसिध्दी आराखडयास मंडळाची प्रशासकीय व वित्तीय मंजूरी प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यास मान्यता दिली आहे. त्यानुसार मंडळाच्या दिनांक १६.०३.२०२३ रोजीच्या पत्रान्वये माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या बैठकीतील मंजूर बाबीच्या अनुषंगीक रू. ८९,५३,४२,०००/- इतक्या प्रचार प्रसिध्दीबाबीकरीता प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देण्यात आली आहे.सदर माध्यम आराखडा हा वस्तू व सेवा कर वगळून प्रस्तावित करण्याबाबत मा.मंत्री महोदय (कामगार) मा. अध्यक्ष, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई यांनी मान्यता प्रदान केली आहे.माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाकडील नियोजन व अंमलबजावणी समितीने वेळोवेळी दिलेल्या कार्यादेशानुसार प्रचार प्रसिध्दीच्या बाबीवर खर्च करण्यात आला असून मा. मंत्री (कामगार) मा. अध्यक्ष, मंडळ यांच्या मान्यतेने शिल्लक रक्कमेचे वेळोवेळी पुर्नविनियोजन केले आहे. वेळोवेळी पुर्नविनियोजन करून सदर आराखडयाअंतर्गत मंजूर मूळ तरतूद व वेळोवेळी करण्यात आलेल्या सुधारणा व त्यानुसार करण्यात आलेल्या अंतिम तरतूदीन्वये तयार करण्यात आलेल्या आराखडयाचा तपशिल खालीलप्रमाणे :-

(मंडळाकडील विविध कल्याणकारी योजनाच्या प्रचार प्रसिध्दीसाठी सन २०२२-२३ करीता माहिती व जनसंपर्क संचालनालयामार्फत करण्यात आलेली तरतूद, देण्यात आलेल्या कार्यादेशाचा तपशिल, पुर्नविनियोजन तपशिल व अंतिम करण्यात आलेल्या तरतुदीच्या रक्कमेचा तपशिल)

| अ.क्र. | प्रचार प्रसिध्दी बाब/ माध्यम | मुळ तरतुद रक्कम (वस्तू व सेवा कर वगळून) | कार्यादेश रक्कम (वस्तू व सेवा कर वगळून) | पुर्नविनिवियोजनाव्दारे करण्यात आलेली तरतूद | अंतिम तरतूद रक्कम रू. |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ (४+५) |
| १ | News paper Advertise | ३,००,००,००० | ० | ० | ० |
| २ | ५ News+ ९ ent. Tv channels (Marathi) as on DAVP List | १,८७,५०,००० | ० | ० | ० |
| ३ | Shayadri Doordarshan | ९,००,००० | ० | ० | ० |
| ४ | Community Radion (approx. २५ to ३० stations across Maharashtra) | १२,००,००० | ० | ० | ० |
| ५ | All india Radio | १३,७५,००० | १३,२८,७४७ | ० | १३,२८,७४७ |
| ६ | ६० FM stations across maharstra | २३,७५,००० | २३,२५,३८७ | ० | २३,२५,३८७ |
| ७ | ST stand LED/ LCD screens (old DAVP Rate) All over Maharashtra ८० to ९० screens | ११,००,००,००० | १०,८५,४०,००० | ६,४६,९९,२०० | १७,३२,३९,२०० |
| ८ | Best wrap/ TMC/ NMMC/ other municipal Corporation panels (As per availblity) | ३,००,००,००० | २,९३,२७,९०० | ३,७४,९०,४०० | ६,६८,१८,३०० |
| ९ | MSRTC bus panel (३ side panel) | ९,७५,००,००० | ९,७४,९१,३०० | ० | ९,७४,९१,३०० |
| १० | लोककला / पथनाटय ऐवजी रोड शो | ८,००,००,००० | ७,८८,९४,००० | ० | ७,८८,९४,००० |
| ११ | चित्ररथ | ४,००,००,००० | ३,३४,३२,२०३ | ० | ३,३४,३२,२०३ |
| १२ | Private and DGIPR Hoardings (As per availablity) | १५,००,००,००० | ११,२४,९८,३६८ | ० | ११,२४,९८,३६८ |
| १३ | Mumbai BQS | ३,००,००,००० | २,९९,३४,५२० | ० | २,९९,३४,५२० |
| १४ | Mobile Kiosks | ६,००,००,००० | ४,५१,५२,५४२ | ० | ४,५१,५२,५४ |

| अ.क्र. | प्रचार प्रसिध्दी बाब/ माध्यम | मुळ तरतुद रक्कम (वस्तू व सेवा कर वगळून) | कार्यादेश रक्कम (वस्तू व सेवा कर वगळून) | पुर्नविनिवियोजनाव्दारे करण्यात आलेली तरतूद | अंतिम तरतूद रक्कम रू. |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | २ |
| १५ | ST Stand audio Jingle at १४० ST depots across the state | ५,००,००,००० | ४,९९,३९,३७२ | ० | **४,९९,३९,३७२** |
| १६ | Social Media Campaign for १ Month | ५,००,००,००० | ४,१८,००,००० | २,०६,९९,००० | **६,२४,९९,०००** |
| १७ | २२ TVC (४५ to ६० Sec) as per DAVP rate | १,५४,००,००० | १,२८,९०,९७५ | ० | **१,२८,९०,९७५** |
| | २० TVC (४५ to ६० Sec) with Celebrity as per DAVP rate | ४,००,००,००० | ३,३४,८३,०५१ | ० | **३,३४,८३,०५१** |
| | ३० Audio Jingle (६० sec) | १३,५०,००० | ११,३०,०५३ | ० | **११,३०,०५३** |
| | मंडळाच्या विविध योजनांवर आधारीत ४ गीताची निर्मिती (१६ ते ६० सेंकद) with celebrity | ८०,००,००० | ६६,९६,६१० | ० | **६६,९६,६१०** |
| | ४८ Documentary १६ ते ३० मिनिटे | ६,००,००,००० | ५,०२,२४,५७६ | ० | **५,०२,२४,५७६** |
| | Print Creative-५० | ७,५०,००० | ५,५०,८४७ | ० | **५,५०,८४७** |
| | Adaptation, Translation, formatting from one media to other media | १०,००,००० | ० | ० | **०** |
| १८ | **Feedback Report** | | | | **०** |
| १९ | शा.नि. दिनांक १३.८.२०२१ नुसार Administrative expenses ४% below ५ Cr and above ५ Cr २% extra on every increasing amt. क्रमप्राप्त | १,६०,४२,००० | १,६०,४२,००० | ० | **१,६०,४२,०००** |

| अ.क्र. | प्रचार प्रसिध्दी बाब/ माध्यम | मुळ तरतुद रक्कम (वस्तू व सेवा कर वगळून) | कार्यादेश रक्कम (वस्तू व सेवा कर वगळून) | पुर्नविनिवियोजनाव्दारे करण्यात आलेली तरतूद | अंतिम तरतूद रक्कम रू. |
|---|---|---|---|---|---|
| | एकुण | ८९,४६,४२,००० | ७५,१६,८२,४५१ | १२,२८,८८,६०० | ८७,४५,७१,०५१ |
| ब. | Mobile LED Van व्दारे ई-निविदेव्दारे प्रचार प्रसिध्दी | १०,५३,५८,००० | ९,७९,२०,००० | ० | ९,७९,२०,००० |
| | एकुण रक्कम रू. | १,००,००,००,००० | ८४,९६,०२,४५१ | १२,२८,८८,६०० | ९७,२४,९१,०५१ |
| क | | | | | |
| १ | शेगाव LED/LCD screens (Phase-०१) | ० | ० | ३७,४२,२०० | ३७,४२,२०० |
| २ | शेगाव LED/LCD screens (Phase-०२) | ० | ० | ३७,५४,०८० | ३७,५४,०८० |
| ३ | Local Cable All Over Maharashtra | ० | ० | १,९७,००,१०० | १,९७,००,१०० |
| | एकुण रक्कम रू. | ० | ० | २,७१,९६,३८० | २,७१,९६,३८० |
| | एकुण रक्कम (अ+ब+क) | १,००,००,००,००० | ८४,९६,०२,४५१ | १५,००,८४,९८० | ९९,९६,८७,४३१ |
| | शिल्लक रक्कम | | | | ३,१२,५६९ |

माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाकडील नियोजन व अंमलबजावणी समितीच्या विशेष टिपमध्ये “Mobile LED Van माध्यमाव्दारे जाहिरात प्रसिध्द करण्याकरीता DAVP दर उपलब्ध नसून मंडळामार्फत इतर DAVP माध्यमे सुचविण्यात यावी किंवा सदर माध्यमाव्दारे प्रसिध्दी करावयाची असल्यास याबाबत मंडळ स्तरावर निर्णय घेण्यात यावा” असे कळविण्यात आले असल्याने मंडळामार्फत ई-निविदा काढण्यात आली होती सदरच्या निविदा प्रक्रियेत न्युनतम दरधारक मे. ओम एंटरप्रायजेस, मुंबई यांचे दर इतर पुरवठाधारकापेक्षा कमी असल्याने दिनांक ०५.०१.२०२४ च्या पत्रान्वये प्रस्ताव शासन मान्यतेस्तव सादर करण्यात आला होता. दरम्यानच्या कालावधीत शासनाच्या प्राप्त निर्देशाच्या अनुषंगाने सदर निविदा प्रक्रियेतील न्यूनतम निविदाकरासोबत दर कमी करण्याबाबत वाटाघाटी केल्या असता, सदर निविदाधारकाने त्याचे दर प्रति कार्यक्रम रू.६८००/- अधिक १८% वस्तू व सेवाकर असे एकुण ८,०२४/- (सर्व करांसहीत) असे दर कळविले असल्याने अशा सुधारीत दरास शासनाच्या दिनांक २३.०१.२०२४ रोजीच्या पत्रान्वये शासन मान्यता प्रदान केली आहे.सदर शासन मान्यतेस अनुसरून Mobile LED Van व्दारे प्रचार प्रसिध्दीबाबीकरीता ई-निविदा पध्दतीने नियुक्त संस्था मे. ओम एंटरप्रायजेस, मुंबई या संस्थेसोबत दिनांक २५.०१.२०२४ रोजी करारनामा करून कार्यादेश

दिनांक ३१.०१.२०२४ रोजी देण्यात आले आहे.उपरोक्त तक्त्यात नमूदप्रमाणे मंडळ ठराव दिनांक १२.१२.२०२२ व उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग दिनांक ०८.०२.२०२३ अन्वये सन २०२२-२३ च्या १०० कोटी आराखडयाअंतर्गतच्या तरतूदीअन्वये एकुण रक्कम रू. ९९,९६,८७,४३१ (वस्तू व सेवाकर वगळून) मंडळामार्फत प्रचार प्रसिध्दी बाबीवर खर्च करण्यात आला आहे.

मंडळाअंतर्गत बांधकाम कामगारांची नोंदणी, नुतणीकरण व लाभ वाटप जलद होण्याच्या हेतुने सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाकरीता खालीलप्रमाणे माध्यमनिहाय प्रचार, प्रसिध्दी व जनजागृती आराखडा तयार करण्यात आलेला आहे.

| अ.क्र. | मंडळाकडील बांधकाम कामगारांची नोंदणी, नुतनीकरण व विविध कल्याणकारी योजनांची प्रचार, प्रसिध्दी व जनजागृती माध्यमे | सन २०२४-२५ करीता तरतूद (रू.कोटी) (वस्तू व सेवाकर वगळून) |
|---|---|---|
| १ | News Paper Advertise | २.०० |
| २ | ५ News+ ९ ent.TV Channels (Marathi) as on DAVP List | ३.०० |
| ३ | St stand LED Screen | २०.०० |
| ४ | Navi Mumbai Muncipal Corporation Wrap | १.०० |
| ५ | Pune Corporation Wrap | १.०० |
| ६ | BEST Buses Wrap | ७.०० |
| ७ | MSRTC Bus Panel (३ Side panel) | १०.०० |
| ८ | Chitrarath | ८.०० |
| ९ | Private and DGIPR Hording ( As per availability) | २०.०० |
| १० | Mumbai BQS | १०.०० |
| ११ | Mobile Kiosks | ५.०० |
| १२ | ST Stand Audio jingle at १४० ST depots across the state | ३.०० |
| १३ | Social Media Campaign | ४.५० |
| १४ | Mobile LED Van | १२.०० |
| १५ | Cable Broadcasting | १०.०० |
| १६ | Mumbai Pol Kiosk | ८.३५ |
| १७ | Central Local Train Audio Jingle | ३.०० |
| १८ | Solapur BQS | ०.१५ |
| १९ | Sambhajinagar BQS | ०.५० |
| २० | Mumbai Local Train LED/LCD | ३.०० |
| २१ | Central Railway Wrap | ३.०० |
| २२ | Bulk SMS | २.५० |

| अ.क्र. | मंडळाकडील बांधकाम कामगारांची नोंदणी, नुतनीकरण व विविध कल्याणकारी योजनांची प्रचार, प्रसिध्दी व जनजागृती माध्यमे | सन २०२४-२५ करीता तरतूद (रू.कोटी) (वस्तू व सेवाकर वगळून) |
|---|---|---|
| २३ | Whatsapp/ Chatbox massaging | २.५० |
| २४ | Digital Media | २.५० |
| २५ | Presentation | २.०० |
| २६ | Pune BQS | १.०० |
| २७ | Mumbai Metro Station Line २ A & ७ | ५.०० |
| | **TOTAL** | **१५०.००** (वस्तू व सेवाकर वगळून) |

उपरोक्तप्रमाणे सन २०२४-२५ करीता रक्कम रू. १५०.०० कोटीचा माध्यमनिहाय प्रचार प्रसिध्दीचा आराखडा मा.मंत्री (कामगार) तथा मा.अध्यक्ष यांच्या मान्यतेने शासनास सादर करण्यात आला आहे.

**ठराव क्र.६० (१२)/२०२४ :-**

**१. महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळातर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजनांची प्रचार-प्रसिध्द करणेबाबत २०२२-२०२३ व २०२३-२०२४ चा रू.१००.०० कोटीचा वस्तू व सेवाकर वगळून) प्रचार प्रसिध्दी आराखडा राबविण्याबाबत व मे. ओम एंटरप्रायजेस, मुंबई या संस्थेसोबत केलेला करारनामा व पुरवठा आदेशाबाबत शासन मान्यतेने केलेल्या कार्यवाहीस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**

**२. महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळातर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजनांची प्रचार-प्रसिध्द करणेबाबत २०२४-२०२५ करीता रू.१५०.०० कोटीचा (वस्तू व सेवाकर वगळून) आराखडा राबविण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

**विषय क्र.१३ :- महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या विविध योजनांच्या प्रचार -प्रसिध्दीसाठी सर्वसमावेशक माहिती पुस्तिका तयार करण्याबाबत.**

मंडळ सचिव यांनी सादर केले की, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडील नोंदीत सक्रीय (जिवीत) बांधकाम कामगारांकरीता विविध प्रकारच्या शैक्षणिक सहाय्य योजना, आर्थिक सहाय्य योजना, सामाजिक सुरक्षा व अन्य योजना व आरोग्य विषयक योजना अशा ३२ कल्याणकारी योजना राबविल्या जातात यानुषंगाने बांधकाम कामगारांची नोंदणी, नुतनीकरण व विविध कल्याणकारी योजनांची माहिती जास्तीत जास्त बांधकाम कामगारांपर्यत पोहचविण्यासाठी मंडळाची 'सर्वमसावेशक माहिती पुस्तीका' तयार करून वितरीत करून वितरीत करणे प्रस्तावित होते.

२. सदर माहितीपुस्तिकाद्वारे बांधकाम कामगारांची नोंदणी, नुतनीकरण व मंडळाच्या विविध कल्याणकारी योजना जास्तीत जास्त बांधकाम कामगारांपर्यंत पोहचविण्यासाठी छपाई करून वितरीत करण्यात येणार आहे. माहे मे २०२३ अखेर मंडळाकडे २५.२४ लक्ष इतक्या बांधकाम कामगारांची नोंदणी झाली असून आगामी काळात मंडळाच्या चालू प्रचार प्रसिध्दी आराखडयाच्या प्रभावी अंमलबजावणीमुळे सदर नोंदणी ३० लाखाहून अधिक होण्याची शक्यता आहे. सबब, ३० लाख सर्व समावेशक माहीतीपुस्तीका छपाई करून वितरीत करणे आवश्यक असल्याने मा. अध्यक्ष, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ यांच्या दिनांक ०४.०५.२०२३ व दिनांक २०.०७.२०२३ रोजीच्या मान्य प्रस्तावन्वये मा. अध्यक्ष, खरेदी समिती यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ०१.०९.२०२३ रोजी पार पडलेल्या खरेदी समितीच्या बैठकीमध्ये सदर ई- निविदा अर्जाचे प्रारूप अंतिम करण्यात आले होते.सदर मान्यतेच्या अनुषंगाने मंडळाच्या दिनांक ०८.०५.२०२३ रोजीच्या पत्रान्वये ई-निविदा पध्दतीने सर्वसमावेशक माहितीपुस्तिका छपाईची कार्यवाही करणेसाठीचा प्रस्ताव शासन मान्यतेस्तव सादर करण्यात आला होता.उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या दिनांक १२.०५.२०२३ अन्वये मंडळाकडील विविध कल्याणकारी योजनांची माहिती जास्तीत जास्त बांधकाम कामगारांपर्यंत पोहचविण्यासाठी मंडळाची "सर्व समावेशक माहिती पुस्तिका" तयार करून वितरीत करण्यास मान्यता प्रदान केली आहे. सदर मान्यतेनुसार मा. अध्यक्ष, मंडळ यांच्या मान्यतेने मा. कामगार आयुक्त मा. अध्यक्ष ई-निविदा खरेदी समिती यांच्या अध्यक्षतेखाली ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आली होती.सदरच्या ई-निविदा प्रक्रियेत मे. NACOF India Ltd, चेंबुर (पुर्व) मुंबई या निविदाकरांचे दर (L१) इतर निविदाकारांपेक्षा कमी असल्याने मे. NACOF India Ltd, चेंबुर (पुर्व) मुंबई या संस्थेच्या निवडीबाबतचा प्रस्ताव मंडळाच्या दिनांक ०५.०१.२०२४ च्या पत्रान्वये प्रस्ताव शासन मान्यतेस्तव सादर करण्यात आला होता.दरम्यानच्या कालावधीत शासनाच्या दिनांक ११.०१.२०२४ रोजीच्या प्राप्त निर्देशाच्या अनुषंगाने सदर निविदा प्रक्रियेतील न्यूनतम निविदाकरासोबत दर कमी

करण्याबाबत वाटाघाटी केल्या असता, सदर निविदाधारकाने त्याचे दर रू.१६६/- प्रति माहिती-पुस्तीका असे कळविल्याने त्या दरास शासनाच्या दिनांक २३.०१.२०२४ अन्वये मान्यता प्रदान करण्यात आली आहे.उपरोक्त शासन मान्यतेनुसार करण्याबाबत मे. NACOF India Ltd (Consortium Member : Akruti Print Solutions Pvt Ltd.) या पुरवठादार संस्थेसोबत "सर्व समावेशक माहिती पुस्तिका" तयार करून वितरीत करण्याबाबत करारनामा प्रारूप, पुरवठा आदेश प्रारूप व जिल्हा स्तरावर वितरण करावयाची सर्व समावेशक माहिती पुस्तीका (Booklet) तपशिल दर्शविणारे प्रपत्र (प्रपत्र - अ) यांस मान्यता प्रदान करण्याबाबत मंडळाच्या दिनांक ०७.०२.२०२४ रोजीच्या पत्रान्वये शासन मान्यतेस प्रस्ताव सादर करण्यात आला होता. शासनाच्या १५.०२.२०२४ रोजीच्या पत्रान्वये सदर संस्थेसोबत करावयाचा करारनामा व सदर नियुक्त संस्थेस मंडळामार्फत द्यावयाचा पुरवठा आदेशाच्या प्रारूपास शासन मान्यता प्रदान करण्यात आली आहे. त्यानुसार मंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांची माहिती जास्तीत जास्त बांधकाम कामगारांपर्यत पोहचविण्यासाठी मंडळाची "सर्वसमावेशक माहितीपुस्तीका" तयार करून वितरीत करण्याबाबत सदर संस्थेसोबत दिनांक १६.०२.२०२४ रोजी करारनामा करण्यात आला असून दिनांक १६.०२.२०२४ रोजी पुरवठा आदेश देण्यात आले आहेत.

**ठराव ६० क्र. (१३)/२०२४ :-**

**मंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांची माहिती जास्तीत जास्त बांधकाम कामगारांपर्यत पोहचविण्यासाठी मंडळाची "सर्वसमावेशक माहितीपुस्तीका" तयार करून वितरीत करणेकरीता ई-निविदा प्रक्रिया राबवून न्यूनतम निविदाकार मे. NACOF India Ltd. (Consortium member Akruti Print Solutions Pvt. Ltd.)यांचेसेबत करारनामा करणे व पुरवठा आदेश देण्याबाबत शासन मान्यतेने केलेल्या कार्यवाहीस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

**विषय क्र.१४ :- महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्यणकारी मंडळाकडे जमा होणाऱ्या उपकरासंबंधी संगणक प्रणाली विकसीत करणेबाबत.**

मंडळ सचिव यांनी सादर केले की, इमारत व इतर बांधकाम आराखडयास मंजूरी देण्यास सक्षम असणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्था/ प्राधिकरणे यांनी विविध प्रकल्पांना/ योजनांना/ बांधकामास मंजूरी देताना प्रत्येक प्रकरणात बांधकाम मूल्याच्या (जमिनीचे मूल्य वगळून) किमान १% दराने उपकराची रक्कम Demand Draft/NEFT/RTGS द्वारे मंडळाच्या नावे राष्ट्रीयकृत बँकांच्या खात्यात जमा करण्यात येतात.

२. मंडळाकडे जमा होणाऱ्या उपकरासंबंधी संगणक प्रणाली विकसित करण्यासाठी खुल्या ई- निविदेद्वारे प्रक्रिया करण्यास मा. अध्यक्ष तथा मंत्री (कामगार) यांनी मान्यता प्रदान केली आहे. सदर मान्यतेनुसार मंडळामार्फत दिनांक ०५.०२.२०२४ रोजी शासन मान्यतेस्तव प्रस्ताव सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावास शासन मान्यता प्रदान करण्यात आली आहे. महाराष्ट्र शासन वित्त विभागाकडील महसुल जमा करण्यासाठी निर्मित ग्रास (GRAS) प्रणालीच्या धर्तीवर मंडळाकडील कामकाजाच्या व्याप्तीनुसार खालील नमूद उद्दीष्टांकरीता मंडळाची स्वतंत्र संगणक प्रणाली विकसीत करणे प्रस्तावित होते त्या अनुषंगाने खरेदी समितीच्या बैठकीअंती ई-निविदा प्रारूप अर्ज तयार करण्यात आले असून ई-निविदा प्रारूप अर्ज एका राष्ट्रीय वर्तमानपत्रात आणि एका राज्यस्तरीय वर्तमानपत्रात सर्व आवृत्यांमध्ये शासकीय दराने प्रसिध्द करण्यात आले आहे.ई- निविदा प्रक्रियेतील तांत्रीक मुल्यांकनाअंती पात्र ठरलेल्या तीन निविदाकारांचा आर्थिक लिफाफा उघडण्यात आला. आर्थिक मुल्यांकनाचा गोषवारा खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | निविदाकार | सादर केलेले दर (कर वगळून) | शेरा |
|---|---|---|---|
| १ | मे. इन्स्टालॉजिक सोल्यूशन प्रा.लि. कन्सॉर्शिअम डाटा लुमिन | १५,१३,७०,०००/- | L१ |
| २ | मे. एक्सपोनेशिया. प्रा.लि. | १६,०७,००,२००/- | L१ |
| ३ | मे. लेगॉझोन टेक्नोलॉजिस प्रा.लि | १६,५१,५०,९४०/- | L३ |

वरील तुलनात्मक दराच्या तक्त्यानुसार शासन निर्णय उद्योग, उर्जा वकामगार विभाग दिनांक ०१.१२.२०१६ मधील ४.५.२ नुसार मे. इन्स्टालॉजिक सोल्यूशन प्रा.लि. कन्सॉर्शिअम डाटा लुमिन या निविदाकारांनी सादर केलेले दर रू. १५,१३,७०,०००/- (कर वगळून) हे सर्वात न्यूनत्तम (L१) दर आहेत. मे. इन्स्टालॉजिक सोल्यूशन प्रा.लि. कन्सॉर्शिअम डाटा लुमिन या निविदाकारांनी सादर केलेले दर निविदेच्या अंदाजित मूल्य रू. १५,०५,००,९८२/- कोटी (वस्तू व सेवाकर वगळून) पेक्षा जास्त आहे. मे. इन्स्टालॉजिक सोल्यूशन प्रा.लि. कन्सॉर्शिअम डाटा लुमिन यांनी सादर केलेले दर निविदेच्या अंदाजित

खरेदी मूल्य रू. १५,०५,००,९८२/- पेक्षा ०.५८ % ने जास्त (+) आहे व उपरोक्त शासन निर्णयातील नियम क्र.३.१.२.१ व ४.४.३.१ नुसार सादर दर निविदेचे अंदाजित मूल्य रू. १५,०५,००,९८२/- कोटीच्या (-) २० टक्के ते (+) १० टक्के या किंमत श्रेणीमध्ये असल्याने रू. १५,१३,७०,०००/- (वस्तू व सेवाकर वगळून) चे दर मान्य करून मे. इन्स्टालॉजिक सोल्यूशन प्रा.लि. कन्सॉर्शिअम डाटा लुमिन यांनी सादर केलेला दर खरेदी समितीने अंतिम केलेला आहे. सदर दरास मा. मंत्री (कामगार) मा. अध्यक्ष यांनी मान्यता प्रदान केली असून शासन मान्यतेस्तव प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. सदर प्रस्तावास शासनाने दिनांक १४.०३.२०२४ रोजीच्या पत्रान्वये मान्यता प्रदान केली आहे. सदर मान्यतेच्या अनुषंगाने मे. इन्स्टालॉजिक सोल्यूशन प्रा.लि. कन्सॉर्शिअम डाटा लुमिन या संस्थेसोबत करारनामा करून दिनांक १५.०३.२०२४ रोजी कार्यादेश निर्गमित करण्यात आले आहेत.

**ठराव क्र.६० (१४)/२०२४ :-**

**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडे जमा होणाऱ्या उपकरासंबंधी संगणक प्रणाली विकसीत करणेकरीता ई-निविदा प्रक्रिया राबवून न्यूनतम निविदाकार मे. इन्स्टालॉजिक सोल्यूशन प्रा.लि. कन्सॉर्शिअम डाटा लुमिन मुंबई यांचेसेबत करारनामा करणे व पुरवठा आदेश देण्याबाबत शासन मान्यतेने केलेल्या कार्यवाहीस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

**विषय क्र.१५ :- महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाचे सन २०२१-२२ चे सुधारित अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकास व सन २०२२-२३ च्या मूळ अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकास मान्यता देणेबाबत.**

मंडळ सचिव यांनी सादर केले की, इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) अधिनियम १९९६ मधील कलम २५ नुसार मंडळाने प्रत्येक आर्थिक वर्षांचे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक विहित केलेल्या नमुन्यात तयार करुन केंद्र व राज्य शासनास सादर करणेबाबत तरतूद आहे. त्यानुसार मंडळाने सन २००७-०८ पासून सन २०२०-२१ अखेर आर्थिक वर्षनिहाय मुळ व सुधारीत अंदाजपत्रके तयार करून त्यास वेळोवेळी मंडळाची मान्यता घेतली आहे. सन २०२१-२२ च्या सुधारीत व सन २०२२-२३ च्या मुळ अंदाजपत्रक मा. अध्यक्ष मंडळ यांचे मान्यतेने शासनास सादर केली आहेत.

**अ. <u>मंडळाचे सन २०२१-२२ चे सुधारित अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक</u>**

मंडळाचे सन २०२१-२२ या आर्थिक वर्षांचे रू. १९५३.३० कोटी जमेचे व रू. १६११.५८ कोटी एवढया खर्चाच्या मुळ अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकास मंडळाच्या दिनांक ०२.०३.२०२१ रोजीच्या बैठकीत मान्यता प्रदान करण्यात आली होती. मंडळ मान्यतेनंतर सदर अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक शासनास सादर करण्यात आले होते.

शासनास सादर करण्यात आलेल्या सन २०२१-२२ च्या मुळ अंदाजपत्रकाच्या अनुषंगाने, माहे नोव्हें.,२०२१ अखेर आठमाही प्रत्यक्ष जमा व खर्चावर आधारीत उर्वरीत चारमाही करीता संभाव्य जमा व खर्चाच्या आधारे सन २०२१-२२ चे रू. २५२६.१९ कोटी जमा व रू. १८६९.९८ कोटी खर्चाचे सुधारित अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. (प्रत संलग्न) त्यास मंडळाच्या दिनांक ०४.०२.२०२२ रोजीच्या प्रस्तावानुसार, मा. अध्यक्ष, मंडळ यांची मान्यता प्राप्त झाली आहे.

सन २०२१-२२ चे सुधारित अंदाजपत्रकाचा गोषवारा पुढीलप्रमाणे-

**<u>सुधारित अंदाजपत्रक जमेचा गोषवारा (रु. कोटीत)</u>**

| अ.क्र. | बाब (जमा) | मूळ अंदाजपत्रक सन २०२१-२२ | माहे एप्रिल २०२१ ते नोव्हें., २०२१ ची प्रत्यक्ष जमा | माहे डिसें. २०२१ ते मार्च २०२२ ची अंदाजित जमा | सन २०२१-२२ मधील जमेचे सुधारित अंदाज |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६(४+५) |
| १ | उपकर | १५५०.०० | १३७३.८४ | ७२६.१६ | २१००.०० |
| २ | बँकेतील बचत व मुदत | ३६८.०० | २७४.७७ | १४५.५१ | ४२०.२८ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | ठेवीवरील व्याज | | | | |
| ३ | बांधकाम कामगार नोंदणी फी | १.२५ | १.३१ | ०.६५ | १.९४ |
| ४. | बांधकाम कामगार मासिक वर्गणी | १.२० | ०.६५ | ०.३२ | ०.९७ |
| ५. | मध्यान्ह भोजन बांधकाम कामगार हिस्सा (रू.०५/- प्रमाणे) | ३२.८५ | ०.०० | ३.०० | ३.०० |
| | **एकूण जमा** | **१९५३.३०** | **१६५०.५७** | **८७५.६४** | **२५२६.१९** |

## सुधारित अंदाजपत्रक खर्चाचा गोषवारा (रु. कोटीत)

| अ.क्र | बाब (खर्च) | अपेक्षित खर्च | माहे एप्रिल २०२१ ते नोव्हें., २०२१ चा प्रत्यक्ष खर्च | माहे डिंसें. २०२१ ते मार्च २०२२ चा अंदाजित खर्च | सन २०२१-२२ मधील खर्चाचे सुधारित अंदाज खर्च |
|---|---|---|---|---|---|
| अ. | विविध कल्याणकारी योजनांवरील खर्च | १०४८.०० | ८३३.५१ | ९५९.२३ | १७९२.७४ |
| ब. | प्रस्तावित योजना | ५१०.०० | ०.०० | १०.०० | १०.०० |
| क. | प्रशासकिय खर्च | ३६.०८ | २५.८३ | ३५.५६ | ६१.३९ |
| ड | उपकर परतावा | १७.५० | २.३५ | ३.५० | ५.८५ |
| | **एकूण खर्च** | **१६११.५८** | **८६१.६९** | **१००८.२९** | **१८६९.९८** |

## ब. सन २०२२-२३ चे मूळ अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक

इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) अधिनियम १९९६ मधील कलम २५ नुसार, मंडळाचे सन २०२२-२३ या आर्थिक वर्षाचे रू. २८१६.५० कोटी जमा व रू. १८८०.४१ कोटी खर्चाचे मूळ अर्थसंल्पीय अंदाजपत्रक तयार करण्यात आले होते. मा. अध्यक्ष महोदय यांच्या मंजूरीनुसार आणि मंडळाचे पत्र दिनांक १६.०२.२०२२ अन्वये सदर अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक शासनास सादर करण्यात आले आहे.

सन २०२२-२३ चे मूळ अंदाजपत्रकाचा गोषवारा खालीलप्रमाणे-

**सन २०२२-२३ मधील जमा व खर्चाचा गोषवारा**

**(रूपये कोटीत)**

| अ.क्र. | बाब (जमा) | अपेक्षित जमा | बाब (खर्च) | अपेक्षित खर्च |
|---|---|---|---|---|
| १ | उपकर | २३१०.०० | विविध कल्याणकारी योजनांवरील खर्च | १५९६.१० |
| २ | बँकेतील मुदतठेवीवरील व्याज | ४६२.०० | प्रस्तावित योजना | २१०.०० |
| ३ | नोंदणी फी | २.१३ | प्रशासकिय खर्च | ४५.२६ |
| ४ | मासिक वर्गणी | १.२६ | उपकर जमा रक्कमेपोटी देय प्रशासकीय खर्चाची (१%) तरतूद | २१.३० |
| ५ | मध्यान्ह भोजन लाभ शुल्क | ४१.०६ | नजर चुकीने/ अनावधानाने जमा रक्कमेचा परतावा | ५.०० |
| ६ | इतर जमा | ०.०५ | इतर खर्च | २.७५ |
| | **एकूण जमा** | **२८१६.५०** | **एकूण खर्च** | **१८८०.४१** |

**ठराव क्र.६० (१५)/२०२४ :-**

**मंडळाच्या सन २०२१-२२ चे रू. २५२६.१९ कोटी जमा व रू. १८६९.९८ कोटी खर्चाचे सुधारित अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक मा. अध्यक्ष, मंडळ यांचे मान्यतेस सादर केला आहे अशा सन २०२१-२२ च्या सुधारित अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकास मान्यता व मंडळाच्या सन २०२२-२३ या आर्थिक वर्षाचे रू. २८१६.५० कोटी जमा व रू. १८८०.४१ कोटी रक्कमेच्या मुळ अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकास मंडळाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

**विषय क्र.१६ :- महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाचे सन २०२२-२३ चे सुधारित अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकास व सन २०२३-२४ च्या मूळ अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकास मान्यता देणेबाबत.**

मंडळ सचिव यांनी सादर केले की, इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) अधिनियम १९९६ मधील कलम २५ नुसार मंडळाने प्रत्येक आर्थिक वर्षांचे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक विहित केलेल्या नमुन्यात तयार करुन केंद्र व राज्य शासनास सादर करणेबाबत तरतूद आहे. त्यानुसार मंडळाने सन २००७-०८ पासून सन २०२०-२१ अखेर आर्थिक वर्षनिहाय मुळ व सुधारीत अंदाजपत्रके तयार करून त्यास वेळोवेळी मंडळाची मान्यता घेतली आहे. सन २०२१-२२ च्या सुधारीत व सन २०२२-२३ च्या मुळ अंदाजपत्रक मा. अध्यक्ष यांचे मान्यतेने शासनास सादर करण्याची कार्यवाही केली आहे.

**अ. <u>मंडळाचे सन २०२२-२३ चे सुधारित अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक</u>**

मंडळाचे सन २०२२-२३ या आर्थिक वर्षांचे रू. २८१६.५० कोटी जमेचे व रू. १८८०.४१ कोटी एवढया खर्चाच्या मुळ अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकास मंडळाच्या दिनांक १५.०२.२०२२ रोजीच्या बैठकीत मान्यता प्रदान करण्यात आली होती. मंडळ मान्यतेनंतर सदर अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक शासनास सादर करण्यात आले होते.

शासनास सादर करण्यात आलेल्या सन २०२२-२३ च्या मुळ अंदाजपत्रकाच्या अनुषंगाने, माहे नोव्हें.,२०२२ अखेर आठमाही प्रत्यक्ष जमा व खर्चावर आधारीत उर्वरीत चारमाही करीता संभाव्य जमा व खर्चाच्या आधारे सन २०२२-२३ चे रू. ३१८१.७९ कोटी जमा व रू. ३८०९.५२ कोटी खर्चाचे सुधारित अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. (प्रत संलग्न) त्यास मंडळाच्या दिनांक ०२.०३.२०२३ रोजीच्या प्रस्तावानुसार मा. अध्यक्ष, मंडळ यांचे मान्यतेने शासन मान्यतेस सादर करण्यात आले.

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

सन २०२२-२३ चे सुधारित अंदाजपत्रकाचा गोषवारा पुढीलप्रमाणे-

**सुधारित अंदाजपत्रक जमेचा गोषवारा (रु. कोटीत)**

| अ. क्र. | बाब (जमा) | मूळ अंदाजपत्रक सन २०२२-२३ | माहे एप्रिल २०२२ ते नोव्हें., २०२३ ची प्रत्यक्ष जमा | माहे डिंसें. २०२२ ते मार्च २०२३ ची अंदाजित जमा | सन २०२२-२३ मधील जमेचे सुधारित अंदाज |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६(४+५) |
| १ | उपकर | २३१०.०० | १६१३.१९ | ९२०.०० | २५३३.१९ |
| २ | बँकेतील बचत व मुदत ठेवीवरील व्याज | ४६२.०० | ४५९.३० | १८६.८९ | ६४६.१९ |
| ३ | बांधकाम कामगार नोंदणी फी | २.१३ | १.५६ | ०.०९ | १.६५ |
| ४ | बांधकाम कामगार मासिक वर्गणी | १.२६ | ०.७४ | ०.०१ | ०.७५ |
| ५ | मध्यान्ह भोजन बांधकाम कामगार हिस्सा (रू.०५/- प्रमाणे) | ४१.०६ | ०.०० | ०.०० | ०.०० |
| ६ | इतर जमा | ०.०५ | ०.००५ | ०.००२ | ०.००७ |
| | **एकूण जमा** | **२८१६.५** | **२०७४.८०** | **११०६.९९** | **३१८१.७९** |

**सुधारित अंदाजपत्रक खर्चाचा गोषवारा (रु. कोटीत)**

| अ.क्र. | बाब (खर्च) | सन २०२२-२३ मधील खर्चाचे अंदाज | माहे एप्रिल २०२२ ते नोव्हें., २०२२ चा प्रत्यक्ष खर्च | माहे डिंसें. २०२२ ते मार्च २०२३ चा अंदाजित खर्च | सन २०२२-२३ मधील खर्चाचे सुधारित अंदाज खर्च |
|---|---|---|---|---|---|
| १ | विविध कल्याणकारी योजनांवरील खर्च | १५९६.१० | २२३२.०५ | १५१०.४८ | ३७४२.५३ |
| २ | प्रस्तावित योजना | २१०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० |
| ३ | प्रशासकिय खर्च | ४५.२६ | ३६.७८ | २४.१७ | ६०.९५ |
| ४ | उपकर जमा रक्कमेपोटी देय प्रशासकीय खर्चाची (१%) तरतूद | २१.३० | ०.०१ | ०.०५ | ०.०६ |
| ५ | नजर चुकीने/ अनावधानाने जमा रक्कमेचा परतावा | ५.०० | ०.३१ | ३.०८ | ३.३९ |
| ६ | इतर खर्च | २.७५ | १.६४ | ०.९५ | २.५९ |
| | **एकूण खर्च** | **१८८०.४१** | **२२७०.७९** | **१५३८.७४** | **३८०९.५२** |

## ब. सन २०२३-२४ चे मूळ अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक

इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) अधिनियम १९९६ मधील कलम २५ नुसार, मंडळाचे सन २०२३-२४ या आर्थिक वर्षाचे रू. ४१२२.६४ कोटी जमा व रू. ४०१९.१२ कोटी खर्चाचे मूळ अर्थसंल्पीय अंदाजपत्रक तयार करण्यात आले होते. मा. अध्यक्ष, मंडळ यांच्या मंजूरीनुसार मंडळ पत्र दिनांक १७.०३.२०२३ अन्वये सदर अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक शासनास सादर करण्यात आले आहे.

सन २०२३-२४ चे मूळ अंदाजपत्रकाचा गोषवारा खालीलप्रमाणे-

**सन २०२३-२४ मधील जमा व खर्चाचा गोषवारा**

**(रूपये कोटीत)**

| अ.क्र. | बाब (जमा) | अपेक्षित जमा | बाब (खर्च) | अपेक्षित खर्च |
|---|---|---|---|---|
| १ | उपकर | ३४१४.०० | विविध कल्याणकारी योजनांवरील खर्च | ३८७८.५६ |
| २ | बँकेतील मुदतठेवीवरील व्याज | ७०८.४० | प्रस्तावित योजना | ०.०० |
| ३ | नोंदणी फी | ०.१९ | प्रशासकिय खर्च | ६९.८७ |
| ४ | मासिक वर्गणी | ०.०३ | उपकर जमा रक्कमेपोटी देय प्रशासकीय खर्चाची (१%) तरतूद | ०.०७ |
| ५ | मध्यान्ह भोजन लाभ शुल्क | ०.०० | नजर चुकीने/ अनावधानाने जमा रक्कमेचा परतावा | ४.०० |
| ६ | इतर जमा | ०.०२ | इतर खर्च | ६६.६३ |
| | **एकूण जमा** | **४१२२.६४** | **एकूण खर्च** | **४०१९.१२** |

**ठराव क्र. ६० (१६)/२०२४ :-**

**मंडळाच्या सन २०२२-२३ चे रू. ३१८१.७९ कोटी जमा व रू. ३८०९.५२ कोटी खर्चाचे सुधारित अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक मा. अध्यक्ष यांचे मान्यतेने शासन मान्यतेस सादर केलेल्या कार्यवाहीस मंडळाची मान्यता प्रदान करण्यात यावी तसेच, मंडळाच्या सन २०२३-२४ या आर्थिक वर्षाचे रू. ४१२२.६४ कोटी जमा व रू. ४०१९.१२ कोटी खर्चाचे रक्कमेच्या मुळ अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकास मंडळाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

**विषय क्र.१७ :- महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाचे सन २०२१-२२ या आर्थिक वर्षाच्या वार्षिक जमा खर्चाच्या लेख्यास (Annual Account) मंडळाची मान्यता देणेबाबत.**

मंडळ सचिव यांनी सादर केले की, इमारत आणि इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) अधिनियम, १९९६ च्या कलम २७ (१) अन्वये मंडळाचे प्रत्येक आर्थिक वर्षाचे लेखे तयार करणेबाबत तरतूद आहे. अधिनियमाच्या कलम २७ (२ ते ५) मंडळाच्या मान्यतेने, मा. महालेखापालांच्या लेखापरीक्षणानंतर वार्षिक अहवाल शासनमार्फत विधीमंडळासमोर सादर करण्याची तरतूद आहे. सन २००७-०८ पासून ते सन २०२०-२१ मंडळाचे वार्षिक लेखे सनदी लेखापालांकडून तयार करून मंडळाची वेळोवेळी मान्यता घेण्यात आली आहे. सन २०२०-२१ चे लेख्यांचे मा. महालेखापाल कार्यालयाकडून संव्यवहार लेखापरिक्षण (Transaction Audit) होवून उपस्थित केलेल्या आक्षेपांचे अनुपालन मंडळाकडून सादर केले आहेत. मा महालेखापाल कार्यालयाकडून लेख्यांना मंजुरी प्राप्त होताच अंतिम लेखे राज्य शासन व महालेखापाल कार्यालयास सादर करण्यात येत आहेत. सध्या मंडळाचे सन २०२१-२२ या आर्थिक वर्षाचे लेखे सनदी लेखापाल यांचेकडून प्रमाणित करून घेण्यात आलेले आहेत.

२. मंडळाच्या वार्षिक लेख्यांमध्ये, उत्पन्न व खर्च विवरणपत्र (Income & Expenditure Accouts), ताळेबंद (Balance Sheet), जमा व खर्चाची परिशिष्ठे (Shedules), जमा व खर्चाचे विवरणपत्र (Receipt & Payament Accounts) इ.चा समावेश असतो. अशाप्रकारचे सन २००७-०८ पासून ते सन २०२०-२१ मंडळाचे वार्षिक लेखे सनदी लेखापालांकडून तयार करून त्यास मंडळाची वेळोवेळी मान्यता घेण्यात आली आहे. त्यानुसार सद्या मंडळाचे आर्थिक वर्ष २०२१-२२ या वर्षाचे जमा व खर्चाचे लेखे मंडळाने नियुक्त केलेल्या सनदी लेखापाल (CA) मे. के. एस. संघवी आणि कंपनी, मुंबई यांचेकडून लेखे प्रमाणित करून मंडळास सादर करण्यात आले आहेत. सदरहू लेखे मंडळाच्या मान्यतेस सादर करण्यात येत आहेत. सदर लेख्यांमध्ये, उत्पन्न व खर्च विवरणपत्र (Income & Expenditure Accouts), ताळेबंद (Balance Sheet), जमा व खर्चाची परिशिष्ठे (Shedules), जमा व खर्चाचे विवरणपत्र (Receipt & Payament Accounts) इ.चा समावेश आहे. त्याचा गोषवारा पुढीलप्रमाणे-

**सन २०२१-२२ वार्षिक लेखे जमा व खर्चाचा गोषवारा (रू कोटीत)**

| अ.क्र. | जमेची बाब | जमा रक्कम | खर्चाची बाब | खर्च रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | उपकर | २२६६.३९ | विविध कल्याणाकारी योजनांवरील खर्च | १७३६.०३ |
| २ | नोंदणी शुल्क | ३.५४ | प्रशासकीय खर्च | ६७.११ |
| ३ | बँकेतील मुदत ठेवीवरील व्याज | ४१३.९३ | घसारा | ०.१६ |
| ४ | इतर जमा | ४.१४ | इतर खर्च | ०.०० |
| | **एकूण जमा** | **२६८८.००** | **एकूण खर्च** | **१८०३.३०** |

मंडळाचे मान्यतेनंतर सदर लेख्यांचे संव्यवहार लेखापरिक्षण (Transaction Audit) करण्यासाठी भारताचे मा. नियंत्रक व महालेखापरीक्षक कार्यालयास सादर करण्याच्या कार्यवाहीस मान्यतेस्तव सादर. मा. महालेखापाल कार्यालयाने संव्यवहार लेखापरिक्षण (Transaction Audit) मध्ये काही आक्षेप उपस्थित केलेस त्यांचे अनुपालन करून परीपूर्ण लेखे इमारत आणि इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) अधिनियम, १९९६ च्या कलम २७ (२ ते ५) अन्वये मंडळाच्या मान्यतेने, वार्षिक मंडळाचे सन २०२१-२२ या आर्थिक वर्षाच्या "वार्षिक जमा खर्चाच्या लेख्याचा" (Annual Account) अहवाल शासनमार्फत विधीमंडळासमोर सादर करण्याच्या कार्यवाहीस मंडळाच्या मान्यतेस्तव सविनय सादर.

**ठराव क्र. ६० (१७)/२०२४ :-**

**मंडळाचे सन २०२१-२२ या आर्थिक वर्षाच्या "वार्षिक जमा खर्चाच्या लेख्यास" (Annual Account) मंडळाची मान्यता देण्यात येत आहे व तदनंतर सदर लेखे राज्य शासन व महालेखापाल कार्यालयास सादर करणेबाबत मंडळाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

**विषय क्र.१८ :- महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या सन २०२२-२३ व२०२३-२४ या आर्थिक वर्षाच्या लेखाविषयक कामकाजासाठी आणि सन २०२३-२४ व २०२४-२५ या आर्थिक वर्षाच्या वस्तू व सेवाकर व आयकर विषयक कामकाजासाठी सनदी लेखापाल यांची नियुक्ती करणेबाबत.**

मंडळ सचिव यांनी सादर केले की, इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) अधिनियम १९९६ मधील कलम २७ (१) नुसार भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक (CAG) यांच्या सल्ल्याने विहीत केलेल्या नमुन्यामध्ये मंडळाचे अचूक लेखे व इतर अभिलेख जतन केले जातील आणि मंडळाच्या लेख्यांचे वार्षिक विवरणपत्र (Annual Statement of Accounts) तयार केले जाईल अशी तरतूद आहे. तसेच महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) नियम २००७ मधील कलम ४४ नुसार, मंडळ त्याच्या आर्थिक वर्षाचे लेखे संबंधित आर्थिक वर्ष संपल्यानंतर प्रत्येक वर्षी १ एप्रिल नंतर आणि कमाल ३१ ऑक्टोंबर अखेर संबंधित वर्षाच्या लेखा परीक्षण अहवालाच्या प्रती सह केंद्र व राज्य शासनास सादर करेल अशी तरतूद आहे.सन २००७-०८ ते सन २०२१-२२ या आर्थिक वर्षांच्या लेख्यांचे वार्षिक विवरणपत्र तयार करताना लेखांकनाची विहीत पध्दती आणि अचूकता यामध्ये वाढ होणे आणि मा. महालेखापाल कार्यालयास विहित वेळेत वार्षिक लेखे सादर होण्याच्या दृष्टीने सन २००७-०८ या वर्षांपासून मंडळाचे लेखे तयार करण्यासाठी सनदी लेखापालांची नियुक्ती करण्यात येते. त्यानुसार मंडळाचे सन २०२२-२३ व २०२३-२४ या आर्थिक वर्षाचे लेखे तयार करण्यासाठी आणि सन २०२३-२४ व २०२४-२५ या आर्थिक वर्षाच्या वस्तू व सेवाकर, आयकर विषयक एकत्रित कामकाजासाठी एका सनदी लेखापाल संस्थेची नियुक्ती करणे आवश्यक आहे.

२. इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) अधिनियम १९९६ मधील कलम २७ (१) नुसार, तयार करण्यात येत असलेल्या मंडळ लेख्यांचे वार्षिक विवरणपत्रामध्ये जमा व खर्चाच्या बाबी अंतर्गत बांधकाम कामगार उपकर नोंदणी नुतनीकरण शुल्क व इतर महसुली जमा तसेच मंडळाच्या विविध कल्याणकारी योजना आणि प्रशासकीय खर्च यांचा समावेश असतो. सन २००७-०८ पासून मंडळाकडील बांधकाम कामगार नोंदणी, नुतनीकरण आणि कल्याणकारी योजनांच्या खर्चामध्ये लक्षनीय वाढ झाल्यामुळे मागील तीन वर्षामध्ये मंडळाच्या अंदाजपत्रक जमा व खर्च रक्कमेमध्येही मोठी वाढ झाली आहे. त्यामुळे मंडळाच्या लेख्यांचे वार्षिक विवरणपत्र तयार करताना लेखांकनाची विहीत पध्दती आणि अचूकता वाढण्यासाठी सन २००७-०८ पासून ते सन २०२१-२२ अखेर सनदी लेखापालांकडून तयार करून घेण्यात आले आहेत तदनंतर सदर

लेख्यांचे मा. महालेखापाल कार्यालयाकडून Transaction Audit होवून उपस्थित केलेल्या आक्षेपांचे अनुपालन करून मा. महालेखापाल कार्यालयाने मंजुरी दिलेल्या सन २०१९-२० अखेरचे वार्षिक लेख्यांचे विवरणपत्र शासनामार्फत विधीमंडळास सादर करण्यात आले आहेत. अशा प्रकारे मंडळाचे वार्षिक लेख्यांचे विवरणपत्र तयार करण्यासाठी घेण्यात येत असलेल्या सनदी लेखापालांच्या सेवा समाधानकारक व उपयुक्त असल्याने सन २०२२-२३ व २०२३-२४ या आर्थिक वर्षाचेही लेखे तयार करण्यासाठी आणि सन २०२३-२४ व २०२४-२५ या आर्थिक वर्षाच्या वस्तू व सेवाकर, आयकर विषयक एकत्रित कामकाजासाठी एका सनदी लेखापाल संस्थेची नियुक्ती करणे प्रस्तावित आहे. त्यानुसार मंडळाचे सन २०२२-२३ व २०२३-२४ या आर्थिक वर्षाचे लेखे तयार करण्यासाठी आणि सन २०२३-२४ व २०२४-२५ या आर्थिक वर्षाच्या वस्तू व सेवाकर, आयकर विषयक एकत्रित कामकाजासाठी एका सनदी लेखापाल संस्थेची नियुक्ती करण्याच्या पुढील प्रक्रीयेस मंडळाच्या मान्यतेस्तव सादर करण्यात येत आहे.

**ठराव क्र. ६० (१८)/२०२४ :-**

**मंडळाचे सन २०२२-२३ व २०२३-२४ या आर्थिक वर्षाचे लेखे आणि सन २०२३-२४ व २०२४-२५ या आर्थिक वर्षाच्या वस्तू व सेवाकर, आयकर विषयक कामकाजासाठी कार्यालयीन स्तरावर खरेदी समिती गठीत करून दरपत्रकाने खरेदी प्रक्रीया राबवून एका सनदी लेखापाल संस्थेची नियुक्ती करण्याच्या प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

**विषय क्र.१९ :- महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाचे सन २०२३-२४ चे सुधारित अर्थसंकल्पास व सन २०२४-२५ च्या अर्थसंकल्पास मान्यता देणेबाबत.**

मंडळ सचिव यांनी सादर केले की, इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) अधिनियम १९९६ मधील कलम २५ नुसार मंडळाने प्रत्येक आर्थिक वर्षांचे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक विहित केलेल्या नमुन्यात तयार करुन केंद्र व राज्य शासनास सादर करणेबाबत तरतूद आहे. त्यानुसार मंडळाने आर्थिक वर्षनिहाय मुळ व सुधारीत अंदाजपत्रके तयार करून त्यास वेळोवेळी मंडळाची मान्यता घेतली आहे. सन २०२३-२४ च्या सुधारीत व सन २०२४-२५ च्या मुळ अंदाजपत्रक मा. अध्यक्ष यांचे मान्यतेने शासनास सादर करण्याची कार्यवाही केली आहे.

**अ. मंडळाचे सन २०२३-२४ चे सुधारित अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक**

इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) अधिनियम १९९६ मधील कलम २५ नुसार, माहे जाने/ फेब्रु, २०२३ मध्ये मंडळाचे सन २०२३-२४ या आर्थिक वर्षांचे रु. ४१२२६४.२० लाख जमेचे व रु. ४०१९१२.७० लाख एवढया खर्चाचे मूळ अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक तयार करण्यात आले होते. तत्पुर्वी दि. १२.१२.२०२३ रोजी मंडळ बैठक पार पडल्याने सदर मुळ अंदाजपत्रकास मंडळाची मान्यता घेता आली नसल्याने सदर मुळ अंदाजपत्रक मा. अध्यक्ष,म.इ.वइ.बां.का.क.मं.,मुंबई तथा मा. मंत्री, कामगार यांच्या मान्यतेनंतर मंडळ पत्र दि. १७.०३.२०२३ अन्वये शासनास मान्यतेस्तव सादर करण्यात आले होते. शासनास सादर करण्यात आलेल्या सन २०२३-२४ च्या मुळ अंदाजपत्रकाच्या अनुषंगाने माहे नोव्हें.,२०२३ अखेर आठमाही प्रत्यक्ष जमा व खर्चावर आधारीत उर्वरीत चारमाही करीता संभाव्य जमा व खर्चाच्या आधारे सन २०२३-२४ चे सुधारित अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. प्रत संलग्न सन २०२३-२४ चे सुधारित अंदाजपत्रकाचा गोषवारा पुढीलप्रमाणे-

**सुधारित अंदाजपत्रक जमेचा गोषवारा** **(रु. लाखात)**

| अ.क्र. | बाब (जमा) | मूळ अंदाजपत्रक सन २०२३-२४ (BE) | माहे एप्रिल ते नोव्हें., २०२३ अखेर आठमाही प्रत्यक्ष जमा | माहे डिंसें. २०२३ ते मार्च २०२४ या चारमाही करीता संभाव्य अंदाजित जमा | सन २०२३-२४ मधील जमेचे सुधारित अंदाज (RE) |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६(४+५) |
| १ | उपकर | ३४१४००.०० | २०१९६२.५८ | १०४७८६.९६ | ३०६७४९.५४ |
| २ | बँकेतील बचत व मुदत ठेवीवरील व्याज | ७०८४०.०० | ५०६३३.९६ | १८६१७.८१ | ६९२५१.७७ |
| ३ | बांधकाम कामगार नोंदणी फी | १८.८० | ७.६२ | ६.८१ | १४.४३ |
| ४ | बांधकाम कामगार मासिक वर्गणी | ३.४० | २.३५ | १.०० | ३.३५ |
| ५ | इतर जमा | २.०० | ०.००७५ | ०.००२५ | ०.०१ |
| | **एकूण जमा** | **४१२२६४.२०** | **२५२६०६.५१** | **१२३४१२.५९** | **३७६०१९.१०** |

**सुधारित अंदाजपत्रक खर्चाचा गोषवारा** **(रु. लाखात)**

| अ.क्र. | बाब (खर्च) | मूळ अंदाजपत्रक सन २०२३-२४ (BE) | माहे एप्रिल ते नोव्हें., २०२३ अखेर आठमाही प्रत्यक्ष खर्च | माहे डिंसें. २०२३ ते मार्च २०२४ या चारमाही करीता संभाव्य अंदाजित खर्च | सन २०२२३-२४ मधील खर्चाचे सुधारित अंदाज खर्च (RE) |
|---|---|---|---|---|---|
| १ | विविध कल्याणकारी योजनांवरील खर्च | ३८८१५६.४४ | ३२१५८९.०२ | ९३३२२.९४ | ४१४९११.९६ |
| २ | प्रस्तावित योजना | ०.०० | ०.०० | २.०० | २.०० |
| ३ | प्रशासकिय खर्च | ६९८६.८१ | ३१२९.१८ | २१३७.०९ | ५२६६.२७ |
| ४ | उपकर जमा रक्कमेपोटी देय प्रशासकीय खर्चाची (१%) तरतूद | ७.०० | ७.६० | १६.४५ | २४.०५ |
| ५ | नजर चुकीने/ अनावधानाने जमा रक्कमेचा परतावा | ४००.०० | ३०.८९ | १०४९.६८ | १०८०.५७ |
| ६ | इतर प्रशासकीय खर्च | ६३६२.४५ | १४१२९.१४ | १०५५२.९० | २४६८२.०४ |
| | **एकूण खर्च** | **४०१९१२.७०** | **३३८८८५.८३** | **१०७०८१.०६** | **४४५९६६.८९** |

सन २०२३-२४ या आर्थिक वर्षामध्ये जमेची मुळ तरतूद रू ४१२२६४.२० लाख आठमाही प्रत्यक्ष जमेच्या प्रमाणानुसार सुधारीत करून रू. ३७६०१९.१० लाख इतकी अंदाजित केली आहे. तसेच खर्चाची मुळ तरतूद रू. ४०१९१२.७० लाख आठमाही प्रत्यक्ष खर्चाची आकडेवारी आणि उर्वरीत चारमाही कालावधीमध्ये सुरू होणा-या संभाव्य नवीन कल्याणकारी योजना (गृहपयोगी वस्तु संच वाटप, सर्वसमावेशक माहितीपुस्तिका छपाई, तपासणी ते उपचार आरोग्य योजना इ.) करीता सुधारीत करून रू. ४४५९६६.८९ लाख इतकी अंदाजित केली आहे. अशा प्रकारे रू. ६९९४७.७९ लाख इतक्या महसुली जमेपेक्षा अधिक्याच्या खर्चाचे सुधारित अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदर अधिक्याचा खर्च रू. ६९९४७.७९ लाख सन २०२३-२४ मधील मंडळाच्या राष्ट्रीयकृत बँकांच्या मुदतठेव पावत्यांमध्ये (FDR) केलेल्या गुंतवणूक रक्कम रू. ९,०५,००० लाख मधून भागविणे प्रस्तावित आहे.

**ब. सन २०२४-२५ चे मूळ अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक-**

इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) अधिनियम १९९६ मधील कलम २५ नुसार,सन २०२१-२२ आणि सन २०२२-२३ या आर्थिक वर्षांचे अंतिम खर्चाची आकडेवारी एफ एम जी आणि सन २०२३-२४ या चालू वर्षाचे सुधारीत अंदाज या आधारे सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाचे रु. ४४७२२१.६२ लाख जमा व रु. ५९७१९८.९५ लाख खर्चाचे मूळ अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. प्रत संलग्न सन २०२४-२५ चे मूळ अंदाजपत्रकाचा गोषवारा खालीलप्रमाणे-

**सन २०२४-२५ मधील जमा व खर्चाचा गोषवारा** **(रूपये लाखात)**

| अ.क्र | महसूली जमा | मुळ तरतुद (BE) | महसूली खर्च | मुळ तरतुद (BE) |
|---|---|---|---|---|
| १ | उपकर | ३७००००.०० | विविध कल्याणकारी योजनांवरील खर्च | ४३१५५६.०५ |
| २ | बँकेतील मुदतठेवीवरील व्याज | ७७२००.०० | प्रस्तावित योजना | ०.०० |
| ३ | नोंदणी फी | १६.०० | प्रशासकिय खर्च | ६१८०.५० |
| ४ | मासिक वर्गणी | ५.६० | इतर खर्च- प्रशासकिय खर्च | ८७३७.४६ |
| ५ | इतर जमा | ०.०२ | नजर चुकीने/ अनावधानाने जमा रक्कमेचा परतावा | ५००.०० |
| | | | उपकर जमा रक्कमेपोटी देय प्रशासकीय खर्चाची (१%) तरतूद | ३०.०० |
| | **एकूण जमा** | **४४७२२१.६२** | **एकूण खर्च** | **४४७००४.०१** |

सन २०२१-२२ आणि सन २०२२-२३ या आर्थिक वर्षांचे अंतिम जमेची आकडेवारी (FMG) आणि सन २०२३-२४ या चालू वर्षाचे सुधारीत जमेचे अंदाज व त्याप्रमाणात

विविध महसुली जमेच्या बाबींवरील सरासरी वाढ तसेच प्रस्तावित मंडळ सेस पोर्टलचे विकसन इ. आधारे सन २०२४-२५ या आर्थिक वर्षामध्ये जमेची मुळ तरतूद रू ४४७२२१.६२ लाख अंदाजित केली आहे. सन २०२३-२४ च्या सुधारीत जमेच्या अंदाजाच्या तुलनेत सदर मुळ तरतूद १८% टक्कयांनी वाढीव आहे. तसेच, सन २०२१-२२ आणि सन २०२२-२३ या आर्थिक वर्षांचे अंतिम खर्चाची आकडेवारी (FMG) आणि सन २०२३-२४ या चालू वर्षाचे सुधारीत खर्चाचे अंदाज व त्याप्रमाणात विविध महसुली खर्चाच्या बाबींवरील सरासरी वाढ तसेच प्रस्तावित नवीन कल्याणकारी योजना (तालुका इमारत कामगार सुविधा केंद्र (TBWFC) स्थापन करणे, इमारत बांधकाम कामगारांसाठी शेड (कामगार नाका) बांधणे, मंडळाकडील बांधकाम कामगारांच्या तक्रारीचे निवारण करण्याकरीता हेल्पलाईन सेवा कार्यान्वित करणे.) इ. आधारे सन २०२४-२५ या आर्थिक वर्षामध्ये खर्चाची मुळ तरतूद रू ४४७००४.०१ लाख अंदाजित केली आहे. सन २०२३-२४ च्या सुधारीत खर्चाच्या अंदाजाच्या तुलनेत सदर मुळ तरतूद ०.२३% टक्कयांनी वाढीव आहे.अशा प्रकारे सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाकरीता रू. २१७.६१ लाख इतक्या महसुली अधिक्याचे मुळ अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

**ठराव क्र. ६० (१९)/२०२४ :-**

**मंडळाच्या सन २०२३-२४ या आर्थिक वर्षामध्ये सुधारीत जमा तरतुद रू. ३,७६,०१९.१० लाख आणि सुधारीत खर्च तरतुद रू. ४,४५,९६६.८९ लाख इतक्या रक्कमेच्या सुधारीत अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकास मंडळाची मान्यता प्रदान करण्यात यावी तसेच, मंडळाच्या सन २०२४-२५ या आगामी आर्थिक वर्षाच्या मुळ जमा तरतुद रू. ४,४७,२२१.६२ लाख आणि मुळ खर्च तरतुद रू. ५,९७,१९८.९५ लाख इतक्या रक्कमेच्या मुळ अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकास मंडळाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

**विषय क्र.२०:- स्थानिक स्वराज्य संस्थांनी मंडळाचा बांधकाम उपकर वसूल करुन मंडळाकडे भरणा केल्यापोटी मागील ३ वर्षात विनामागणी (Unclaimed) उपकर वसूली शुल्क मंडळाचे जमेस घेणे आणि चालू दायित्वातून कमी करणेस मान्यता देणेबाबत.**

मंडळ सचिव यांनी सादर केले की, इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण उपकर अधिनियम १९९६ च्या कलम ३/१ अनुसार केंद्रशासनाने अधिसुचना क्र. एसओ २८९९, दिनांक २६ सप्टेंबर १९९६ अन्वये बांधकामाच्या एकूण मुल्याच्या (जमिनीचे मूल्य वगळून ) १% दराने उपकर गोळा करण्याचे आदेश निर्गमित केले आहे. या अनुषगांने स्थानिक स्वराज्य संस्था प्राधिकरण यांच्या कडून उपकर मंडळाच्या बँक खात्यामध्ये जमा केले जातो.बांधकाम कामगार कल्याण उपकर अधिनियम, १९९६ कलम ३(३) व इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण उपकर नियम, १९९८ कलम ५(२) मध्ये स्थानिक संस्थानी गोळा केलेली उपकराची रक्कम गोळा करण्यासाठी झालेली प्रत्यक्ष खर्चाची रक्कम जी १% पेक्षा जास्त नसणार कमी करून मंडळाकडे भरणे आवश्यक असणेबाबत तरतूद आहे.

२. मा. महालेखापाल, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी त्यांचे लेखा आक्षेप क्र.२ दिनांक २०-०२-२०२३ अन्वये २०२०-२०२१ व त्यापुढील कालावधीत परतावा दायित्व म्हणून दर्शविण्यात आलेल्या व मागणी करण्या न आलेले उपकर वसूली चार्जेस (Unclaimed) आर्थिक वर्ष २०१२-२०१३ ते २०२०-२०२१ रू. ४२,७४,५३,८९६/- संबंधित संस्था कडून मागणी प्राप्त न झाल्यामुळे क्षेत्रिय कार्यालयाकडून परतावा देण्याबाबत शिफारशी प्राप्त न झाल्यामुळे पुढील वार्षिक लेख्यात दायित्व कमी करून ती रक्कम उपकर जमा लेखा शिर्षामध्ये (Retained Back To Income) दर्शविण्याबाबत लेखा आक्षेप नोंदविण्यात आला आहे. त्याचा तपशिल खालील प्रमाणे-

| अ.क्र. | वित्तीय वर्ष | १% प्रशासकीय खर्च दर्शविण्यात आलेले उपकर दायित्व |
|---|---|---|
| १ | २०१२-२०१३ | ९३९१०/- |
| २ | २०१३-२०१४ | ६४७८६/- |
| ३ | २०१४-२०१५ | ४९४४५/- |
| ४ | २०१५-२०१६ | ११३११६/- |
| ५ | २०१६-२०१७ | १०४७९०/- |
| ६ | २०१७-२०१८ | १५९९५९/- |
| ७ | २०१८-२०१९ | १३५८०३३९६/- |
| ८ | २०१९-२०२० | १५०८८२९५९/- |
| ९ | २०२०-२०२१ | १४०१८१५३५/- |
| | एकूण | ४२,७४,५३,८९६/- |

लेखा आक्षेपामध्ये नमूदप्रमाणे संबंधित आस्थापनांचा मागणी न करण्यात आलेल्या रक्कमेबाबत संबंधित आस्थापनेस याबाबत खुलासा करण्यासाठी पत्रव्यवहार करण्यात आला होता. सदर पत्रव्यवहारानंतर विहित मुदतीत संबंधित आस्थापनांकडुन कोणताही प्रतिसाद प्राप्त न झाल्याने आगामी मंडळ बैठकीमध्ये विषयांकीत प्रकरणे चर्चेस ठेवून ठरावाद्वारे रक्कमा व्यपगत करून मंडळाच्या वार्षिक लेख्यात जमा बाजूस अंर्तभूत करण्याबाबत निर्णय घेणे प्रस्तावित आहे.

**ठराव क्र. ६० (२०)/२०२४ :-**

**सन २०१२-१३, २०१३-१४, २०१४-२०१५, २०१५-२०१६, २०१६-२०१७, २०१७-२०१८, २०१८-२०१९, २०१९-२०२० व २०२०-२०२१ मध्ये उपकर दायित्व म्हणून दर्शविण्यात आलेल्या वरील प्रमाणे एकूण रक्कमा रू.४२,७४,५३,८९६/- मंडळाचे पुढील वार्षिक लेखे तयार करताना उपकर जमा शिर्षाखाली जमा करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

**विषय क्र. २१:- महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजनांच्या अंमलबजावणीबाबत.**

**अ. नोंदित जिवीत (सक्रिय) बांधकाम कामगाराच्या पहिल्या दोन पाल्याकरीता स्पर्धा परिक्षांच्या अभ्यासाकरीता अर्थसहाय्य निश्चित करणेबाबत विचार विनिमय करणे.**

मंडळ सचिव यांनी सादर केले की, मंडळामार्फत इयत्ता ०१ ते पदव्युत्तर पदवीपर्यंत शैक्षणिक सहाय देण्यात येते तसेच वैद्यकीय व अभियांत्रीकी शिक्षणाकरीता प्रतिवर्ष अनुक्रमे रू.१.०० लक्ष व रू.६० हजार इतके अर्थसहाय देण्यात येते. तथापि, बहुतांश विद्यार्थी केंद्र व राज्य व शासनामार्फत घेतल्या जाणाऱ्या स्पर्धा परिक्षांचाही अभ्यास करत असतात अशा विद्यार्थ्यांना सहाय्य पुरविण्याची बाब मंडळाच्या विचाराधीन होती.

२. महाराष्ट्र लोकसेवा आयोग, केंद्रीय लोकसेवा आयोगामार्फत घेतल्या जाणाऱ्या बहुतांश स्पर्धा परीक्षांमध्ये पुर्व परीक्षा, मुख्य परीक्षा व मुलाखत या टप्यांचा समावेश होतो. सदर परीक्षांकरीता लागणाऱ्या अभ्यास साहित्य व अनुषंगीक खर्चाचे प्रमाण अधिक आहे. त्यामुळे अशा परिक्षामध्ये सहभागी होण्यास इच्छूक विद्यार्थ्यांना सहाय्य पुरविणे प्रस्तावित आहे.

३. तसेच मंडळ बैठकीमध्ये इयत्ता ९, १०, ११ व १२ वी पास व स्पर्धा परीक्षा करणारे महाराष्ट्र लोकसेवा आयोग व केंद्रीय लोकसेवा आयोगामार्फत स्पर्धा परिक्षेचा अभ्यास करणाऱ्या नोंदीत सक्रीय (जिवीत) बांधकाम कामगारांच्या पाल्यांना संगणकीय टॅब वितरीत करण्याचा प्रस्ताव मंडळाने प्रस्ताव शासनास सादर करण्यात यावा.

**ठराव क्र. ६० (२१-अ)/२०२४ :-**

**इयत्ता १०, ११, १२ वी पास व उच्चशिक्षण घेणाऱ्या (पदवी व पदव्युत्तर) तसेच, महाराष्ट्र लोकसेवा आयोग व केंद्रीय लोकसेवा आयोगामार्फत स्पर्धा परिक्षेचा अभ्यास करणाऱ्या नोंदीत सक्रीय (जिवीत) बांधकाम कामगारांच्या पाल्यांना संगणकीय टॅब वितरीत करण्याचा प्रस्ताव मंडळाने शासनास सादर करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

**ब. नोंदणी / नुतनीकरणासाठी बांधकाम कामगारांना अर्ज केल्यावर नोंदणी / नुतनीकरण अर्ज मंजूर होण्यापूर्वीच्या किंवा अर्जातील त्रुटीची पुर्तता करण्यापूर्वीच्या कालावधीत संबंधित कामगाराचा मृत्यु झाल्यास मंडळामार्फत करावयाच्या कार्यवाहीबाबत विचार विनिमय करणे.**

मंडळ सचिव यांनी सादर केले की, मंडळामार्फत नोंदीत सक्रीय बांधकाम कामगाराचा नैसर्गिक मृत्यू झाल्यास त्याच्या वारसास २ लक्ष, अंत्यविधी सहाय्य रू.१००००/- व रू .२४०००/- प्रति वर्ष याप्रमाणे पाच वर्षाकरीता देण्यात येते.

मंडळाकडे नोंदणी/नुतणीकरण अर्ज प्राप्त झाल्यावर कागदपत्रांच्या तपासणीअंती नोंदणी अधिकाऱ्यामार्फत नोंदणी मंजुर करण्यात येते. बहुतांश वेळी नोंदणी अधिकाऱ्याकडील प्राप्त अर्जांचे प्रमाण अधिक असल्याने व नोंदणी अधिकाऱ्यांची संख्या मर्यादीत असल्याने बांधकाम कामगारांच्या नोंदणी अर्जावर कार्यवाही करण्यास विलंब होत असल्याची बाब निदर्शनास येते अशा वेळी एखाद्या बांधकाम कामगाराने नोंदणी/नुतणीकरण अर्ज केल्यावर सदर अर्ज मंजुर होण्यापुर्वीच्या कालावधीत बांधकाम कामगाराचा मृत्यू झाल्यास संबंधित बांधकाम कामगाराच्या वारसास कोणतेही अर्थसहाय मिळत नाही. अशा प्रकरणी करावयाच्या कार्यवाहीबाबत मंडळास मार्गदर्शनपर संदर्भ जिल्हा कार्यालय व संघटनामार्फत प्राप्त होत आहेत त्यामुळे अशा प्रकरणाबाबत मंडळ बैठकीत विचार विनीमय करण्यात आला.

**ठराव क्र. ६० (२१-ब)/२०२४ :-**

**नोंदणी/नुतनीकरणासाठी बांधकाम कामगारांना अर्ज केल्यावर नोंदणी /नुतनीकरण अर्ज मंजूर होण्यापूर्वीच्या कालावधीत संबंधित कामगाराचा मृत्यु झाल्यास संबधित बांधकाम कामगारास लाभ वितरीत करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

**क. क्षेत्रीय कार्यालयाकडे ऑफलाईन पध्दतीने प्राप्त मृत्यु लाभाच्या प्रलंबित अर्जावर करावयाच्या कार्यवाहीबाबत विचार विनिमय करणे.**

मंडळ सचिव यांनी सादर केले की, माहे जुलै २०२० पासून मंडळामार्फत बांधकाम कामगारांची नोंदणी/नुतणीकरण व लाभ वाटप ऑनलाईन पध्दतीने करण्यात येत आहे. तथापि, त्यापुर्वी मंडळामार्फत ऑफलाईन पध्दतीने प्राप्त अर्जावर कार्यवाही करण्यात येत होती मंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांतर्गत लाभाचे अर्ज बांधकाम कामगार/त्यांच्या वारसांमार्फत क्षेत्रीय कार्यालयाकडे जमा करण्यात येत होते व त्यावर जिल्हा कार्यालयामार्फत कार्यवाही करण्यात येत होती.

माहे जुलै २०२० पासून ऑनलाईन पध्दतीने कामकाज सुरू झाल्यावर बहुतांश ऑफलाईन पध्दतीने क्षेत्रीय कार्यालयाकडे उपलब्ध अर्ज संगणक प्रणालीवर घेण्यात आले तथापि, तदनंतरही बहुतांश ऑफलाईन अर्ज जिल्हा कार्यालयाकडे प्रलंबित असलयाची बाब निदर्शनास आली आहे. त्यानुसार क्षेत्रीय कार्यालयाकडून त्यांच्याकडील प्रलंबित नैसर्गिक मृत्यूबाबतच्या ऑफलाईन अर्जाची संख्या मंडळास सादर करणेबाबत कळविण्यात आले आहे. त्यांचेकडील प्राप्त माहिती खालीलप्रमाणे -

| अ .क्र. | जिल्हा | ऑफलाईन प्रलंबित लाभाचे अर्जांची संख्या | प्रलंबित लाभाचे अर्जावर येणारा अंदाजित खर्च (DBT) (रू.) |
|---|---|---|---|
| १ | वर्धा | ० | ० |
| २ | औरंगाबाद | १८८ | ७८८५००० |
| ३ | बुलढाणा | ० | ० |
| ४ | जळगाव | ० | ० |
| ५ | लातूर | ५६०० | ९२७१२००० |
| ६ | ठाणे | ० | ० |
| ७ | कल्याण | ० | ० |
| ८ | अकोला | ० | ० |
| ९ | परभणी | ११७७ | ७८५३००० |
| १० | अहमदनगर | १० | २९०००० |
| ११ | पालघर | ० | ० |
| १२ | जालना | १४७८ | ३७६५४००० |
| १३ | नाशिक | ० | ० |
| १४ | भिवंडी | ० | ० |
| १५ | मालेगांव | ८३५ | १०१३०००० |
| १६ | भंडारा | ४९२७३ | ३७५३४१००० |
| १७ | इचलकंरजी | ७४२६ | ६०७०६००० |
| १८ | हिंगोली | ४२३ | ८३३२००० |
| १९ | वाशिम | ५५६ | ५४८०००० |

| अ .क्र. | जिल्हा | ऑफलाईन प्रलंबित लाभाचे अर्जांची संख्या | प्रलंबित लाभाचे अर्जांवर येणारा अंदाजित खर्च (DBT) (रू.) |
|---|---|---|---|
| २० | धुळे | ३२५ | ६६४९००० |
| २१ | सातारा | ८७ | २०२०००० |
| २२ | गडचिरोली | २८३९ | ३२९५०००० |
| २३ | मुंबई शहर | ४६ | ८९०००० |
| २४ | मुंबई पूर्व | ० | ० |
| २५ | मुंबई पश्चिम | ० | ० |
| २६ | चंद्रपुर | २९९०७ | २७९७२६००० |
| २७ | यवतमाळ | १२२८४ | १५९४३५००० |
| २८ | गोंदिया | ० | ० |
| २९ | सिंधुदूर्ग | ५८३० | ५६८२१००० |
| ३० | सोलापूर | १८५५ | १७५७७९००० |
| ३१ | पुणे | ० | ० |
| ३२ | नंदुरबार | ३१८ | ३४६०००० |
| ३३ | बीड | ३१११ | ११३४५००० |
| ३४ | उस्मानाबाद | १६३९ | २७५५१००० |
| ३५ | अमरावती | ११३५ | २८२५३००० |
| ३६ | नांदेड | ० | ० |
| ३७ | रत्नागिरी | ० | ० |
| ३८ | रायगड | ० | ० |
| एकूण | | १,३४,३४२ | १,३९,१२,६२,००० |

**ठराव क्र. ६० (२१-क)/२०२४ :-**

**क्षेत्रीय कार्यालयाकडे ऑफलाईन पध्दतीने प्राप्त लाभापैकी मृत्युचा लाभ अदा करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

**विषय क्र. २२ :- महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडे प्राप्त उपकर परतावा प्रकरणांना मान्यता देणेबाबत**

मंडळ सचिव यांनी सादर केले की, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण उपकर अधिनियम १९९६ मधील कलम ३(१) व भारत सरकार यांचे दि. २६.०९.१९९६ चे परिपत्रक तसेच महाराष्ट्र दि. २१.०४.२००८ च्या परिपत्रकानूसार बांधकामावरील खर्चाच्या १ टक्यापेक्षा कमी नाही एवढा (जमीनीची किंमत वगळून) उपकर मंडळाकडे जमा करण्याची तरतूद आहे. त्यानुसार, विविध प्राधिकरण/संस्था/व्यक्ति यांच्याकडून मंडळाच्या बँक खात्यात उपकर भरणा केला जातो.महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार उपकर नियम १९९८ मधील नियम ८ अन्वये उपकराची परिगणना चूकीची झाल्यास अथवा चुकीच्या पध्दतीने उपकराचा भरणा मंडळाकडे झाल्यास तो परतावा करण्याबाबत तरतूद आहे.

२. मंडळाचे दि.१२.१२.२०२२ रोजी संपन्न झालेल्या ५९ व्या बैठकीत ठराव क्र. ५९(१९)/२०२२ नुसार मंडळाच्या खात्यात अनावधानाने/नजरचुकीने/उपकराची जास्तीची रक्कम भरणा केलेल्या प्रकरणांची दायित्व तपासून उर्वरीत परतावा रक्कम मंत्री (कामगार) तथा मा. अध्यक्ष यांच्या मान्यतेने अदा करण्याबाबत ठराव पारीत करण्यात आला होता. त्यानुषंगाने क्षेत्रीय कार्यालयाच्या पडताळणी अहवालानंतर मंडळ स्तरावर छाननी होऊन मा. मंत्री (कामगार) यांच्या मान्यतेने सन २०२२-२३ व सन २०२३-२४ या आर्थिक वर्षातील परतावा प्रकरणाच्या रक्कमा संबंधितास अदा केल्या आहेत.

| अ.क्र. | अस्थापनाचे नाव | उपकर परतावा रक्कम (रु.) |
|---|---|---|
| १ | रेणुका माता मंडळ | २३,०६,०८७ |
| २ | शुभम बिल्डरर्स ॲण्ड डेव्हलपर्स | ८,५४,७९६ |
| ३ | शुभम आधे | १०,००० |
| ४ | शिवम अॅड. को. | १,५०,००० |
| ५ | श्रीराम एंटरप्राईजेस | ६,०५,८०४ |
| ६ | श्री. काशिफ खान | ४५,००० |
| ७. | मे. गोखले इन्फ्राडेव्हलपर्स प्रा. लि. | रु. २,६५,८९०/- |
| ८. | मे. ओरिएन्टल यीस्ट इंडिया प्रा.लि. | रु. २०,१३,१७६/- |
| ९. | आदर्श शिक्षण मंडळ, मिरज. | रु. ८,१०,३३६/- |
| १०. | जीईटी ॲण्ड डी इंडिया लिमिटेड | रु. ३,३६,१३,१३५/- |
| ११. | मे. कल्पतरु प्रोजेक्ट इंटरनॅशनल लि. | रु. ५,३९,०८,३८३/- |
| १२. | मे. ॲक्सिस बँक लि., नाशिक. | रु. ६,४१,९८०/- |

ठराव क्र. ६० (२२)/२०२४ :-

सन २०२२-२३ व सन २०२३-२४ या आर्थिक वर्षातील सदर १२ प्रकरणांमध्ये परतावा प्रकरणाच्या रकमा संबंधितास अदा केल्या आहेत. अशा परतावा प्रकरणी केलेल्या कार्यवाहीस मंडळाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

**विषय क्र.२३ :- महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ मुख्यालय व क्षेत्रिय कार्यालयांना मंडळ कामकाजाकरीता वाहन एक वर्षाच्या कालावधीसाठी भाडे तत्वावर घेण्यास मान्यता देणेबाबत.**

मंडळ सचिव यांनी सादर केले की, मंडळातील विभागीय व जिल्हा स्तरावरील कामकाज कामगार कार्यालयाअंतर्गत अधिकारी व कर्मचारी करत असून बांधकाम कामगारांच्या ऑनलाईन पध्दतीने नोंदणी व नुतनीकरणात दिवसेंदिवस वाढ होत आहे. मंडळाचे कामकाज जिल्हयाच्या शहरी भागापासून ग्रामिण भागापर्यंत पसरलेले असून यामध्ये अधिकारी व कर्मचारी यांना तालुका व गाव पातळीवरील कामगारांच्या तपासणीसाठी जावे लागते त्यामुळे मंडळाचे कामकाज सुलभरीत्या पार पाडणेकरीता विभागीय व जिल्हा कार्यालयांना वाहनाची आवश्यकता असल्याने मंडळाच्या वेळोवेळी संपन्न झालेल्या बैठकीत कामगार आयुक्त कार्यालयांतर्गत कार्यरत विभागीय कार्यालय व जिल्हा कार्यालयाकीता बोलेरो/स्कॉर्पीओ अथवा तत्सम प्रकारचे वाहन जिल्हा कार्यालय प्रमुखांनी संबंधित जिल्हयाच्या प्रादेशिक परिवहन अधिकारी (R.T.O)यांनी निश्चीत केलेल्या दराने अथवा संबंधित विभागाच्या अपर कामगार आयुक्त/कामगार उप आयुक्त यांच्या मान्यतेने मासीक भाडयाचे दर व धाव निश्चीत करून प्रथम एक वर्षाकरीता वाहन भाडेतत्वावर उपलब्ध करून घेण्यास प्रदान करण्यात आली होती. त्यानुसार मंडळ पत्र दि.०२.०२.२०२४अन्वये संबंधित विभाग/जिल्हा कार्यालयातील अधिकाऱ्यांना वाहने भाडेतत्वावरील घेण्याची कार्यपध्दती व वापराबाबत सर्वसमावेशक मार्गदर्शक सुचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. तसेच सदर भाडेतत्वावरील वाहनास वेळोवेळी मुदतवाढ देण्यात आली आहे.

२. ज्या विभाग /जिल्हा कार्यालयांकडे वाहन उपलब्ध नाही अशा नव्याने वाहन भाडेतत्त्वावर उपलब्ध करून देण्याची मागणी करणा-या प्रस्तावांना प्रस्तावित केलेल्या वाहनापैकी स्पर्धात्मक दराद्वारे विहीत खरेदी प्रक्रियेचा अवलंब करून किफायतशीर दराने संबंधित जिल्हयाच्या प्रादेशिक परीवहन प्राधिकरणाने (RTA) यांनी निश्चित केलेल्या दराचे मर्यादेत १ वर्षाचे कालावधीकरीता आणि लॉग-बुक नोंदी प्रमाणिकरण करणेचे अटींना अधिन राहून मान्यता मिळणे आवश्यक आहे. तसेच, ज्या कार्यालयांनी त्यांचेकडील भाडेतत्त्वावर घेतलेल्या वाहन करारनाम्याची मुदत संपल्याने मुदतवाढीची मागणी केली आहे अशा कार्यालयांना वरील नमूद अटी शर्थीच्या अधीन राहून मुदतवाढ देणे आवश्यक आहे.दि.१२.१२.२०२२ रोजीच्या बैठकीतील पारीत ठरावाच्या अनुषंगाने संबंधित विभाग/जिल्हा कार्यालयातील अधिकाऱ्यांना वाहने भाडेतत्वावरील घेण्याची कार्यपध्दती व वापराबाबत सर्वसमावेशक मार्गदर्शक सुचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

३. सद्यस्थितीत क्षेत्रीय कार्यालयाचा वाहने भाडयाने घेण्याचा कालावधी ०१ वर्षाचा असल्याने सदर कालावधी संपत आलेला आहे. ज्या जिल्हा कार्यालयांकडे कामगार विभागाचे वाहन उपलब्ध नाही अशा जिल्हा कार्यालयांसाठी संबंधित विभागाच्या अपर कामगार आयुक्त/कामगार उप आयुक्त यांच्या मान्यतेनुसार Hundai Xcent/ Swift Dezire/Honda Amaze/Toyota Etios/Mahendra Bolero यापैकी एक वाहन जिल्हयाच्या भौगोलिक परिस्थितीनुसार सदर भाडेतत्वावरील वाहनास मुदतवाढ देणे व मा. मंत्री (कामगार) तथा अध्यक्ष महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, कामगार विभाग मंत्रालय, कामगार आयुक्त कार्यालय व मंडळ मुख्यालय यांच्याकरीता प्रत्येकी ०१ इनोव्हा क्रिस्टा अथवा तत्सम प्रकारचे वाहन घेण्यास मुदतवाढ आवश्यक असल्याने त्याबाबतचा प्रस्ताव मा. मंत्री महोदय (कामगार) तथा अध्यक्ष यांनी मान्यता प्रदान केली आहे.

**ठराव क्र. ६० (२३)/२०२४ :-**

**१. ज्या जिल्हा कार्यालयाकडे कामगार विभागाचे वाहन उपलब्ध नाही अशा जिल्हा कार्यालयासाठी जिल्हयाच्या भौगोलिक परिस्थतीनुसार दि.३१.१२.२०२४ पर्यंत वाहन भाडेतत्वावर घेण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**

**२. मा. मंत्री (कामगार), कामगार विभाग, मंत्रालय, कामगार आयुक्त कार्यालय व मंडळ मुख्यालय यांच्याकरीता कार्यालयीन कामकाजासाठी प्रत्येकी एक वाहन भाडेतत्वावर घेण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

**विषय क्र.२४:- महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडील नोंदीत सक्रीय (जिवीत) बांधकाम कामगारांना मध्यान्ह भोजन योजनेअंतर्गत विविध निर्णय घेणेबाबत.**

मंडळ सचिव यांनी सादर केले की, मागील दिनांक १२.१२.२०२२ रोजीच्या ५९ व्या बैठकीतील ठरावानुसार दिनांक ०१.०४.२०२३ पासून बांधकाम कामगारांना भोजन वितरण प्रणाली (RF-Based Card) व्दारे वितरीत करण्याबाबत शासन मान्यतेस प्रस्ताव सादर करण्यात आला होता. त्यास दिनांक ०४.०५.२०२३ रोजीच्या शासन पत्रान्वये मान्यता प्रदान करण्यात आली होती. त्यानुसार सर्व क्षेत्रीय कार्यालयांना कळविण्यात आले होते.

२. भोजन वितरण प्रणाली (RF-Based Card) कार्यान्वित होईपर्यंत कारारनाम्यातील तरतुदीनुसार नोंदवहया ठेवणे व कार्ड वितरण प्रणालीच्या खर्च मर्यादेत देयक अदा करण्यास मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव दिनांक २८.०४.२०२३ रोजी शासनास सादर करण्यात आला होता. तसेच अनोंदीत बांधकाम कामगारांना वितरीत करण्यात येणार भोजन केवळ नोंदीत सक्रीय बांधकाम कामगारांना वितरीत करण्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला होता. त्यास दिनांक २६.०६.२०२३ रोजीच्या शासन पत्रान्वये मान्यता प्रदान करण्यात आली आहे. तदनंतर दिनांक ०१.०७.२०२३ पासून मध्यान्ह भोजन योजना भोजन वितरण प्रणाली (RF-Based Card) कार्डच्या सहाय्याने केवळ नोंदीत बांधकाम कामगारांना वितरीत करण्याचे निर्देश होते तथापि, RF-Based Card सर्व नोंदीत सक्रीय (जिवीत) बांधकाम कामगारांना वितरीत न झाल्याने व बांधकाम कामगारा मध्यान्ह भोजन व रात्रीच्या भोजनापासून वंचित राहू नये याकरीता RF-Based Card वितरणाकरीता दिनांक ३१.०७.२०२३ पर्यंत मुदतवाढीचा प्रस्ताव शासन मान्यतेस सादर करण्यात आला होता त्यास दिनांक ३०.०६.२०२३ च्या पत्रान्वये मान्यता प्रदान करण्यात आली आहे. उपरोक्त मान्यतेच्या अनुषंगाने नोंदीत सक्रीय (जिवीत) बांधकाम कामगारांना मध्यान्ह व रात्रीचे भोजन विनाशुल्क पुरविण्याची मंडळाची धारणा पक्की करण्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला होता. त्यास दिनांक २१.०८.२०२३ रोजीच्या शासन पत्रान्वये मान्यता प्रदान करण्यात आली आहे.दरम्यानच्या कालावधीत मंडळ स्तरावर बाहय यंत्रणेव्दारे मनुष्यबळ पुरविणाऱ्या संस्थेची मुदत संपुष्टात आल्याने कर्मचाऱ्यांच्या सेवा संपुष्टात आल्या आहेत व नवनियुक्त संस्थेव्दारे नविन कर्मचाऱ्यांची नियुक्ती व काही कर्मचारी सेवा सोडून गेल्याने नोंदीत बांधकाम कामगारांना भोजन वितरण प्रणाली (RF-Based Card) चे वितरण कमी प्रमाणात झाल्याचे निर्देशनास आले होते राज्यभरात सुमारे १२.३३ लक्ष नोंदीत बांधकाम कामगारांना भोजन वितरण कार्ड प्रणालीचे वाटप प्रलंबित असल्याने मंडळातर्गत नोंदीत बांधकाम कामगार सदर योजनेपासून वंचित राहू नये याकरीता भोजन वितरण कार्ड वितरणाकरीता दिनांक ०१.०८.२०२३ ते दिनांक ३१.०८.२०२३ पर्यंत मुदतवाढीचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला होता. त्यास दिनांक १८०९.२०२३ च्या पत्रान्वये मान्यता

प्रदान करण्यात आली आहे. तदनंतर दिनांक २३.१०.२०२३ रोजीच्या शासन पत्रान्वये "दिनांक १९.०३.२०१८ अन्वये राबविलेल्या ई-निविदा प्रक्रियेतील Request for Proposal (RFP) मधील तरतुदीस तीन वर्षाचा झालेला कालावधी तसेच वित्तीय व प्रशासकीय बाबी विचारात घेता, सदर मध्यान्ह भोजन योजना दिनांक ०१.११.२०२३ पासून बंद करण्यात यावी" असे निर्देश प्राप्त झाल्याने सदर योजनेची अंमलबजावणी दिनांक ०१.११.२०२३ पासून बंद करण्याबाबत मंडळाच्या दिनांक २५.१०.२०२३ रोजीच्या पत्रान्वये सर्व क्षेत्रीय कार्यालयांना कळविण्यात आलेले आहे.

**ठराव क्र. ६० (२४)/२०२४ :-**

**१. दिनांक ०१.०४.२०२३ पासून भोजन वितरण प्रणाली RF-Based Card व्दारे करण्याबाबत शासन मान्यतेस्तव प्रस्ताव सादर करण्यात आला होता सदर प्रणाली कार्यान्वित होईपर्यंत करारनाम्यातील तरतुदीनुसार नोंदवहया ठेवणे व कार्ड वितरण प्रणालीच्या खर्च मर्यादेत देयक अदा करण्याबाबत केलेल्या कार्यवाहीस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**

**२. भोजन केवळ नोंदीत सक्रीय बांधकाम कामगारांना वितरीत करण्याबाबत करण्याबाबत केलेल्या कार्यवाहीस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**

**३. बांधकाम कामगार मध्यान्ह भोजन व रात्रीच्या भोजनापासून वंचित राहू नये याकरीता RF-Based Card वितरणाकरीता दिनांक ३१.०७.२०२३ पर्यंत मुदतवाढ देण्याबाबत केलेल्या कार्यवाहीस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**

**४. नोंदीत सक्रीय (जिवीत) बांधकाम कामगारांना मध्यान्ह व रात्रीचे भोजन विनाशुल्क पुरविण्याबाबत केलेल्या कार्यवाहीस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**

**५. बांधकाम कामगार मध्यान्ह भोजन व रात्रीच्या भोजनापासून वंचित राहू नये याकरीता RF-Based Card वितरणाकरीता दिनांक ०१.०८.२०२३ ते दिनांक ३१.१०.२०२३ पर्यंत मुदतवाढ देण्याबाबत केलेल्या कार्यवाहीस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**

**६. सदरची योजना दिनांक ०१.११.२०२३ पासून सदर योजना बंद करण्याबाबत केलेल्या कार्यवाहीस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ मुंबई

**विषय क्र.२५:- महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाचे मा. अध्यक्ष, मा. सदस्य व मा.सदस्य सचिव यांना विमान प्रवास अनुज्ञेय करणेबाबत.**

मंडळ सचिव यांनी सादर केले की, महाराष्ट्र शासनाच्या वित्त विभागाच्या शासन निर्णय क्र.प्रवास १०१०/प्र.क्र.०२/सेवा-०५ यांच्या दिनांक ०३.०३.२०१० रोजीच्या शासन निर्णयात मुद्दा क्र.४.१ विमान प्रवास (मुंबई नागरी सेवा नियम,१९५९ मधील नियम ४१७-ब आणि ४९०) नमूद केल्याप्रमाणे विमान प्रवासासंबंधी तरतूदी आहेत तथापि, अभ्यासदौरे, बैठका व विधानमंडळ कामकाज यासाठी मंडळाचे अध्यक्ष व इतर शासकीय सदस्यांना विमान प्रवास गरजेचा राहतो.

२. विधीमंडळ कामकाज अथवा विविध अभ्यासदौरे अन्य काही महत्वाच्या मंडळ बैठकांकरीता मा.अध्यक्ष, शासकीय सदस्य (मा.प्रधान सचिव, कामगार, मा.कामगार आयुक्त व मा. उप सचिव, कामगार) सदस्य सचिव यांना विमान प्रवास करावा लागतो. सबब, अशा प्रकरणी विमान प्रवास अनुज्ञेय करणे आवश्यक वाटते.

**ठराव क्र. ६० (२५)/२०२४:-**

**मा.अध्यक्ष व शासकीय सदस्य मा.प्रधान सचिव (कामगार), यांना व्यापारी वर्ग (Business Class) तसेच, अन्य शासकीय सदस्य व सदस्य सचिव यांना आर्थिक वर्ग (Economy Class) विमान प्रवास अनुज्ञेय करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

**विषय क्र.२६:- महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ मुख्यालय व क्षेत्रिय स्तरावर मंडळ कामकाजासाठी सुधारीत आकृतीबंधास मान्यता देणेबाबत.**

मंडळ सचिव यांनी सादर केले की, इमारत व इतर बांधकाम व्यवसायामधील कामगारांच्या हिताचे रक्षण करण्याच्या दृष्टीने, केंद्र शासनाने इमारत व इतर बांधकाम कामगार अधिनियम (रोजगार नियमन सेवाशर्थी), १९९६ लागू केला आहे. सदर अधिनियमामधील कलम (१८) नुसार प्रत्येक राज्याने इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ गठीत करावयाचे आहे. त्याअनुषंगाने, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्थी) नियम, २००७ अस्तित्वात आले असून, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची स्थापना करण्यात आलेली आहे.शासन निर्णय उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग दिनांक ०३.१०.२०१२ अन्वये, मंडळाच्या मुंबई मुख्यालयाकरीता १८ पदे आणि जिल्हास्तरावर ३८ पदे अशा एकूण ५६ पदांची निर्मिती मंडळस्तरावर करण्यास शासनाची मान्यता देण्यात आली आहे.शासन अधिसुचना उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग दिनांक ०१.०६.२०१९ नुसार लिपिक-टंकलेखक, अधीक्षक, लघुटंकलेखक (इंग्रजी / मराठी) यांचे सेवाप्रवेश नियम करण्यात आले आहेत. तसेच, दिनांक ०७.०६.२०१९ रोजीच्या शासन अधिसूचनेनुसार वाहनचालक, दफ्तरी व शिपाई यांचे सेवाप्रवेश नियम करण्यात आले. दिनांक २०.०८.२०२० रोजीच्या शासन अधिसूचनेनुसार जिल्हा कार्यकारी अधिकारी व उप जिल्हा कार्यकारी अधिकारी यांचे सेवाप्रवेश नियम करण्यात आले.

२. मंडळाने दिनांक ०५.०७.२०१९ रोजीच्या पत्रान्वये १८३ पदे भरतीचा प्रस्ताव शासनास सादर केला होता. तद्नंतर दिनांक २५.११.२०१९ अन्वये ४२२ पद भरतीचा प्रस्ताव शासनास सादर केला होता. तथापि, सदर प्रस्तावास अद्याप मान्यता मिळालेली नाही. सद्यस्थितीत ११६१ पदांचा सुधारीत आकृतीबंध प्रस्तावित करण्यात येत आहे. सदर आकृतीबंधास मा.मंत्री महोदय (कामगार) यांनी कामगार आयुक्तांच्या शिफारशीनुसार प्रस्ताव सादर करण्याबाबत निर्देश दिलेले आहेत.

| अ.क्र. | पदनाम | संवर्ग | मुख्यालय | प्रादेशिक सुविधा केंद्र | जिल्हा सुविधा केंद्र | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी | गट-अ | १ | ० | ० | १ |
| २ | अपर मुख्य कार्यकारी | गट-अ | १ | ० | ० | १ |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | अधिकारी | | | | | |
| ३ | मुख्य लेखा व वित्त अधिकारी (उपसंचालक संवर्ग) | गट-अ | १ | ० | ० | १ |
| ४ | प्रादेशिक कार्यकारी अधिकारी | गट-अ | ० | ६ | ० | ६ |
| ५ | विधी सल्लागार | गट-अ | १ | ० | ० | १ |
| ६ | जिल्हा कार्यकारी अधिकारी | गट-अ | .३ | १२ | ३६ | ५१ |
| ७ | जनसंपर्क अधिकारी (जिल्हा माहिती अधिकारी) | गट-अ | १ | ० | ० | १ |
| ८ | सहायक संचालक (लेखापरीक्षण) | गट-अ | १ | ० | ० | १ |
| | **गट-अ एकूण पदे** | | **०९** | **१८** | **३६** | **६३** |
| ९ | उप जिल्हा कार्यकारी अधिकारी | गट-ब | ७ | १२ | ७२ | ९१ |
| १० | लेखाधिकारी | गट-ब | ३ | ६ | ० | ०९ |
| ११ | सहायक लेखाधिकारी | गट-ब | ७ | ० | ३६ | ४३ |
| | **गट-ब एकूण पदे** | | **१७** | **१८** | **१०८** | **१४३** |
| १२ | नोंदणी अधिकारी | गट-क | ० | ० | १४४ | १४४ |
| १३ | माहिती सहायक | गट-क | १ | ० | ० | १ |
| १४ | लघु-टंकलेखक (उच्चश्रेणी) | गट-क | १ | ० | ० | १ |
| १५ | लघु-टंकलेखक (निम्नश्रेणी) | गट-क | १ | ६ | ० | ७ |
| १६ | अधीक्षक | गट-क | ५ | ६ | ३६ | ४७ |
| १७ | वरिष्ठ लिपिक | गट-क | १९ | २४ | ७२ | ११५ |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १८ | लिपिक-टंकलेखक | गट-क | ३६ | ४८ | १४४ | २२८ |
| **गट-क एकूण पदे** | | | **६३** | **८४** | **३९६** | **५४३** |
| १९ | वाहनचालक | गट- ड | ८ | ० | ० | ८ |
| २० | दप्तरी | गट-ड | ३ | ० | ० | ३ |
| २१ | शिपाई | गट-ड | ११ | ६ | ३६ | ५३ |
| **गट-ड एकूण पदे** | | | **२२** | **६** | **३६** | **६४** |
| **एकूण पदे** | | | **१११** | **१२६** | **५७६** | **८१३** |

इमारत व इतर बांधकाम कामगार अधिनियम (रोजगार नियमन व सेवाशर्थी), १९९६ च्या कलम (२४ (३) मध्ये पुढीलप्रमाणे नमूद करण्यात आले आहे - "No Board shall, in any financial year, incur expenses towards salaries, allowances and other remuneration to its members, officers and other employees and for meeting the other administrative expenses exceeding five per cent of its total expenses during that financial year". त्यानुसार उपरोक्त पदांकरिता होणारा खर्च वार्षिक खर्चाच्या ५% च्या मर्यादेत असणे आवश्यक आहे.सध्या मंडळाच्या आस्थापनेवर मंडळ मुख्यालयात, सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी -०१ पद व मुख्य लेखा व वित्त अधिकारी -०१ पद आणि लेखा अधिकारी -०१ पद असे केवळ ०३ शासकीय अधिकारी पुर्णवेळ कार्यरत आहेत व जिल्हा कार्यकारी अधिकारी हे पद अतिरीक्त कार्यभाराने कार्यरत आहे. याशिवाय ०१ उपलेखापाल प्रतिनियुक्तीने, ०१ वरिष्ठ लिपिक (अतिरिक्त कार्यभाराने) व ०२ लिपिक-टंकलेखक (उसनवारीने) कार्यरत आहेत.महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ यांचे व्याप्ती संपुर्ण महाराष्ट्रभर असून मंडळाकडे जास्तीत जास्त नोंदणी,नुतनीकरण व योजनांची प्रभावी अंमलबजावणी आणि पुढील महत्त्वाचे कामे पार पाडणेसाठी मुख्यालय,प्रादेशिक कार्यालय,जिल्हा कार्यालय येथे मनुष्यबळ असणे आवश्यक आहे.

| | |
|---|---|
| (अ) | मंडळाकडे सध्या विविध बँकामध्ये गुंतवणुकीच्या स्वरूपात शिल्लक असलेले रक्कम रू.९,०५० कोटी, दरवर्षी उप कराच्या माध्यमामधून जमा होणारे सर्वसाधारण रक्कम रु. ३१०० कोटी व विविध योजनांवर दरवर्षी खर्च होणारे रू. ३५०० कोटी या आर्थिक बाबींचे सुयोग्य लेखांकन,लेखापरिक्षण व नियोजन करणे. |
| (ब) | उपकर संकलनाकरीता प्रभावी यंत्रणा तयार करणे. |
| (क) | बांधकाम कामगारांची नोंदणी, नुतनीकरण व लाभ वाटप करणे. |
| (ड) | मंडळाकडील अस्तित्वातील योजनांची प्रभावी अंमलबजावणी करणे. |

| | |
|---|---|
| (इ) | अधिनियमातील तरतूदीनुसार बांधकाम कामगारांच्या हिताचे संरक्षणार्थ अन्य उपाययोजना करणे. याकरीता, मंडळाची प्रशासकीय यंत्रणा सक्षम करणे अत्यावश्यक बाब आहे. |

सविस्तर चर्चेअंती सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे योजनाविषयक कार्य व अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे प्रशासन व नोंदणी, नुतणीकरण कार्य सोपविण्याचे ठरले तसेच उपमुख्य कार्यकारी अधिकारी व प्रादेशिक कार्यकारी अधिकारी ही पदे वगळण्यात यावीत तसेच बाहयस्त्रोताव्दारे प्रस्तावित करण्यात आलेली डाटा एन्ट्री ऑपरेटर, वाहनचालक व शिपाई इ. पदे कमी करण्यात यावीत.

**ठराव क्र. ६० (२६)/२०२४ :-**

**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ मुख्यालय व क्षेत्रिय स्तरावर मंडळ कामकाजासाठी ८१३ पदांच्या सुधारीत आकृतीबंधास मान्यता देण्यात येत आहे. सदरची पद भरतीबाबतचे सेवाप्रवेश नियम तयार करून शासनास सादर करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

**विषय क्र.२७ :- महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ मुख्यालयातील कामकाजाकरीता नियुक्त करण्यात आलेल्या सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्या मुदतवाढीस मान्यता देणेबाबत.**

मंडळ सचिव यांनी सादर केले की, मंडळाकडील विविध पदांच्या सुधारीत आकृतीबंध मंजुरीची प्रक्रिया अद्याप पुर्ण झाली नसल्याने सदर पदांची भरती प्रक्रिया प्रलंबित आहे. सबब, मंडळाकडील विवक्षीत कामकाजाकरीता आवश्यकतेनुसार सदर रिक्त पदांच्या प्रमाणात शासकीय/निमशासकीय सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्या सेवा करार पध्दतीने घेण्यासाठी शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग दिनांक १७ डिसेंबर, २०१६ अन्वये तरतूद करण्यात आली आहे. त्यानुसार मंडळाकडील विवक्षीत कामकाजाकरीता शासकीय/निमशासकीय सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्या सेवा घेण्यात येतात व त्यांना गरजेनुसार वेळोवेळी मुदतवाढ देण्यात येते.

२. उपरोक्त शासन निर्णयातील मुद्दा क्रं. (अ) मधील तरतुदीनुसार करार पध्दतीने "विवक्षित कामांसाठी" नेमणूका करताना पारदर्शक पध्दतीचा अवलंब करण्यात यावा. विहीत पध्दतीने जाहिरात देऊन "विवक्षित कामांसाठी" पात्र सेवानिवृत्त अधिका-यांकडून अर्ज मागविण्यात यावेत. जाहिरातीमध्ये नामिकासुचीत नियुक्त करावयाच्या एकुण व्यक्तिंची संख्या, विवक्षित कामाचे स्वरूप, कालावधी आणि देय मासिक पारिश्रमिक यांचा उल्लेख करण्यात यावा आणि प्राप्त अर्जातून पात्र उमेदवाराची निवड करून नामिकासुची नियुक्तीसाठी सक्षम प्राधिकारी यांनी तयार करावी असे नमुद केले आहे.महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या आर्थिक वर्षाचे लेखे, वार्षिक अर्थसंकल्प, वस्तु व सेवाकर व आयकर विषयक कामकाज, गुंतवणुक व ठेवी, अंतर्गत लेखापरिक्षण, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ व सर्व जिल्हा कार्यालयांमध्ये इमारत व इतर बांधकाम कामगारांची नोंदणी, नोंदित बांधकाम कामगारांचे नूतनीकरण आणि नोंदित बांधकाम कामगारांना कल्याणकारी योजनांच्या लाभाचे वाटप करणेकरीता संबंधित कामे करण्यासाठी पुरेसा कर्मचारी वर्ग उपलब्ध नाही.सबब, नव्याने करार पध्दतीने कर्मचारी वर्ग व महाराष्ट्र शासनाच्या सेवेतून गट "अ" व "ब" मधून सेवानिवृत्त झालेल्या अधिकाऱ्यांची मंडळ मुख्यालयात नियुक्तीसाठी मंत्रालयीन प्रशासकीय विभागातील सेवानिवृत्त अवर सचिव व कक्ष अधिकारी, कामगार विभागातील कामगार उपायुक्त, सहायक कामगार आयुक्त, व सरकारी कामगार अधिकारी तसेच वित्त विभागातील (संचालनालय, लेखा व कोषागारे) ,लेखा अधिकारी,सहायक लेखा अधिकारी या पदावर प्रशासन/वित्त व लेखा विषयक कामकाजाचा अनुभव असणाऱ्या सेवानिवृत्त अधिका-यांची मंडळाच्या आस्थापनेवर सेवा करार पध्दतीने विवक्षित कामकाजाकरीता शैक्षणिक पात्रता व अनुभव असणाऱ्या सेवानिवृत्त अधिका-यांची नियुक्ती करण्याबाबत मंडळाच्या दिनांक १२.१२.२०२२ रोजीच्या ५९ व्या संपन्न बैठकीमध्ये ठराव पारीत करण्यात

आला होता. त्यानुसार मंडळ मुख्यालयात व क्षेत्रीय कार्यालयात खालील सेवानिवृत्त अधिकाऱ्यांची ११ महिन्याच्या कालावधीकरीता नियुक्ती करण्यात आली होती.

| अ.क्र. | सेवानिवृत्त अधिकाऱ्याचे नाव | अ.क्र. | सेवानिवृत्त अधिकाऱ्याचे नाव |
|---|---|---|---|
| १ | श्री. पांडुरंग वाघमारे | ५ | श्रीम.सोनाली रेडकर |
| २ | श्री. राजेंद्र कौरते | ६ | श्री. सिध्दार्थ मस्के मस्के |
| ३ | श्री. नितीन वागळे | ७ | श्री.अशोक मोरे |
| ४ | श्री. विवेक राणे | ८ | श्री. अरविंद तेलवाडकर |

उपरोक्त सेवानिवृत्त अधिकाऱ्याची कालावधी संपत आला असल्याने तसेच सदर सेवानिवृत्त अधिकाऱ्याच्या सेवेची मंडळास आवश्यकता असल्याने त्यांना मंडळाच्या दिनांक १५.०३.२०२४ रोजीच्या कार्यादेशान्वये दिनांक ३०.११.२०२४ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

**ठराव क्र. ६० (२७)/२०२४ :-**

**मंडळ कामकाजाकरीता नियुक्त करण्यात आलेल्या ०८ सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्या सेवा करारास दिनांक ३०.११.२०२४ अखेर दिलेल्या मुदतवाढीस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

**विषय क्र.२८ :- दिनांक ३१.१०.२०२३ रोजीच्या शासन निर्णयाव्दारे दिनांक ०६.०९.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये नियुक्त सूचीबद्ध संस्थांकडून मनुष्यबळ नियुक्ती करणेबाबतचा शासन निर्णय रद्द करण्यात आल्याने मंडळ व क्षेत्रिय कार्यालयातील कामकाजासाठी मनुष्यबळ नियुक्तीकरीता संस्था निश्चीत करणेबाबत.**

मंडळ सचिव यांनी सादर केले की, मंडळाकडील विविध पदांच्या सुधारीत आकृतीबंध मंजुरीची प्रक्रिया अद्याप पुर्ण झाली नसल्याने सदर पदांची भरती प्रक्रिया प्रलंबित आहे. सबब, मंडळाकडील कामकाजाच्या आवश्यकतेनुसार सदर रिक्त पदांच्या सेवा शासन धोरणानुसार बाहयस्त्रोत यंत्रणेकडून घेण्यात येतात.

२. शासन पत्र उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग दिनांक १८.०१.२०२३ अन्वये मे. ब्रिस्क इंडिया प्रा. लि. यांची मुदतवाढ संपुष्टात आल्याने मंडळ पत्र दिनांक १८.०७.२०२३ अन्वये संबंधित संस्थेस त्यांचेकडील सदर सेवा पुरवठा कामकाज समाप्तीबाबत कळविण्यात आले. तदनंतर वेळोवेळी निर्गत झालेल्या शासन निर्णय दिनांक १४.०३.२०२३, दिनांक ०५.०४.२०२३, दिनांक ०९.०५.२०२३ आणि दिनांक ०६.०९.२०२३ अन्वये बाह्ययंत्रणेकडून कामे करुन घेण्यासाठी ०९ सेवापुरवठादारांच्या पॅनलला मनुष्यबळाच्या वर्गवारीनुसार मनुष्यबळ पुरवठा करण्यासाठी देण्यात आलेल्या शासन मान्यतेनुसार मंडळ मुख्यालय व क्षेत्रीय कार्यालयातील कामकाजाकरीता मा. मंत्री (कामगार) मा. अध्यक्ष, मंडळ यांचे मान्यतेने मंडळ मुख्यालयात एकुण ४८ व ४० जिल्हा सुविधा केंद्राकरीता प्रत्येकी ०८ या प्रमाणे ३२० पदे अशी एकुण ३६८ पदे उपरोक्त नमूद शासन निर्णयातील ०९ सेवापुरवठादारांच्या पॅनलपैकी मे. एस. टु. इन्फोटेक इंटरनॅशनल लि. या संस्थेशी मंडळाने दिनांक ११.०७.२०२३ रोजी करारनामा करून मंडळ कार्यादेश दिनांक १८.०७.२०२३ पासून मनुष्यबळ पुरवठा सेवा घेण्यात आल्या आहेत.

३. शासन निर्णय उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, दिनांक ३१.१०.२०२३ अन्वये शासन निर्णय दिनांक ०६.०९.२०२३ मधील तरतुदी रद्द करण्यात आल्याने उपरोक्त नमूद शासन नियुक्त ९ पॅनलवरील एजन्सीकडून दिनांक २१.१०.२०२३ पासून मनुष्यबळाच्या सेवा घेता येणार नाहीत. संबंधित विभाग/कार्यालयाने दिनांक २१.१०.२०२३ पासून नऊ महिन्याच्या आत मनुष्यबळाच्या सेवा प्रशासकीय कामकाजावर परिणाम होणार नाही अशा रितीने संपूष्टात आणाव्यात असे निर्देश आहेत. तथापि, कामगार विभागाकडून बाहयस्त्रोत यंत्रणेकडून मनुष्यबळ पुरवठा सेवा करणाऱ्या संस्थाची पॅनल नियुक्ती अथवा पर्यायी व्यवस्था झाली नसल्याने मंडळ मुख्यालय व क्षेत्रीय कार्यालयातील प्रशासकीय कामकाज सुरळीत चालण्याच्या दृष्टीने कामगार विभागाकडून बाहयस्त्रोत यंत्रणेकडून मनुष्यबळ पुरवठा सेवा करणाऱ्या संस्थाची पॅनल नियुक्ती होईपर्यंतच्या कालावधीकरीता तत्कालीन

पॅनलवरील नियुक्त संस्था मे. एस. टु. इन्फोटेक इंटरनॅशनल लि. यांचेकडून वैध करारनामा कालावधीस अधिन राहून मनुष्यबळ पुरवठा सेवा घेण्यात आल्या आहेत.सद्या कामगार विभागाअंतर्गत मा. कामगार आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली खरेदी समितीमार्फत बाहयस्त्रोत यंत्रणेकडून मनुष्यबळ पुरवठा सेवांकरीता संस्थाची पॅनल नियुक्ती प्रक्रिया सुरू आहे. सदर प्रक्रिया पुर्ण होऊन नियुक्त होणाऱ्या संस्थेकडून मंडळाच्या आवश्यकतेनुसार मा. अध्यक्ष, मंडळ यांच्या मान्यतेने मनुष्यबळ सेवा घेणे प्रस्तावित आहे.

**ठराव क्र. ६० (२८)/२०२४ :-**

**मंडळ मुख्यालय व क्षेत्रीय कार्यालयातील लिपिक व गट-ड वर्गीय रिक्त पदांच्या अनुषंगाने शासन धोरणानुसार बाहयस्त्रोत यंत्रणेकडून घेण्यात येणाऱ्या मनुष्यबळ सेवा शासन निर्णय दिनांक ३१.१०.२०२३ अन्वये दिनांक ०६.०९.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये मे. एस. टु. इन्फोटेक इंटरनॅशनल लि. या पॅनलवरील एजन्सी नियुक्तीचा शासन निर्णय रद्य झाल्याने, सदर सेवांकरीता स्वतंत्रपणे प्रक्रिया न राबविता कामगार विभागाकडून नव्याने सुरू असलेल्या बाहयस्त्रोत मनुष्यबळ पुरवठा संस्था पॅनल नियुक्तीची प्रक्रिया पुर्ण होईपर्यंतच्या कालावधीकरीता, तत्कालीन पॅनलवरील नियुक्त संस्था मे. एस. टु. इन्फोटेक इंटरनॅशनल लि. यांचेकडून वैध करारनामा कालावधीकरीता मनुष्यबळ पुरवठा सेवा घेण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

**विषय क्र.२९ :- महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाअंतर्गत नोंदीत सक्रीय (जिवीत) बांधकाम कामगारांना लाभाचे अर्ज (DBT) सादर करण्यासाठी प्रत्यक्ष जिल्हा सुविधा केंद्रावर उपस्थित राहून अर्ज सादर करण्याबाबत नवीन कार्यपध्दतीचा निश्चित करणेबाबत.**

मंडळ सचिव यांनी सादर केले की, केंद्र शासनाच्या इमारत व इतर बांधकाम कामगार अधिनियम (रोजगार नियमन व सेवाशर्ती), १९९६ मधील कलम (१८) नुसार महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) नियम, २००७ अस्तित्वात आले व त्यानुसार, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची स्थापना करण्यात आलेली आहे. मंडळाकडून बांधकाम क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या कामगारांची नोंदणी, तीचे नुतनीकरण आणि विविध कल्याणकारी योजनांचे लाभ वितरीत करण्यात येतात. सुरवातीस सदर प्रक्रिया छापील हस्तलिखीत अर्ज (ऑफलाईन) प्रकाराने राबविण्यात येत होती त्यामध्ये सुधारणा करून माहे जुलै २०२० पासून मंडळाने विकसीत केलेल्या एकात्मीक कल्याणकारी मंडळ संगणकीय प्रणाली (IWBMS) व्दारे ऑनलाईन प्रकाराने नोंदणी/नुतणीकरण/लाभ वाटपाची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. लाभ वाटपाचे अर्ज प्रक्रियेतील तांत्रीक अडचणी कमी करून सदर प्रक्रिया अधिक कार्यक्षम होण्यासाठी नवीन कार्यपध्दती राबविणे आवश्यक होते. तसेच नोंदणी व नुतनीकरण प्रक्रियेतीलही तांत्रीक अडचणी कमी करून त्यामध्ये वाढ करण्याच्या दृष्टीने नवीन कार्यपध्दती राबविणे आवश्यक आहे.

२. माहे जुलै, २०२० पासून मंडळाने विकसीत केलेल्या एकात्मीक कल्याणकारी मंडळ संगणकीय प्रणाली (IWBMS) व्दारे राबविण्यात येणाऱ्या नोंदणी/नुतणीकरण/लाभ वाटप प्रक्रियेमध्ये कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर काही ठराविक अर्ज शोधून (Search) त्यावर कार्यवाही करणे, एकाच मोबाईल नंबरवर (Master Mobile OTP) अनेक अर्जाच्या नोंदी होणे, Filter ची सुविधा वापरून ठराविक योजनांच्या अर्जावर कार्यवाही करणे अशा अनेक प्रकारच्या बाबी घडत असल्याचे मंडळाच्या निदर्शनास आले तसेच याबाबत विविध लोकप्रतिनिधी, बांधकाम कामगार संघटना, क्षेत्रिय अधिकारी यांच्याकडून वेळोवेळी सुचविण्यात आलेल्या सुधारणा यानुषंगाने दिनांक २६.०३.२०२३ अन्वये शासनास प्रस्ताव सादर करण्यात आला होता, त्यास अनुसरून दिनांक १२.०९.२०२३ अन्वये शासनाकडून निर्देश प्राप्त झाले होते. त्यानुसार सदर प्रणाली अधिक पारदर्शक व कार्यक्षम करण्यासाठी बांधकाम कामगारांचे प्राप्त होणारे लाभ वाटपाचे ऑनलाईन अर्ज हे कोणत्याही मानवी हस्तक्षेपाशिवाय संगणकीय प्रणालीव्दारे प्राथम्यक्रमानुसार (First Come First Serve) निकाली काढणे आवश्यक होते. या सर्व बाबींचा विचार करून, शासनाच्या उपरोक्त पत्रातील निर्देश विचारात घेऊन, लाभ वाटपाची नविन कार्यपध्दती निश्चीत करण्यात आली

सदर नविन कार्यपध्दतीमध्ये लाभाचे अर्ज सादर करणे, लाभ वाटप लिपीक लॉग इन आयडी, तालुका नोंदणी अधिकारी लॉग इन आयडी, प्रलंबित लाभ वाटप अर्जावर करावयाची कार्यवाही, मंडळ स्तरावरील समन्वय कक्ष, लाभ अर्जाकरीता योजनानिहाय आवश्यक कागदपत्रांचा तपशिल (प्रपत्र-ड), लाभाचे अर्ज प्रक्रिया (प्रपत्र-इ) आणि रबर स्टॅम्प नमुना (प्रपत्र-ई) यांचा समावेश आहे. सदर कार्यपध्दतीच्या अनुषंगाने मंडळ पत्र दिनांक दिनांक २०.१०.२०२३ व दिनांक २२.११.२०२३ अन्वये सर्व विभाग व क्षेत्रीय कार्यालयांना सर्वकष सुचना देण्यात आल्या आहेत. माहे जुलै, २०२० पासून मंडळाने विकसीत केलेल्या एकात्मीक कल्याणकारी मंडळ संगणकीय प्रणाली (IWBMS) व्दारे राबविण्यात येणाऱ्या नोंदणी व नुतणीकरण प्रक्रियेमध्ये कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर काही ठराविक अर्ज शोधून (Search) त्यावर कार्यवाही करणे, एकाच मोबाईल नंबरवर (Master Mobile OTP) अनेक अर्जाच्या नोंदी होणे, Filter ची सुविधा वापरून ठराविक योजनांच्या अर्जावर कार्यवाही करणे अशा अनेक प्रकारच्या बाबी घडत होत्या बांधकाम कामगारांच्या नोंदणी व नुतणीकरणातील तांत्रीक अडचणी कमी करून नोंदणी व नुतनीकरणामध्ये वाढ करण्याच्या अनुषंगाने दिनांक ०९.११.२०२२ रोजीच्या शासन पत्रान्वये निर्देश प्राप्त झाले होते. याबाबत विविध लोकप्रतिनिधी, बांधकाम कामगार संघटना, क्षेत्रिय अधिकारी यांच्याकडून सुधारणा सुचविणत आल्या होत्या. त्यानुषंगाने दिनांक २६.०३.२०२३ अन्वये शासनास प्रस्ताव सादर करण्यात आला होता, त्यास अनुसरून दिनांक १२.०९.२०२३ अन्वये शासनाकडून निर्देश प्राप्त झाले होते. त्यानुसार सदर प्रणाली अधिक पारदर्शक व कार्यक्षम करण्यासाठी बांधकाम कामगारांचे प्राप्त होणारे ऑनलाईन अर्ज हे कोणत्याही मानवी हस्तक्षेपाशिवाय संगणकीय प्रणालीव्दारे प्राथम्यक्रमानुसार (First Come First Serve) निकाली काढणे आवश्यक आहे. त्यासाठी नविन कार्यपध्दती विकसीत करणे आवश्यक आहे.

**ठराव क्र. ६० (२९)/२०२४ :-**

**मंडळाअंतर्गत नोंदीत सक्रीय (जिवीत) बांधकाम कामगारांना लाभाचे अर्ज (DBT) सादर करण्यासाठी प्रत्यक्ष जिल्हा सुविधा केंद्रावर उपस्थित राहून अर्ज सादर करण्याबाबत राबविण्यात आलेल्या नवीन कार्यपध्दतीस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

**अध्यक्ष**
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

**विषय क्र.३० :- महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाअंतर्गतच्या बांधकाम कामगारांची नोंदणी, नुतणीकरण व लाभ वाटपाबाबतची माहिती मंडळाच्या पटलावर ठेवणेबाबत.**

मंडळ सचिव यांनी सादर केले की, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाअंतर्गतच्या बांधकाम कामगारांची नोंदणी, नुतणीकरण व लाभ वाटपाबाबतची माहिती मंडळाच्या बैठकीत ठेवण्यात येते.

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाअंतर्गतच्या बांधकाम कामगारांची नोंदणी, नुतणीकरण व लाभ वाटपाबाबतची माहिती खालीलप्रमाणे -

| अ. क्र. | विभाग | जिल्हा | एकूण नोंदणीकृत कामगार संख्या | एकूण नूतनीकरण संख्या | २६ जून २०२४ रोजी सक्रिय कामगार संख्या | लाभ वाटप |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | अमरावती | अकोला | ७५,५४४ | २९,३८२ | ३५,९१५ | १४,३३५ |
| २ | | अमरावती | १५०,०३६ | ३०,९०१ | ५२,७५१ | ७,२०० |
| ३ | | बुलढाणा | १५४,८४२ | ८५,७४२ | ५८,३२१ | ७७,०९९ |
| ४ | | वाशिम | १६,८७६ | ७,६९१ | ५,०१५ | ३,७४५ |
| ५ | | यवतमाळ | १५६,३१७ | ३४,३२१ | ७९,६४७ | २५,६५९ |
| ६ | औरंगाबाद | औरंगाबाद | २७०,९४७ | ८२,८३२ | १६०,२०२ | २३,८६७ |
| ७ | | बीड | ९०,२९८ | ४७,०३७ | ३४,१६५ | २७,५५३ |
| ८ | | हिंगोली | ५४,५९२ | १६,८६७ | ३०,८२५ | २२,०५३ |
| ९ | | जालना | १४४,३५२ | ५१,८६२ | ८५,८७३ | ३०,०९८ |
| १० | | लातूर | ६०,५७७ | १४,३०८ | २८,८६७ | २०,१४६ |
| ११ | | नांदेड | ९९,९६० | ३२,२१६ | ३९,१०९ | ३६,६१० |
| १२ | | उस्मानाबाद | १०,१०६ | २,६४३ | ४,५१५ | १४,५०३ |
| १३ | | परभणी | ११६,२१५ | ५९,६४१ | ७१,५२० | ५३,५६८ |
| १४ | मुंबई | मुंबई शहर | ३८,०९२ | २,५६७ | ११,००० | १,५४३ |
| १५ | | मुंबई उपनगर पूर्व | १८,६५० | १,२३७ | ६,८०३ | ८१२ |
| १६ | | मुंबई उपनगर पश्चिम | २४,४७५ | २,७३७ | ७,२७९ | १,२८२ |
| १७ | नागपूर | भंडारा | ५५,१६७ | १३,१९५ | २२,६४६ | २१,३६४ |
| १८ | | चंद्रपूर | ४७,२५० | २०,२३८ | १०,१०८ | १,३५१ |
| १९ | | गडचिरोली | ४०,४१३ | १७,४४८ | ८,९९२ | ८,६८६ |
| २० | नागपूर | गोंदिया | २३,४५८ | १२,६९६ | ११,७९१ | १२,८७० |
| २१ | | नागपूर | ७७,२७० | २४,१८३ | ४०,४८६ | २६,५८८ |
| २२ | | वर्धा | १००,२३० | १००,४९८ | ६७,५६४ | ५४,१७० |
| २३ | | अहमदनगर | १११,६४० | ३७,८२१ | ५२,२१४ | ८३,३०२ |
| २४ | | धुळे | ७०,३२५ | ५,६४० | ३२,८१० | ३,०१४ |

| अ. क्र. | विभाग | जिल्हा | एकूण नोंदणीकृत कामगार संख्या | एकूण नूतनीकरण संख्या | २६ जून २०२४ रोजी सक्रिय कामगार संख्या | लाभ वाटप |
|---|---|---|---|---|---|---|
| २५ | नाशिक | जळगाव | ११९,९२१ | ५,१३४ | ६८,५५९ | ४,६३७ |
| २६ | | नंदुरबार | ३७,९१६ | ६४५ | २३,८७८ | १,६११ |
| २७ | | नाशिक | ७४,८३७ | ६,९१२ | ३५,८०४ | ४,४०५ |
| २८ | पुणे | इचलकरंजी | ५६,१२१ | २४,०२५ | १८,९६० | १४,८४२ |
| २९ | | कोल्हापूर | ३३९,५९८ | १७३,२२० | १३२,३६६ | १०१,१८६ |
| ३० | | पुणे | २२९,११३ | २५,३३१ | १०२,०५६ | २४,४४४ |
| ३१ | | सांगली | २१०,९७८ | ५०,७५१ | ९३,०६० | १४०,९८६ |
| ३२ | | सातारा | ६२,७८५ | २२,७३० | ३७,७९७ | १४,४१९ |
| ३३ | | सोलापूर | १५२,०२७ | ५१,९३० | ७८,४९५ | २७,४९१ |
| ३४ | कोकण | भिवंडी | ० | १ | ० | ० |
| ३५ | | कल्याण | २२,०७५ | २,१२४ | ७,८६९ | १,०५५ |
| ३६ | | पालघर | १९,२८७ | ३,८६४ | ७,०९० | २,७५६ |
| ३७ | | पनवेल | ३३,८२५ | २,७७८ | १२,६७३ | ८०२ |
| ३८ | | रत्नागिरी | १९,१७३ | ५,६८५ | १४,४९६ | ६,४८७ |
| ३९ | | सिंधुदुर्ग | १२,०६३ | २३,०६४ | ११,४५५ | १३,३६४ |
| ४० | | ठाणे | २४,७१५ | २,२२३ | १०,५८५ | १,८७८ |
| ४१ | एकूण | | ३,४२२,०६६ | १,१३४,१२० | १,६१३,५६१ | ९३१,७८१ |

**ठराव क्र. ६० (३०)/२०२४ :-**

**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाअंतर्गतच्या बांधकाम कामगारांची नोंदणी, नुतणीकरण व लाभ वाटपाबाबतची माहिती अवलोकन होऊन केलेल्या कार्यवाहीस मंडळाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

**विषय क्र.३१ :- दिनांक ०१.११.२०२० ते दिनांक ३१.०१.२०२२ या कालावधीत मा. महालेखापाल कार्यालयाकडून झालेल्या निरीक्षण लेखापरिक्षणात (Inspection Audit) उपस्थित परिच्छेदांना दिलेल्या अनुपालनास मान्यता देणेबाबत तसेच, सन २०१७-१८ ते सन २०२१-२२ या कालावधीतील कार्यक्षमता लेखापरिक्षण (Performance Audit) मध्ये उपस्थित परिच्छेदांना दिलेल्या अनुपालनास मान्यता देणेबाबत.**

मंडळ सचिव यांनी सादर केले की, Comptroller and Auditor General's (DPC) Act १९७१ मधील section १९ (२) नुसार महाराष्ट्र इमारत आणि इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या अभिलेख्यांचे चाचणी निरीक्षण (A test check of the records) लेखापरीक्षण मा महालेखापाल कार्यालयाकडून करण्णत येते. त्यानुसार सन २००७-०८ ते ३१.१०.२०२० अखेर वेळोवेळी करण्यात आलेल्या लेखापरीक्षणानुसार निरीक्षण अहवाल (Inspection Report) मंडळास सादर करण्यात आले आहेत. सदर अहवालात उपस्थित केलेल्या परिच्छेदांचे अनुपालन वेळोवेळी करण्यात आले आहे. सद्या मंडळाचे दि, ०१.११.२०२० ते ३१.०१.२०२२ या कालावधीतील अभिलेखांचे चाचणी निरीक्षण (A test check of the records) करण्यात आले असून सदर अहवालामध्ये उपस्थित ९ परीच्छेदां तयार केलेल्या अनुपालनास मंडळाची मान्यता घेणे आवश्यक आहे.तसेच इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) अधिनियम, १९९६ च्या कलम २७ (२) अन्वये इमारत आणि महाराष्ट्र इमारत आणि इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाचे मा. महालेखापाल कार्यालयाकडून लेखापरीक्षण करण्यात येते. Comptroller and Auditor General's (DPC) Act १९७१ मधील section २३ नुसार CAG कडील Auditee चे कामकाजामध्ये कार्यक्षमता येण्यासाठी कार्यक्षमता लेखापरीक्षाण करण्यात येते. त्यानुसार, मंडळाच्या सन २०१७-१८ ते सन २०२१-२२ या पाच वर्षाच्या कालावधीतील कार्यक्षमता लेखा परीक्षण माहे फेब्रुवारी -२०२३ ते जानेवारी-२०२४ अखेर या कालावधीमध्ये करण्यात आले. सदर लेखा परीक्षण कालावधीमध्ये आज अखेर वेळोवेळी दिलेल्या अर्धसमास पत्राद्वारे उपस्थित केलेल्या आक्षेपांची त्रुटी पुर्तता करून अनुपालन सादर केले आहेत.

**(अ) दिनांक ०१.११.२०२० ते ३१.०१.२०२२ या कालावधीतील मा. महालेखापाल कार्यालयाकडील निरीक्षण अहवाल (Inspection Report) मधील ९ (नऊ) परिच्छेदांना दिलेल्या अनुपालनास मान्यता देणे.**

Comptroller and Auditor General's (DPC) Act १९७१ मधील section १९ (२) नुसार महाराष्ट्र इमारत आणि इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या अभिलेख्यांचे चाचणी निरीक्षण (A test check of the records) लेखापरीक्षण मा महालेखापाल कार्यालयाकडून करण्यात येते. त्यानुसार सन २००७-०८ ते ३१.१०.२०२० अखेर वेळोवेळी करण्यात आलेल्या लेखापरीक्षणानुसार निरीक्षण अहवाल (Inspection Report) मंडळास सादर करण्यात आले आहेत. सदर अहवालात उपस्थित केलेल्या परिच्छेदांचे अनुपालन वेळोवेळी करण्यात आले आहे.सद्या मंडळाकडील दि, ०१.११.२०२० ते ३१.०१.२०२२ या कालावधीतील अभिलेखांचे चाचणी निरीक्षण (A test check of the records) दिनांक २४.०२.२०२२ ते १४.०३.२०२२ या कालावधीत पूर्ण केले आहे. व त्याचा निरिक्षण अहवाल (Inspection Report) IR NO. २०२१२२०१३ महालेखापाल कार्यालयाने त्यांच्या दिनांक १४.०४.२०२२ च्या पत्रान्वये मंडळास सादर केला आहे. सदर निरीक्षण अहवालामध्ये खालील तक्त्यात नमुद ९ परीच्छेद उपस्थित करण्यात आले असून त्यांचे अनुपालन तयार केले असून मा. महालेखापाल कार्यालयास सदर ९ परीच्छेदांचे अनुपालन अहवाल सादर करणेस मंडळाच्या मान्यतेस सविनय सादर.

| अ.क्र. | परीच्छेद |
|---|---|
| १ | Avoidable expenditure due to double payments made towards financial assistance under Covid -१९ Rs ६२.०१ Lakhs |
| २ | Distribution of benefits in kind of amounting to Rs.३४७ Cr. To registered BOC workers to incontraventions to directions of Central Govt. under section ६० of the BOCW Act, १९९६. |
| ३ | Irregularities in the Contract agreement and implementation of Contract of Safety kits and Essential kits |
| ४ | Duplicate registrations in beneficiaries of safety kits and essential kits |
| ५ | Obtaining estimated rates of Safety Kits for supply, transportation and distribution to eligible/ registered Construction Workers.. |
| ६ | Bank Guarantee from Private Bank instead of Nationalized Bank in contravention to Contract Conditions |
| ७ | Non availability of mechanism for Identification of unregistered establishments |

| | |
|---|---|
| ८ | Delay in submission of Annual Accounts for २०२०-२१. |
| ९ | Cess Collection Data -Observation thereof |

**(ब) सन २०१७-१८ ते सन २०२१-२२ या कालावधीत कार्यक्षमता (निष्पादन) लेखापरीक्षणात (Performance Audit) उपस्थित केलेल्या अर्धसमासपत्रांना दिलेल्या अनुपालनास मान्यता देणे.**

इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) अधिनियम, १९९६ च्या कलम २७ (२) अन्वये इमारत आणि महाराष्ट्र इमारत आणि इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाचे मा. महालेखापाल कार्यालयाकडून लेखापरीक्षण करण्यात येते. Comptroller and Auditor General's (DPC) Act १९७१ मधील section २३ नुसार CAG कडील कार्यक्षमता लेखापरीक्षाण करण्यात येते. त्यानुसार, मंडळाच्या सन २०१७-१८ ते सन २०२१-२२ या पाच वर्षाच्या कालावधीतील कार्यक्षमता लेखा परीक्षण माहे फेब्रुवारी -२०२३ ते जानेवारी-२०२४ अखेर या कालावधीमध्ये करण्यात आले. सदर लेखा परीक्षण कालावधीमध्ये लेखापरीक्षण पथकाने सन २०१७-१८ ते सन २०२१-२२ या पाच वर्षांच्या अभिलेख्यांचे लेखापरीक्षण करून आज अखेर वेळोवेळी उपस्थित केलेल्या अर्धसमासपत्र/ परीच्छेदांचे अनुपालन मा. महालेखापाल कार्यालयास सादर केले आहे. सदर अनुपालनांच्या मान्यतेनुसार (Acceptance) काही परिच्छेद वगळून उर्वरीत अंतिम परीच्छेंदांचा कार्यक्षमता अहवाल (Performance Report) यथावकाश प्रसिध्द करण्यात येतो.

सन २०१७-१८ ते सन २०२१-२२ या पाच वर्षांच्या अभिलेख्यांचे लेखापरीक्षण कालावधीमध्ये उपस्थित केलेल्या अर्धसमासपत्र/ परीच्छेदांचा गोषवारा सोबतच्या विवरणपत्रात जोडण्यात आला आहे. तरी प्रस्तुत अर्धसमासपत्र/ परीच्छेदांचे अनुपालन मंडळाचे मान्यतेस्तव सविनय सादर.

**(क) शासनाकडून प्राप्त सन २०१७-२२ कालावधीच्या मंडळ कार्यक्षमता (निष्पादन) लेखापरीक्षण अहवालातील आक्षेपांना दिलेल्या अनुपालनास मान्यता देणे.**

उपरोक्त विषय क्र. १७ (ब) मध्ये नमुदप्रमाणे, मंडळाच्या सन २०१७-१८ ते सन २०२१-२२ या पाच वर्षाचे माहे फेब्रुवारी -२०२३ ते जानेवारी-२०२४ या कालावधीमध्ये करण्यात आलेल्या कार्यक्षमता लेखा परीक्षणाचा अहवाल मा. महालेखापाल कार्यालयाकडून कामगार विभाग, मंत्रालय यांना दिनांक १७.०४.२०२४ रोजी सादर करण्यात आला आहे. त्यानुसार शासन पत्र दिनांक २६.०४.२०२४ अन्वये सदर अहवालातील मंडळाशी संबंधित मुद्दयांच्या अनुषंगाने स्वयंस्पष्ट अभिप्रायासह सविस्तर अहवाल सादर करण्याविषयी मंडळास कळविण्यात आले आहे.

प्रस्तुत सन २०१७-१८ ते २०२१-२२ या कार्यक्षमता लेखापरीक्षण अहवालामध्ये समाविष्ट एकुण ६ प्रकरणे खालीलप्रमाणे-

| अ. क्र. | प्रकरण |
|---|---|
| १ | Introduction |
| २ | Consistency of the Rules and Institutional Mechanism |
| ३ | Registration of workers and establishments |
| ४ | Assessment and Collection of Cess |
| ५ | Health and Safety of Workers and Inspection of Establishments |
| ६ | Administration of Funds and Implementation of Welfare Schemes |

उपरोक्त ६ प्रकरणांपैकी प्रकरण क्र. १ प्रस्तावणा असून त्यावर भाष्य अपेक्षित नाही. प्रकरण क्र. ५ हे मा. कामगार आयुक्त कार्यालयाकडील कार्यासन-३० संबंधित असल्याने त्यावरील कार्यवाहीसाठी सदर प्रकरण मा. कामगार आयुक्त कार्यालयाकडे पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी पाठविण्यात आले आहे. उर्वरित प्रकरण क्र. २,३,४ व ६ मंडळाशी संबंधित असून सदर प्रकरणांमध्ये लेखा परीक्षण कालावधीत उपस्थित केलेल्या अर्धसमासपत्राचे अनुषंगाने मंडळाने केलेल्या अनुपालनाची तपासणी करून काही आक्षेप कायम ठेवले आहेत व सदर आक्षेपांच्या अनुषंगाने यापुर्वी सादर केलेले अनुपालन व त्याशी संबंधित अदययावत माहिती/ अभिलेख इत्यादिंचे आधारे सुधारीत अनुपालन तयार केले आहेत. सदर सुधारीत अनुपालन मंडळाच्या मान्यतेने शासनामार्फत मा. महालेखाकार कार्यालयास सादर करणे आवश्यक आहे.

**ठराव क्र. ६० (३१)/२०२४:-**

**१. मंडळाकडील दिनांक ०१.११.२०२० ते ३१.०१.२०२२ या कालावधीतील मा. महालेखापाल कार्यालयाकडील निरीक्षण अहवाल (Inspection Report) IR NO. २०२१२२०१३ मधील ९ परिच्छेदांना दिलेल्या अनुपालनास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**

**२. सन २०१७-१८ ते सन २०२१-२२ या कालावधीत कार्यक्षमता (निष्पादन)लेखापरीक्षणात (Performance Audit) उपस्थित केलेल्या अर्धसमासपत्रांना दिलेल्या अनुपालनास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**

**३. शासनाकडून प्राप्त सन २०१७-२२ कालावधीच्या मंडळ कार्यक्षमता (निष्पादन) लेखापरीक्षण अहवालातील आक्षेपांना दिलेल्या अनुपालनास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

**विषय क्र.३२ :- महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडील अतिरीक्त निधी राष्ट्रीयकृत बँकेत गुंतवणुक करण्यात आलेल्या कार्यवाहीस मंजुरी देणेबाबत.**

मंडळ सचिव यांनी सादर केले की, मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार व वित्त विभाग, शासन निर्णय दिनांक २७.१०.२०१५ व १३.०३.२०२० मधील मार्गदर्शक सुचनानुसार, मंडळाकडील जमा उपकर निधीपैकी अतिरिक्त निधीची गुंतवणुक राष्ट्रीयकृत बँकेच्या मुदतबंद ठेव पावतीमध्ये गुंतवणूक उपसमितीद्वारे गुंतवणूक करण्याचे निर्देश आहेत. उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग यांचेकडील पत्र दिनांक ०५.०७.२०२१ अन्वये गुंतवणुक उपसमितीचे खालीलप्रमाणे पुर्नगठन करण्यात आले आहे.

| अ.क्र. | गुंतवणुक उप समिती | पद |
|---|---|---|
| १ | मा. मंत्री महोदय, कामगार विभाग तथा मा. अध्यक्ष, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई | अध्यक्ष |
| २ | मा. कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई | सदस्य |
| ३ | उप सचिव, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई | सदस्य |
| ४. | सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ,मुंबई | सदस्य |

२. उपरोक्त नमुदप्रमाणे गुंतवणूक उपसमितीने मंडळाकडील अतिरीक्त निधी राष्ट्रीयकृत बँकेच्या मुदतबंद ठेव पावतीमध्ये गुंतवणूक करण्यासाठी वेळोवेळी बैठकांचे आयोजन करून कामकाज पुर्ण केले आहे. त्यानुसार सन २०२३-२४ या आर्थिक वर्षामध्ये मंडळाकडील अतिरीक्त निधी रू ९०५० कोटी राष्ट्रीयकृत बँकेच्या मुदतबंद ठेव पावतीमध्ये गुंतवणूक केलेच्या कार्यवाहीस मंडळाची मान्यता आवश्यक आहे.

३. मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेश व वित्त विभाग, शासन निर्णय दिनांक २७.१०.२०१५ व १३.०३.२०२० मधील मार्गदर्शक सुचनानुसार, मंडळाकडील शासनमान्य गुंतवणूक उपसमितीने सन २०२३-२४ या आर्थिक वर्षामध्ये सन २०२२-२३ मध्ये एक वर्षाचे कालावधीसाठी गुंतवणूक केलेल्या व ज्यांची परिपक्वता सन २०२३-२४ या आर्थिक वर्षामध्ये आहे अशा ९% मुदतबंद ठेव पावत्यांच्या परिपक्वता रक्कमेपैकी वेळोवेळी मंडळाकडील आर्थिक प्रदानांकरीता आवश्यक रक्कम कपात करून उर्वरीत अतिरिक्त निधी एकुण रू. ९०५० कोटी गुंतवणूकींकरीता बैठकांचे आयोजन केले व त्याद्वारे सर्व संबंधित राष्ट्रीयकृत बँकाकडून ऑनलाईन व्हीडीओ कॉन्फरन्सींगव्दारे एक वर्षाच्या कालावधीसाठी Non Callable प्रकारातील मुदतबंद ठेव पावतीमधील गुंतवणूकीकरीता खुल्या स्पर्धात्मक व्याजदर बोलीने केलेल्या प्रक्रीयेत खालील नमुद राष्ट्रीयकृत बँकाकडून

प्राप्त झालेल्या सर्वोच्च व्याजदराने पुर्नगुंतवणूक करण्यात आली आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे :-

| अ.क्र. | बँकेचे नाव | शाखेचे नाव | गुंतवणूक दिनांक | परिपक्वता दिनांक | गुंतवणुक रक्कम (रु.कोटीत) | व्याजदर द.सा.द.शे | परिपक्वतेनंतर प्राप्त होणारी रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | कॅनरा बँक | बी. के.सी. वान्द्रे (पुर्व), मुंबई. | १७.०४.२०२३ | १७.०४.२०२४ | ८०० | ७.६६% | ८६३.०६ |
| २ | युनियन बँक ऑफ इंडिया | घाटकोपर (पश्चिम), मुंबई | ११.०५.२०२३ | ११.०५.२०२४ | ८५० | ७.७३% | ९१७.६३ |
| ३ | बँक ऑफ इंडिया | ताडदेव शाखा मुंबई. | १८.०५.२०२३ | १८.०५.२०२४ | ११०० | ७.७०% | ११८७.१७ |
| ४ | स्टेट बँक ऑफ इंडिया | बीकेसी, मुंबई | २५.०५.२०२३ | २५.०५.२०२४ | १२०० | ७.७०% | १२९५.१० |
| ५ | कॅनरा बँक, | बी. के.सी. वान्द्रे (पुर्व), मुंबई. | १०.०७.२०२३ | १०.०७.२०२४ | ६०० | ७.६७% | ६४७.३६ |
| ६ | स्टेट बँक ऑफ इंडिया | बी. के.सी. वान्द्रे (पुर्व), मुंबई. | ०६.०९.२०२३ | ०६.०९.२०२४ | ११०० | ७.७३% | ११८७.५२ |
| ७ | स्टेट बँक ऑफ इंडिया | बीकेसी, मुंबई | १२.१०.२०२३ | १२.१०.२०२४ | १००० | ७.७६% | १०७९.८८ |
| ८ | बँक ऑफ महाराष्ट्र | नॉर्थ झोन, झोनल ऑफिस वांद्रे, | ०१.१२.२०२३ | ०१.१२.२०२४ | ४०० | ७.७७% | ४३१.९९ |
| ९ | युनियन बँक ऑफ इंडिया | घाटकोपर (पश्चिम), मुंबई | १६.०१.२०२४ | १६.०१.२०२५ | १५०० | ७.८७% | १६२१.५७ |
| १० | युनियन बँक ऑफ इंडिया | मुख्य शाखा सांगली | २९.०१.२०२४ | २९.०१.२०२५ | ५०० | ७.९३% | ५४०.८४ |
| | | एकुण | | | ९०५० | | ९७७२.१२ |

वरीलप्रमाणे, गुंतवणूक उपसमितीने सन २०२३-२४ या आर्थिक वर्षामध्ये मंडळाकडील अतिरिक्त निधी रू ९०५० कोटी प्राप्त महत्तम व्याजदराने राष्ट्रीयकृत बँकेच्या मुदतबंद ठेव पावतीमध्ये एक वर्षाच्या कालावधीसाठी Non Callable प्रकाराने केलेल्या गुंतवणूक कार्यवाहीस मंडळाची मान्यता घेणे प्रस्तावित आहे.

ठराव क्र. ६० (३२)/२०२४ :-

सन २०२३-२४ मध्ये गुंतवणूक उपसमितीने मंडळाकडील अतिरिक्त निधी रू ९०५० कोटीची राष्ट्रीयकृत बँकेच्या मुदतबंद ठेव पावतीमध्ये एक वर्षाच्या कालावधीसाठी Non Callable प्रकाराने केलेल्या गुंतवणूक कार्यवाहीस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

**विषय क्र.३३ :- महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडील उपकर जमा व योजनानिहाय खर्चास मंजुरी देणेबाबत.**

मंडळ सचिव यांनी सादर केले की, इमारत व इतर बांधकाम कामगार यांचे संदर्भात रोजगार व सेवाशर्ती तसेच त्यांची सुरक्षा, आरोग्य,कल्याण विषयक व इतर संबंधित बाबीसाठी तरतूदी करण्याच्या उद्देशाने करण्यात आलेल्या इमारत व इतर बांधकाम (रोजगार व सेवाशर्ती नियमन)अधिनियम,१९९६ या केंद्रीय अधिनियमांतील तरतुदीच्या अनुषंगाने महाराष्ट्र शासनाने इमारत व इतर बांधकाम नियम २००७ तयार केलेले आहेत. इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण उपकर अधिनियम ,१९९६ च्या कलम ३(१)अनुसार केंद्र शासनाने अधिसूचना क्र.एसओ २८९९, दिनांक २६ सप्टेंबर १९९६ अन्वये बांधकामाच्या एकूण मुल्याच्या (जमिनीचे मुल्य वगळून) १% दराने उपकर गोळा करण्याचे आदेश निर्गमित केले आहेत. त्यानुसार मंडळाकडील बँक खात्यामध्ये उपकर जमा होत आहे. तसेच नोंदीत सक्रिय (जिवित) बांधकाम कामगारांसाठी मंडळाअंतर्गत राबविल्या जाणाऱ्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ दिला जातो.

सद्यस्थितीत सन २०२३-२४ मध्ये, महाराष्ट्र इमारत व इतर कामगार कल्याणकारी मंडळाने माहे मार्च, २०२४ अखेर केलेल्या जमा उपकर व योजनानिहाय खर्चाचा गोषवारा खालीलप्रमाणे -

**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई**

**सन २०२३-२४** (रक्कम रु.कोटीत)

| अनु.क्र | महिना | जमा | योजनानिहाय खर्च | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | उपकर | मध्यान्ह भोजन | अत्यावश्यक संच | सुरक्षा संच | आरोग्य तपासणी | नोंदीत बांधकाम कामगारांनाऑनलाइन पद्धतीने लाभ वाटप (DBT) | जिल्हा सुविधा केंद्र उभारणी | प्रचार प्रसिध्दी | अटल बांधकाम कामगार आवास योजना | गृहपयोगी संच | प्रशासकीय खर्च | एकूण |
| १ | एप्रिल - २०२३ | २५७.०२ | १६६.२ | ४६.५४ | ६८.९२ | ४.८४ | २६.५७ | ० | ० | ० | ० | १.७९ | ३१४.९ |
| २ | मे – २०२३ | २०८.३८ | ३८६ | २६.६८ | २५.१६ | ३४.८२ | ६१.७२ | ० | ० | ० | ० | ३.५९ | ५३७.९ |
| ३ | जुन - २०२३ | ३३९.४८ | ३५२.६ | १४.५९ | १५.७५ | १८.२९ | ४५.५८ | ०.०७ | १.१२ | ३.१८ | ० | ३.१८ | ४५४.३ |
| ४ | जुलै-२०२३ | २३७.४८ | ४६५.९ | २१.३२ | २१.१२ | ७४.०९ | ३३.५२ | ० | १८.२४ | ० | ० | ०.५८ | ६३४.८० |
| ५ | ऑगस्ट-२०२३ | १९१.६६ | १०८.३ | ३३.५२ | ३३.२१ | ४५.९४ | २७.९६ | ० | ११.५ | ० | ० | १०.९१ | २७१.४ |
| ६ | सप्टेंबर-२०२३ | ३५९.९२ | १६६.५ | ४०.३७ | ४०.०१ | ४५.७५ | ३०.५७ | ० | १८.५२ | ०.४४ | ० | ९५.०७ | ४३७.२ |
| ७ | ऑक्टोबर-२०२३ | २४३.५७ | १५९.४ | ४७.४२ | ४६.९९ | ५०.४ | २९.८९ | ० | १७.९४ | ० | ० | ५१.०१ | ४०३ |
| ८ | नोव्हेंबर-२०२३ | १८२.११ | २१०.१ | २२.३५ | २२.१६ | २४.६५ | ४०.९ | ० | २०.७१ | ० | ० | ७.८९ | ३४८.७ |
| ९ | डिसेंबर- २०२३ | २७७.७२ | ४२.९६ | ६२.४२ | ६१.८५ | ६८.०७ | ९४.६१ | ० | ४.५८ | ५.४४ | ० | ५७.५३ | ३९७.५ |
| १० | जानेवारी-२०२४ | २७०.१४ | ० | २६.४१ | २६.१८ | ५७.०७ | ९४.५९ | ०.४८ | ५.८२ | ० | ० | ४१.४ | २५२ |
| ११ | फेब्रुवारी- २०२४ | २८७.५९ | ० | ५२.०५ | ५१.५८ | २८.८५ | ९२.५४ | ०.००५ | ०.२८ | ० | ० | ३१.६८ | २५७ |

**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई**

(रक्कम रु.कोटीत)

**सन २०२३-२४**

| अनु.क्र | महिना | जमा | योजनानिहाय खर्च | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | उपकर | मध्यान्ह भोजन | अत्यावश्यक संच | सुरक्षा संच | आरोग्य तपासणी | नोंदीत बांधकाम कामगारांनाऑनलाइन पद्धतीने लाभ वाटप (DBT) | जिल्हा सुविधा केंद्र उभारणी | प्रचार प्रसिध्दी | अटल बांधकाम कामगार आवास योजना | गृहपयोगी संच | प्रशासकीय खर्च | एकूण |
| १२ | मार्च -२०२४ | ३३८.३६ | ० | १२३.५ | १२२.४७ | १३२.२ | २३.९७ | ० | ५.२१ | ०.६४ | २२९.७३ | ८४.२५ | ७२[illegible] |
| | एकूण | ३१९३.४३ | २०५७.८२ | ५१७.२० | ५३५.४० | ५८५.०० | ६०२.४२ | ०.५६ | १०३.९२ | ९.७० | २२९.७३ | ३८८.८८ | ५०३०.६३ |

## ठराव क्र. ६० (३३)/२०२४ :-

**सन २०२३-२४ या आर्थिक वर्षामध्ये महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडील** माहे **मार्च - २०२४ अखेर, उपकर जमा रू. ३१९३.४३ कोटी व विविध योजनेवरील व प्रशासकीय एकुण खर्च रू. ५०३०.६३ कोटी (प्रशासकीय खर्च रू ३८८.८८ कोटी + योजना खर्च रू ४६४१.७५ कोटी) यास मंडळाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

**विषय क्र. ३४ :- महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ यांचेकडून आर्थिक वर्ष २०२१-२२, २०२२-२३ व २०२३-२४ करीता कामगार कल्याण मंडळ, प्रभादेवी यांनी निधी व सभासद वर्गणी मिळणेबाबत विचारविनिमय करणे.**

मंडळ सचिव यांनी सादर केले की, कल्याण आयुक्त, महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ यांचेकडून राबवण्यिात येणाऱ्या योजना व उपक्रमांचा लाभ बांधकाम कामगारांना देण्याबाबतचा ठराव दिनांक २४.०१.२०१९ व दिनांक १४.०३.२०१९ रोजीच्या बैठकीत पारीत करण्यात आला होता तसेच दिनांक ०४.०९.२०१९ व दिनांक ०४.०३.२०२१ रोजीच्या बैठकीतील पारीत ठरावानुसार १० लाख बांधकाम कामगारांपोटी रू. १११/- याप्रमाणे वर्गणी कामगार कल्याण मंडळाकडे जमा करण्यात आली होती. व संबंधित वर्षामध्ये बांधकाम कामगारांनी घेतलेल्या लाभाबाबतचा सविस्तर तपशिल मंडळास सादर करण्याबाबत कळविण्यात आले होते. त्यानुसार कामगार कल्याण मंडळाने लाभार्थ्यीबाबत सादर केलेला अहवाल खालीलप्रमाणे -

एप्रिल २०२१ ते मार्च २०२२

| अ.क्र. | विभागाचे नाव | कार्यक्रम (आरोग्य तपासणी शिबीर, कोव्हीड प्रतिबंधक जनजागृती, व्यसनमुक्ती कार्यशाळा इ. कार्यक्रम मधील सहभाग कामगार/ का. कुटूंबिय संख्या) | उपक्रम (शिवणवर्ग ७५ व २५ टक्के तत्वावरील उपक्रम) | महाकल्याण कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रम | योजना (दूर पल्याच्या सहली) | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | नायगांव, मुंबई | १४६८२ | ०० | ०० | ०० | १४६८२ |
| २ | अकोला | १५१८ | ११७ | ३४ | ०० | १६६९ |
| ३ | ठाणे | १००६८ | ०० | ०० | ०० | १००६८ |
| ४ | नागपूर | ५८९८ | १६९ | ६९ | ०० | ६१३६ |
| ५ | नाशिक | ३८८३ | ०२ | १५७ | ०० | ४०४२ |
| ६ | औरंगाबाद | ६८६५ | ३४५ | ०० | ०० | ७२१० |
| ७ | पुणे | १३५४ | ०० | ६३ | १४० | १५५७ |
| ८ | कौशल्य विकास प्रशिक्षणाकरीता ऑनलाईन नोंदणी | ०० | ०० | ७८२ | ०० | ७८२ |
| | एकूण | ४४२६८ | ६३३ | ११०५ | १४० | ४६१४६ |

२.  महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या दिनांक ०२.०२.२०२४ च्या पत्रान्वये सन २०२१-२२ वर्षाची रक्कम रू.११.१० कोटी, सन २०२२-२३ या वर्षाची रक्कम रू.११.१० कोटी व आर्थिक वर्ष २०२३-२०२४ या वर्षाची रक्कम रू.११.१० कोटी अशी एकूण ३३.३० कोटी महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळास अदा करणेबाबत मंडळास कळविले होते त्यानुषंगाने याबाबतचा प्रस्ताव मान्यतेस्तव शासनास सादर करण्यात आला होता त्यावर शासनाने उपस्थित केलेल्या मुद्यांचा अहवाल शासनास सादर केलेला आहे.

मंडळ मुख्यालयात सन २०१७-१८ ते २०२१-२२ या पाच वर्षाचे Performance Audit सुरू असून महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळास वर्ग करण्यात आलेल्या निधीबाबत मा. महालेखापाल यांनी लेखापरीक्षण अहवालात खालीलप्रमाणे आक्षेप उपस्थित केले आहेत.

१. As against a total of १० lakh workers for whom the fees/contributions were released in २०२०-२१ and २०२१-२२, only ६४७०४ workers had taken the benefit of the schemes/ programs. Please state why inflated number of registered beneficiaries were considered while forwarding the amounts of MLWB ?
२. Whether willingness of the registered workers to participate in the programs of the MLWB was obtained before releasing the amounts may be please stated.
३. The MBOCW itself implementing a number of on-going schemes from its own funds, the necessity of allowing schemes of MLWB for registered beneficiaries of the Board may please be justified to Audit.
४. Why the employer's contribution was paid to MLWB may please be stated. Whether the employers of registered establishments has denied to make their contribution for this scheme? Documentary evidence in this regard may please be shown to audit.
५. Documentary evidence of registered beneficiaries of MBOCW who had participated in the schemes/programs of the MLWB may please obtained from them giving their registration numbers and acknowledgment from them as having participated in the schemes. As only ६४७०४ members had participated in the schemes/ programs of MLWB, the remaining amount (१९३५२९६ X १११= २१.४८ crore) needs to be called back from MLWB

३. महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ यांना वर्ग करण्यात आलेला निधीच्या अनुषंगाने लाभ वितरीत करण्यात आलेल्या लाभार्थ्यांचे प्रमाण कमी असणे, मा. महालेखापाल यांच्या निरीक्षणात सदर निधीबाबत आक्षेप घेतल्यामुळे त्यांना निधी वर्ग करण्यात आलेला नाही तसेच मंडळाच्या दिनांक ०१.०२.२०२४ रोजीच्या पत्रान्वये सन २०१९-२०२० व २०२०-२१ या दोन आर्थिक वर्षाचे अखर्चित निधीचा वर्षनिहाय अहवाल त्वरीत सादर करणेबाबत कळविले आहे. त्याबाबत अहवाल अद्यापी अप्राप्त आहे.

सविस्तर चर्चेअंती कामगार कल्याण मंडळाकडे यापुर्वी महाराष्ट्र बांधकाम कामगार कल्याण मंडळाने वर्ग केलेल्या एकुण निधीचा बांधकाम कामगारांसाठी लाभ दिलेल्याचे उपयोगिता प्रमाणपत्र सादर करण्यात यावेत व अखर्चित रक्कम मंडळाकडे जमा करण्यात यावी. मा. महालेखापाल कार्यालयाने आक्षेपीत केलेल्या मुद्यांची पुर्तता करण्यात यावी तसेच निधीचा लाभ नोंदीत सक्रीय (जिवीत) बांधकाम कामगार घेतील याबाबत कामगार कल्याण मंडळाने दक्षता घ्यावी व नोंदणीच्या तपशिलाआधारे वार्षिक रू. ५.०० कोटीच्या मर्यादेत अनुदान वर्ग करण्यास शासनास प्रस्ताव सादर करण्याचे सर्वानुमते ठरले.

**ठराव क्र. ६० (३४)/२०२४ :-**

**मंडळाकडील निधीचा लाभ नोंदीत सक्रीय (जिवीत) बांधकाम कामगारांनाच होण्यासाठी कामगार कल्याण मंडळाकडे नोंदीत असणाऱ्या बांधकाम कामगारांच्या नोंदणीचा तपशिल मंडळाकडे सादर करण्यात यावा व नोंदणीच्या तपशिलाआधारे वार्षिक रू. ५.०० कोटीच्या मर्यादेत अनुदान वर्ग करण्यास शासनास प्रस्ताव सादर करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

**विषय क्र.३५ :- महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडील नोंदीत सक्रीय (जिवीत) बांधकाम कामगारांसाठी BOMT (Build Operate Manage Transfer) या तत्वावर आरोग्य तपासणी केंद्र व हॉस्पीटल उभारणी करणेबाबत.**

मंडळ सचिव यांनी असे सादर केले की, मे. एचएससीसी (इंडिया) लि. या मिनी रत्न (भारत सरकार) संस्थेकडून मंडळास प्रस्ताव प्राप्त झालेला आहे. एचएससीसी ISO : ९००१ :२०१५ प्रमाणित संस्था आहे. तसेच आरोग्य क्षेत्रातील नियोजन, पायाभूत सुविधा उभारणी इत्यादी कार्यक्षेत्रांत कार्यरत आहे.मंडळामार्फत बांधकाम कामगारांची वार्षिक आरोग्य तपासणी एचएलएल या केंद्र पुरस्कृत उपक्रमाच्या मार्फत करण्यात येत आहे. त्यामध्ये २३ चाचण्याचा समावेश आहे. तथापि रोगाच्या / निदानाच्या आवश्यकतेनुसार हॉस्पिटलमध्ये जाण्यास होणारी टाळाटाळ, कामाचे स्वरुप , आर्थिक क्षमता याबाबी लक्षात घेता बांधकाम कामगारांच्या सर्व समावेशक उपचाराकरीता " चाचणी, निदान, उपचार, सुधार " ही संपूर्ण प्रणाली एकछत्री पध्दतीने राबविणे आवश्यक असल्याने सद्यस्थितीत मंडळामार्फत नोंदीत बांधकाम कामगारांसाठी आरोग्य तपासणी ते उपचार योजना राबवण्यात येत आहे. त्यामध्ये बांधकाम कामगार यथास्थिती पती/ पत्नी व १० वर्षावरील २ अपत्य यांचा समावेश आहे. सदर योजनेमध्ये आरोग्य तपासणी, औषधोपचार , प्रगतपृष्ठीकरण चाचणी (Confirmatory Test) रुग्णालय भरती यांचा समावेश आहे. नोंदीत सक्रीय बांधकाम कामगाराच्या आरोग्य तपासणी अंती अहवाल असामान्य आल्यास व आवश्यकता असल्यास मे.एचएलएल यांचेमार्फत मंडळ मान्यतेने सुचीबदध् केलेल्या हॉस्पिटलमध्ये लाभार्थ्याच्या सहमतीने लाभार्थास भरती करण्यात येते. उपचारावर झालेल्या खर्चाच्या रु.२ लक्षच्या मर्यादेमध्ये रुग्णालयास नियुक्त संस्थेकडून अदायगी करण्यात येवून सदर रक्कमेची प्रतीपुर्ती मंडळाकडून जिल्हा व विभागीय कार्यालयाच्या शिफारसी अंती नियुक्त संस्थेस करण्यात येते. तपासणी ते उपचार योजनेचा कालावधी ५वर्ष (दिनांक ०८.०९.२०२९ पर्यत) आहे.

उपरोक्त कार्यकाळ संपुष्टात आल्यानंतर बांधकाम कामगारांच्या आरोग्य सुविधेकरीता मंडळाची स्वत:ची पायाभूत सुविधा निर्माण व्हावी. या करीता मे.एचएससीसी ( इंडिया) लि. या संस्थेने खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर केलेला आहे.

१. असंसर्गजन्य रोगांच्याबाबतीत सार्वजनिक/ खाजगी भागीदारीबाबत निती आयोगाच्या मार्गदर्शक तत्वातील अनु.क्र.५C मध्ये जर इमारतीचे बांधकाम, वित्तीयबाबी, चालन व व्यवस्थापन कराराच्या कालावधीत नियुक्त संस्थेमार्फत करण्यात येणार असल्यास सदर कराराचा कालावधी ३०+ वर्ष राहिल असे नमुद असल्याने मे.एचएससीसी ( इंडिया) लि. यांचेमार्फत हॉस्पिटल व व्यवसायीक

आरोग्य केंद्र यांची उभारणी, चालन, व्यवस्थापन व हस्तांतरण (BOMT) या तत्वावर ३० वर्षाच्या कालावधीकरीता प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. सदर कालावधी दिनांक ०९.०१.२०२९ ते दिनांक ०८.०१.२०५९ असा राहिल. (प्रत संलग्न) मे.एचएससीसी (इंडिया) लि. यांचेमार्फत हॉस्पिटल व आरोग्य केंद्रांचे निर्माण कार्य करण्यात येणार असल्याने व त्याकरीता काही कालावधी लागणार असल्याने दिनांक ०८.०१.२०२९ पर्यंत मे.एचएससीसी (इंडिया) लि. हि संस्था मे.एचएलएल लि. यांचेसह संयुक्तपणे तपासणी ते उपचार योजना राबविल व तद्नंतर दिनांक ०९.०१.२०२९ ते दिनांक ०८.०१.२०५९ या कालावधीत तपासणी ते उपचार योजना केवळ मे.एचएससीसी (इंडिया) लि. यांचेमार्फत राबविण्यात येईल.

२. तपासणी ते उपचार या योजनेच्या अंमलबजावणीकरीता मे.एचएलएल लि. या संस्थेस विहीत केलेला कालावधी संपुष्टात येईपर्यंत संयुक्तपणे मे.एचएससीसी (इंडिया) लि. व एचएलएल तपासणी ते उपचार योजनेची अंमलबजावणी करतील. तद्नंतर म्हणजे दिनांक ९.१.२०२९ पासून दिनांक ८.१.२०५९ पर्यंत मे.एचएससीसी ( इंडिया) लि. यांचेमार्फत अंमजबजावणी करण्यात येईल.

३. मे.एचएससीसी (इंडिया) लि. यांचेमार्फत राज्यातील जिल्हयात एकूण ३४ हॉस्पिटलचे निर्माण कार्य करण्यात येईल त्यापैकी २८ हॉस्पिटलमध्ये ५०+ बेडची व्यवस्था असेल, उर्वरित ५ हॉस्पिटल हे ७५+ बेडचे मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल असेल व १ एक हॉस्पिटल हे १००+ बेडचे सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल असेल. त्यामध्ये असंघटित कामगार व नोंदित बांधकाम कामगार व त्यांचे कुटुंबियांवर विद्यमान आजार व व्यवसायामुळे उदभवनारे आजार यावर उपचार करण्यात येतील. तथापि केवळ नोंदीत बांधकाम कामगार व त्यांच्या कुटुंबियांकरीता तपासणी ते उपचार योजने अंतर्गत उपचाराची प्रतीपुर्ती मंडळामार्फत करण्यात येईल व असंघटित कामगारांकरीता उपचार प्रतीपुर्ती केंद्र / राज्य शासनाच्या आरोग्य योजनेनुसार करुन घेण्याची जबाबदारी मे.एचएससीसी (इंडिया) लि. यांची असेल. नोंदीत बांधकाम कामगार व त्यांचे कुटुंबिय वगळता इतर कामगारांच्या उपचारापोटी रक्कमेची प्रतीपुर्ती मंडळ करणार नाही. मे.एचएससीसी (इंडिया) लि. यांचेमार्फत उभारण्यात येणाऱ्या हॉस्पिटलमध्ये निकडीच्या प्रसंगी सामान्य नागरीकांवर देखिल उपचार केले जातील. (सुचीबध्द करावयाच्या हॉस्पिटलच्या संख्येचा तक्ता सोबत संलग्न)

४. मे.एचएससीसी (इंडिया) लि. यांचेमार्फत राज्यात २८ दुय्यम दर्जाची प्रत्येकी ५०+ बेडची क्षमता असलेली हॉस्पिटल, ५ मल्टीस्पेशालिटी प्रत्येकी ७५+ बेडची क्षमता असलेली हॉस्पिटल व १००+ बेडची क्षमता असलेले १ सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल स्थापन करण्यात येईल म्हणजेच एचएससीसी (इंडिया) लि. यांचेमार्फत

एकूण १८७५+ बेडची क्षमता असलेले ३४ हॉस्पिटल तपासणी ते उपचार या योजनेच्या अंमलबजावणीकरीता स्थापन करण्यात येईल.

५. मे.एचएससीसी ( इंडिया) लि. मंडळास ३० वर्ष कराराचा कालावधी संपुष्टात आल्यावर उपरोक्त नमुद केले नुसार १८७५+ बेडची क्षमता असलेले ३४ हॉस्पिटल व ३६ व्यवसायीक आरोग्य केंद्र तेथील साधन सामग्रीसह मंडळास सुर्पुद करेल. मे.एचएससीसी (इंडिया) लि. यांचेमार्फत हॉस्पिटल व आरोग्य केंद्रांचे निर्माण कार्य करण्यात येणार असल्याने व त्याकरीता काही कालावधी लागणार असल्याने दिनांक ०८.०१.२०२९ पर्यंत मे.एचएससीसी (इंडिया) लि. हि संस्था मे.एचएलएल लि. यांचेसह संयुक्तपणे तपासणी ते उपचार योजना राबविल.

६. मंडळ मे.एचएससीसी (इंडिया) लि. संस्थेसोबत शासनाची मान्यता मिळाल्यापासून दिनांक ०८.०१.२०५९ या कालावधीकरीता करारनामा करेल व तद्नंतर उभयपक्षांच्या सहमतीने सदर करार पुढील ३० वर्षांसाठी वाढविण्यात येईल. दिनांक ०९.०१.२०२९ ते दिनांक ०८.०१.२०५९ या कालावधीत सदर योजनेच्या (तपासणी ते उपचार) अंमलबजावणीचे संपूर्ण अधिकार केवळ मे. एचएससीसी ( इंडिया) लि. यांचेकडे राहतील.

७. मे.एचएससीसी (इंडिया) लि. यांचेमार्फत राज्यातील सर्व जिल्हयांमध्ये व्यावसायिक आरोग्य केंद्र स्थापन करण्यात येतील. सदर केंद्र संस्थेमार्फत स्थापन करण्यात येणाऱ्या केंद्रामध्ये विविध हदय, फुफुस, किडणी इत्यादी आजाराचे निदानासाठी आवश्यक नविनतम साधन सामग्री व तंत्रज्ञानासह सज्ज असतील व तेथे डॉक्टर व पॅरामॅडीक कर्मचारी उपलब्ध असतील. बांधकाम कामगारांच्या आरोग्य तपासणी घरोघरी,बांधकामाच्या ठिकाणी आयोजित शिबीर, वैद्यकीय शिबीर तसेच थेट व्यवसायिक आरोग्य केंद्रामध्ये देखील करण्यात येईल. सदर केंद्र रोगनियमन कार्यक्रमामध्ये आरोग्य योजना राबविण्यासाठी देखील काम करेल. सदर आरोग्य केंद्राकरीता १ व्यावसायिक आरोग्य व्यवस्थापनाबाबतचा अनुभव असलेला डॉक्टर नियुक्त करण्यात येईल. याचप्रमाणे विभागाकरीता व राज्याकरीता देखील व्यावसायिक आरोग्य केंद्र उपलब्ध करुन देण्यात येईल.

८. मे.एचएससीसी (इंडिया) लि. यांचेमार्फत उपरोक्त नमुद केल्यानुसार हॉस्पिटल बांधण्याकरीता जागेची निवड करण्यात येईल. NABH नियमानुसार सदर हॉस्पिटलच्या बांधकामाचा खर्च,साधन सामग्री व साहयभुत सामुग्री, डॉक्टर पॅरामॅडीक व इतर कर्मचारी यांच्या नियुक्तीचा खर्च व हॉस्पिटलच्या चालनाचा खर्च एचएससीसी (इंडिया) लि. यांचेमार्फत करण्यात येईल. मे.एचएससीसी (इंडिया) लि. यांचेमार्फत मंडळाकरीता बांधण्यात आलेल्या जिल्हयाच्या स्तरावरील हॉस्पिटलमध्ये General Medicine, General Surgery, Orthopedic, Gynecology, Pediatric, ENT, Ophthalmology,

Diabetology, Cardiology, Nephrology, Gastroenterology, Pathology, Radiology यांचा समावेश असेल.

९. विभागीय स्तरावरील मे.एचएससीसी (इंडिया) लि. यांचेमार्फत मंडळाकरीता बांधण्यात आलेल्या हॉस्पिटलमध्ये उपरोक्त नमुद विभागांव्यतिरिक्त Pulmonology, Intervention Cardiology, Cardiovascular Surgery, Uro Surgery, Neurology, Hematology, Medical Oncology, Onco surgery, Transfusion Medicine यांचा समावेश असेल व राज्यस्तरावरील हॉस्पिटलमध्ये उपरोक्त सर्व विभागांव्यतिरिक्त Respiratory Medicine, Nuclear Medicine यांचा समावेश असेल.

१०.राज्यस्तरावरील मे.एचएससीसी (इंडिया) लि. यांचेमार्फत मंडळाकरीता बांधण्यात आलेल्या हॉस्पिटलमध्ये डॉक्टरांची समिती असेल जी कामगार व त्यांचे कुटुंबियांवर करावयाचे उपचार, आरोग्य धोरण व उपचारास मंजुरी प्रदान करेल. सदर समितीमध्ये ५ विभागीय स्तरावरील हॉस्पिटलच्या वैद्यकीय अधिक्षकांचा समावेश असेल व त्यांचे अध्यक्ष पद राज्यस्तरावरील हॉस्पिटलच्या अधीक्षकांकडे असेल. सदर संस्थेमार्फत नोंदित बांधकाम कामगार व त्यांच्या कुटुंबियांकरीता तपासणी ते उपचार योजनेच्या शासन निर्णयात नमुद केल्यानुसार CGHS च्या दरानुसार उपचार करण्यात येतील. प्रगत पृष्टीकरण चाचणी व वेद्यकीय उपचार देखील CGHS च्या दरानुसार करण्यात येतील व औषधोपचाराचे दर जनऔषधीच्या दरानुसार राहतील. तसेच सदर योजनेचा लाभ सद्यस्थितीतील तपासणी ते उपचार योजनेमध्ये ज्याप्रमाणे नोंदीत सक्रीय बांधकाम कामगार (यथास्थिती पती / पत्नी ) व १० वर्षावरील २ अपत्यांना लागू राहिल तसेच नोंदीत सक्रीय बांधकाम कामगाराच्या पहिल्या दोन १० वर्षाखालील अपत्यांना अपघात व आजारपणाकरीता रुग्णालयभरती व औषधोपचारास योजनेचा लाभ अनुज्ञेय राहिल. प्राथमिक आरोग्य तपासणी चाचणी अनुज्ञेय राहणार नाही. दिनांक ०७.०८.२०२३ व दिनांक ०९.०१.२०२४ रोजीच्या शासन निर्णयात नमुद अटीशर्ती मे. एचएससीसी ( इंडिया) लि. यांना लागू राहतील.

११.मे.एचएससीसी (इंडिया) लि. यांचेमार्फत उभारण्यात येणारे हॉस्पिटल उभारताना सर्व नियमांचे पालन करण्यात येईल. तसेच संगणक प्रणाली, मोबाईल ॲपलिकेशन, HMIS व डॅशबोर्ड तयार करण्यात येईल व त्याचा खर्च संस्थेमार्फत करण्यात येईल.

उपरोक्त प्रमाणे मे. एचएससीसी ( इंडिया) लि. यांचेमार्फत प्रस्ताव मंडळास सादर करण्यात आलेला आहे. सद्यस्थितीत मे.एचएलएल लि. यांचेमार्फत तपासणी ते उपचार योजनेकरीता प्रत्येक जिल्हयात ३ हॉस्पिटल सुचीबदध् करण्यात आले आहेत / येत आहेत. सदर हॉस्पिटल खाजगी असून मंडळामार्फत मे. एचएलएल लि. यांना तपासणी ते उपचार

आरोग्य योजनेच्या शासन निर्णयात नमुद केल्यानुसार CGHS दराप्रमाणे देयक अदा करण्यात येत आहे. त्यामुळे जिल्हयाची लोकसंख्या व खाजगी हॉस्पिटलमधील रुग्णांचे प्रमाण पाहता बांधकाम कामगार / त्यांचे कुटुंबिय यांना वेळेवर बेड उपलब्ध न होण्याची शक्यता असू शकते. त्यामुळे केवळ बांधकाम कामगारांकरीता सर्मपित रुग्णालय अधिक उपयुक्त राहिल याशिवाय सदर प्रस्तावात नमुद केल्यानुसार ३० वर्षाच्या कालावधीनंतर सदर हॉस्पिटल व संबंधित साधन सामग्री यावर मंडळाचा अधिकार राहणार असल्याचे व आवश्यक असल्यास कराराचा कालावधी पुढील ३० वर्षाकरीता वाढवण्याची तरतुद नमुद आहे.

**ठराव क्र. ६० (३५)/२०२४ :-**

**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडील नोंदीत सक्रीय (जिवीत) बांधकाम कामगारांसाठी BOMT (Build Operate Manage Transfer) या तत्वावर तपासणी ते उपचार योजना राबविण्याबाबत मे. एचएससीसी (इंडिया) लि. यांनी सादर केलेल्या प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

विषय क्र.३६ :- मा. अध्यक्ष यांच्या मान्यतेने आयत्या वेळेचे विषय

**विषय क्र. ०१) महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाअंतर्गत नोंदीत सक्रीय (जिवीत) बांधकाम कामगारांकरीता गृहपयोगी वस्तु संच पुरविण्याच्या लक्षांकात वाढ करणे.**

मंडळ सचिवांनी सादर केले की, इमारत व इतर बांधकाम कामगारांच्या कामाचे स्थलांतरीत स्वरूप पाहता कामाच्या ठिकाणी त्यांना निवारा व भोजनाच्या मूलभूत सोयी सुविधांकरीता अडचणी येतात त्यामुळे त्यांना दैनंदिन भोजन तयार करण्यास सहायय व्हावे म्हणून मंडळामार्फत नोंदीत सक्रिय बांधकाम कामगारांकरीता शासन मान्यतेने माहे जानेवारी २०२४ पासून गृहपयोगी वस्तू संच योजना राबविण्यात येत आहे. सदर योजनेंतर्गत नोंदीत बांधकाम कामगारांना संपूर्ण आयुष्य कालावधीमध्ये एका कुटूंबास एकच गृहपयोगी वस्तू संच वितरीत करण्यात येतो. सद्यस्थितीत मंडळाच्या वतीने गट क्र. ०१ नागपूर व छत्रपती संभाजीनगर विभागाकरीता व गट क्र. ०२ मुंबई, पुणे, नाशिक व अमरावती विभागाकरीता १०.०० लक्ष नोंदीत सक्रीय (जिवीत) बांधकाम कामगारांकरीता संच पुरविण्याबाबत पुरवठा आदेश देण्यात आला आहे.

तथापि, मंडळाकडे १६,१३,५६१ एवढया बांधकाम कामगारांची नोंदणी सक्रीय आहे. त्यामुळे सर्व नोंदीत बांधकाम कामगारांना गृहपयोगी वस्तू संच पुरवठा सुरळीत होण्याच्या दृष्टीने व करारनाम्यातील अटीनुसार आवश्यकतेप्रमाणे अतिरीक्त ६,१३,५६१ लक्ष गृहपयोगी संच पुरवठा करण्यासाठी सर्वानुमते मंडळाच्या मान्यतेने शासनास प्रस्ताव सादर करण्याचे ठरले सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव पारीत करण्यात आला.

**ठराव क्र. ६० (३६) (१)/२०२४ :-**

**मंडळाकडे सद्यस्थितीत १६,१३,५६१ एवढया बांधकाम कामगारांची नोंदणी सक्रीय असल्याने सर्व नोंदीत बांधकाम कामगारांना गृहपयोगी वस्तू संच पुरवठा सुरळीत होण्याच्या दृष्टीने व करारनाम्यातील अटीनुसार आवश्यकतेप्रमाणे अतिरीक्त ६,१३,५६१ लक्ष गृहपयोगी संच पुरवठा करण्यासाठी शासनास प्रस्ताव सादर करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

**विषय क्र. ०२) नोंदीत बांधकाम कामगारांच्या पाल्यांना नामांकित शैक्षणिक संस्थेत प्रवेश मिळणाऱ्या पालकांस अर्थसहाय्य मंजुर करणेबाबत.**

मंडळ सचिवांनी सादर केले की, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळामार्फत नोंदीत सक्रीय (जिवीत) बांधकाम कामगारांकरीता शैक्षणिक सहाय्य योजना, आरोग्य विषयक योजना, आर्थिक सहाय्य योजना व सामाजिक सुरक्षा योजना अशा विविध कल्याणकारी योजना राबविण्यात येत आहेत.

२. आदिवासी विकास विभाग, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांमध्ये नामांकित शैक्षणिक संस्थामध्ये शिकत असलेल्या पाल्यांकरीता वसतीगृह व अभ्यास साहित्याकरीता अर्थससहाय्याचा समावेश आहे सबब सदर विभागाच्या धर्तीवर नोंदीत सक्रीय (जिवीत) बांधकाम कामगारांच्या नामांकित शैक्षणिक संस्थामध्ये शिक्षण घेत असलेल्या पाल्यांना अर्थसहाय्य वितरीत करण्याचा प्रस्ताव मंडळाच्या विचाराधिन होता.

सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे सर्वानुमते ठराव पारीत करण्यात आला.

**ठराव क्र. ६० (३६) (२)/२०२४ :-**

**आदिवासी विकास विभाग, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या धर्तीवर नोंदीत सक्रीय (जिवीत) बांधकाम कामगारांच्या नामांकित शैक्षणिक संस्थेत शिक्षण घेत असलेल्या पाल्यांना अर्थसहाय्य वितरीत करणेबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई